

नाडी भविष्यः बुद्धिवाद्यांना खावी लागलेली हार







शेजारील फोटोत वरील आणि खालील अशा दोन पट्टीत शशिकांत नाव कसे कोरून लिहिलेले असते ते




१० नाडी भविष्य : बुद्धिवाद्यांना खावी लागलेली हार

मागच्या प्रकरणात शेवटी (टीपेत) असे म्हटले आहे, की चित्रपट निर्माते गजानन जागीरदार यांच्या मामांचा एका दूरच्या गावी (उत्तर महाराष्ट्रात) कुऱ्हाडीने खून झाल्याचे कोल्हापुरात (दक्षिण महाराष्ट्रात) त्यांच्याशिवाय कुणालाही माहीत नसताना कोल्हापुरातीलच एक गुराखी पोर चौरंगावरील ज्योतीत ते दृश्य दिसत असल्याचे जेव्हा सांगू लागला, तेव्हा जागीरदार चक्रावून गेले व त्यांची त्या रात्री झोप उडाली, असे स्वतःजागीरदारांनी आपल्या **पाऊलखुणा** या आत्मचरित्रात लिहिले आहे. जागीरदारांच्या 'चक्रावून सोडणाऱ्या चमत्काराचा हा अनुभव क्षुल्लक ठरवणारा, त्याहूनही जास्त चक्रावून सोडणाऱ्या चमत्काराचा अनुभव, आपल्या ऋषिमुनीनी लिहिलेले नाडीग्रंथ वाचल्यानंतर येतो. त्यामुळे चमत्कार खोटे म्हणणाऱ्या महाराष्ट्रातील बुद्धिवाद्यांनी जो अन्याय जागीरदारांवर केला, तोच अन्याय त्यांनी या नाडीग्रंथावरही केला तर त्यात आश्चर्य नाही, पण त्यांच्यावर या लोकांनी अन्याय केला असे म्हणणे म्हणजे या लोकांना नसलेले महत्त्व देणे होय. त्यांनी या विरुद्ध काही लिहिले तर ते सूर्यावर थुंकण्यासारखे आहे. तेव्हा अन्याय केला असे न म्हणता या

बुद्धिवाद्यांना या नाडीग्रंथांनी पुरते नामोहरम केले, असे म्हणणे योग्य होईल.

नाडीग्रंथांपुढे बुद्धिवाद्यांना खाव्या लागलेल्या या हाराची कथा म्हणजे महाराष्ट्राच्या बुद्धिवादाच्या इतिहासातील एक काळेकुट्ट पान आहे. ते पान विंग कमांडर शशिकांत ओक यांच्या **बोध अंधश्रद्धेचा** (१९९८) या ग्रंथात तपशीलाने रंगवले आहे . येथे नाडी ग्रंथावर शांताराम आठवले यांच्या **नाडीग्रंथ : एक अभ्यास** यातील अनुभवांचा अधिक प्रकाश टाकून त्या पानाचे गडद स्वरूप जास्त स्पष्ट करण्याचे योजिले आहे. **नाडी ग्रंथःएक चमत्कार**



नाडी ग्रंथ(किंवा संहिता ग्रंथ)म्हणजे भूर्जपत्रावर (ताडवृक्षांच्या पानावर) लिहिलेले पुढे जन्मणाऱ्या व्यक्तींचे भविष्य होय. हे नेहमीचे फलज्योतिष नव्हे, हे वाचकांनी लक्षात ठेवावे. फलज्योतिष म्हणजे व्यक्तिच्या जन्मकुंडलीवरून वर्तविण्यात येणारे भविष्य. नाडी ग्रंथात व्यक्तीच्या जन्मकुंडलीवरून भविष्य वर्तविण्यात येत नाही - कारण ती व्यक्ती जन्मलेलीच नसते - तर ती पुढे केव्हा जन्मणार आहे याचेच भविष्य वर्तविण्यात येते! इतकेच नव्हे तर त्या व्यक्तीचे नाव काय ठेवण्यात येईल हेही अचूक सांगण्यात येते! पाळण्यात ठेवलेले नाव वेगळे व व्यवहारातील नाव वेगळे असेल, तर तसे स्पष्ट करून ती दोन्ही नावे कोणती असतील हेही सांगण्यात येते! मग त्या व्यक्तीच्या आईवडिलांची नावे सांगितली जावीत, त्या व्यक्तीचे शिक्षण, व्यवसाय, भावंडे, मुले, आयुष्य इ. सर्व तपशील सांगण्यात यावा यात आश्चर्य नाही. न जन्मलेल्या व्यक्तीचे इतके अचूक भविष्य ती व्यक्ती जन्मण्यापूर्वीच सांगता यावे, विशेषतःतिचे नाव व जन्मवेळ अचूक सांगता यावीत, हा एक मोठा चमत्कार नव्हे काय ?

पण हा चमत्कार सत्य असल्याची खात्री कुणालाही स्वतःचे भविष्य या नाडीग्रंथात पाहून करून घेता येते. म्हणूनच विंग कमांडर ओक यांनी मद्रासमधील अगस्त्य नाडीचा असा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानंतर चक्रावून सोडणारा **चमत्कार : नाडी भविष्य (१९९४)** असा मथळा आपल्या पुस्तिकेला दिला व आपले अनुभव मराठी वाचकांपुढे ठेवले. त्यापूर्वी शांताराम आठवले यांनी **नाडीग्रंथ : एक अभ्यास (**१९६८) हा ग्रंथ लिहून या नाडीग्रंथांची महाराष्ट्राला ओळख करून दिली होती. त्यांनी 'वाङ्मयशोभा' या मासिकात या विषयावर जो पहिला लेख लिहिला, त्याला त्यांनीही **'नाडीग्रंथ : एक चमत्कार'** असाच मथळा दिला होता. वरील आपल्या ग्रंथातील एका प्रकरणालाही त्यांनी 'अजब अनुभव' असाच मथळा दिलेला आढळून येतो. त्यांच्या ग्रंथात कथन केलेले अनुभव वाचल्यानंतर नाडीग्रंथाचे चमत्कार कशा स्वरूपाचे आहेत, याची वाचकांना स्पष्ट कल्पना येते. त्यातील काही निवडक अनुभव येथे दिले तर बुद्धिवाद्यांनी या ग्रंथाविषयी केलेला खोटा प्रचार आपोआपच उघडा पडणार असल्यामुळे ते येथे थोडक्यात देत आहे.

श्री. आठवले यांचे 'वाङ्मयशोभा' मासिकातील लेख वाचून विदर्भातील एक तरुण ग्रहस्थ त्यांच्या कडे आले. त्यांच्या वडिलांच्या आजाराचे निदान डॉक्टर करू न शकल्यामुळे नाडीग्रंथांच्या आधारे काही उलगडा होतो का, हे त्यांना पाहायचे होते. आठवले यांनी दिलेल्या पत्यावर ते मुंबईच्या बाबूभाई जोशी 'छायाशास्त्री' यांच्याकडे गेले. आठवले म्हणतात, "भविष्य पाहण्यासाठी अमुक दिवशीच जाणार हे आधी ठरविलेले नव्हते. असे असताही त्यांच्या वडिलांचे भविष्य सूर्यसंहितेतून शोधून काढून ते वाचू लागताच कोणाचीही मती आश्चर्याने गुंग व्हावी, असे पुढील वाक्य संहितेत निघाले. " (पृ. ५६) ते वाक्य कोणते हे आठवले पुढीलप्रमाणे सांगतात,

"प्रश्न करणारा माणूस हजर नसून त्याच्या तर्फे कोणी सगोत्र कुटुंबी बालक येथे आला आहे. प्रश्नाचा दिवस वैशाख मासातील कृष्ण पक्षातील दशमी असून वार शुक्रवार आहे. (हे अगदी बरोबर होते.)" (पृ. ५६)

"सर्वात आश्चर्य म्हणजे या गृहस्थांचे व त्यांच्या आईवडिलांचे नावही संहितेने बरोबर सांगितले आहे." (५७) "पूर्वजन्मी क्रोधाच्या भरात कुत्र्याच्या कमरेखालील भागात खूप चोपले. त्यामुळे कुत्रा अपंग झाला, त्यावेळी कुत्रा ४२ महिन्यांचा होता.

(त्यामुळे त्या गृहस्थाच्या वडिलांना कमरेखाली पक्षाघातासारखा विकार झाला होता.) विमुक्त होण्यासाठी ५ तोळे सोन्याची एक प्रतिमा तयार करून त्यावर कुत्र्याचे चित्र रेखून एका निर्धन ब्राम्हणास दान करावे. तीन लक्ष गायत्री जप करावा." (पृ. ५८)

'वाङ्मयशोभा' मासिकातील आठवले यांचा लेख वाचून विदर्भातील त्यांची ओळख नसलेला एक गृहस्थ, पूर्वी त्याला ज्यांनी कधी पाहिले नव्हते व ज्यांना त्याची कसलीही माहिती नव्हती, अशा मुंबईतील 'छायाशास्त्री' यांच्याकडे त्यांना पूर्वसूचना न देता अचानक गेला असल्यामुळे येथे 'छायाशास्त्री 'नी हेरगिरी करून त्याची माहिती काढून सांगितली असा आरोप बुद्धिवाद्यांना करता येणार नाही. शिवाय येथे जन्मकुंडलीवरून पान शोधून काढण्याची पद्धत अवलंबिली जात असल्यामुळे पृच्छकाला नाना प्रश्न विचारून त्याच्याकडून माहिती काढून तीच सांगण्यात येते, असला (अज्ञानमूलक) आरोपही त्यांना करता येणार नाही. (अगस्त्य नाडीबाबत असा आरोप बुद्धिवादी करतात.)

आपल्या एका 'मित्रा'चे अनुभव वर्णन करताना आठवले म्हणतात, “शुक्र नाडीचे त्यांना आलेले अनुभव चमत्काराच्याही पलीकडचे वाटतील इतके अद्भुत आहेत." (पृ. ९१) ते अनुभव पुढीलप्रमाणे आठवले यांनी दिले आहेत. (आपल्या 'मित्रा'च्या एका स्नेह्याची बाह्य जगाला माहीत नसलेली कुलंगडी नाडीने बाहेर काढल्यामुळे आठवले आपल्या मित्राचा उल्लेख 'मित्र' म्हणूनच करतात.)

"श्री. मित्र मद्रास येथे (श्री. टी. एस्. नयनार, ८१ पदवतमन् कोसापेठ, मद्रास - १२ या नाडीकेंद्रातील हा अनुभव आहे.) स्वत:ची गाडी नादुरुस्त असल्याने गृहस्थ त्यांच्याकडे आले, त्यांच्या वडिलांच्या आजाराचे निदान डॉक्टर टॅक्सीने (भाड्याच्या) गेले. शुक्र नाडीत त्यांच्या कुटुंबियांची नावे, त्यांच्या पुण्यातील कॉलनीचे नाव, त्यांच्या वेषाचे हुबेहूब वर्णन इ. तपशील तर आलाय; पण त्यांनी बरोबर आणलेल्या भाड्याच्या टॅक्सीचा नंबरही आला.” (पृ. ९२)

"श्री. मित्र यांच्या त्या तरुण मित्राचे एका बाईशी 'संबंध' होते; पण बाह्य जगाला ते बहीण-भावाचे नाते आहे असे भासवीत. शुक्र नाडीने त्या बाईचे नावही दिले व त्या स्नेह्याचे नाव पण त्यात आले. तो मित्र खजील झाला व नाडीने प्रकट

केलेले गुह्य खरे असल्याचे त्याने कबूल केले. याच स्नेह्याला १००० रुपयांना फसविणाऱ्या एका मित्राचा वृत्तांत पण नाडीने बरोबर वर्णन केला." (पृ. ९३)

हे "भविष्यकथन चालू असताना श्री. मित्र यांनी टेपरेकॉर्डवर भविष्याचा मजकूर मुद्रित करण्याचा प्रयत्न केला. ईशस्तुतीचे श्लोक मुद्रित होतात न होतात, तोच नाडीत स्वच्छ मजकूर आला की 'ग्रंडिग' नावाच्या यंत्रावर भविष्यकथनाचे मुद्रण करण्याचा तुमचा विचार अयोग्य आहे. हे दैवी शास्त्र आहे व ते यंत्रबद्ध करू नये. असे म्हणून किंवा नाडीतून वाचून श्री. नयनार (नाडीवाचक) यांनी पुढचे वाचन थांबवले. **श्री. मित्र यांचे एक तमीळ भाषिक स्नेही या भविष्यकथनाच्या वेळी उपस्थित होते. ग्रंथातील 'ग्रंडिग' हे यंत्राचे नाव त्यांनी वाचून खात्री करून घेतली."** (पृ. ९३) (प्रस्तुत लेखकाने जर्मनीच्या 'ग्रंडिंग' कंपनीचे ११ किलो वजनाचे हे यंत्र कित्येक वर्षे स्वतःवापरले असल्यामुळे त्याचे 'ग्रंडिग' हे नाव बरोबर असल्याचा तो निर्वाळा देऊ शकतो.)

श्री. आठवले यांचे नाडीग्रंथाचे अनुभव

मुंबईचे बाबूभाई जोशी 'छायाशास्त्री' यांच्याकडील सूर्यसंहितेचा अनुभव श्री. आठवले यांनी घेतला असून त्यातील महत्वाचा भाग येथे देत आहे. शांताराम आठवले हे चित्रपट व्यवसायात प्रसिद्ध पावले हे सर्वांना माहीत आहे. त्या व्यवसायाचे सूर्यसंहितेचे वर्णन 'नटनाट्यदर्पण' असे केलेले आढळून येते. (भृगुसंहितेने 'छायाप्रतिबिंब' असे त्याचे वर्णन केले आहे.) वयाच्या कितव्या वर्षी ते या व्यवसायात प्रवेश करतील, हे व इतर त्यांच्या जीवनातील सर्व महत्त्वाचा तपशील संहितेने बरोबर सांगितला आहेच; पण त्यांचे पाळण्यातील नाव कोणते असेल व प्रसिद्ध असलेले नाव कोणते असेल हेही संहितेने बरोबर सांगितले आहे. त्यांच्याविषयीची पुढील माहिती विशेष महत्त्वाची आहे.

"हा बालक स्वतःचे भविष्य पाहण्याचा हेतू धरून आला नसून ग्रंथ व त्यातील उक्तिपद्धती यांचे ज्ञान करून घेण्यासाठी आला आहे." (पृ. ७३) (नेमकी अशीच वाक्ये प्रस्तुत लेखकाला उद्देशून मद्रासमधील अगस्त्य नाडीने वापरलेली आहेत. 'हा बालक नाडीचे शास्त्रीय संशोधन करण्याच्या उद्देशाने येथे आला आहे' असे

माझ्याविषयी अगस्त्य नाडीने म्हटले आहे.) " वयाचे ५५ वे वर्ष चालू असता श्रावण शुद्ध षष्ठी, गुरुवारी (बृहस्पतीवासरे अपराह मध्यान्ह काले) फलश्रुती वाचली." (पृ. ७२) अशी आठवले यांच्या नाडीवाचनकालाची माहिती संहितेने दिली आहे. (प्रस्तुत लेखकाच्या बाबतीत त्याच्या वयाच्या ६७ व्या वर्षी नाडीग्रंथ मी पाहात असल्याचे बरोबर सांगितले आहे. मात्र दिवस सांगितलेला नाही.) पुढे आठवले लिहितात, 'हा बालक करीत असलेल्या जपात अशुद्धी राहिली आहे.' हा उल्लेख वाचताच मी कान टवकारले. शास्त्रीजींनी देखील 'तुम्ही कुठला जप करता?' असे विचारले. मी माझा जप सांगितला. गेले कित्येक दिवस तो मी अव्याहत नियमित करीत आहे, हेही मी त्यांना सांगितले. शास्त्रीजींनी तात्काळ एक संस्कृत पोथी काढून तिच्या आधारे माझ्या जपातील क्षुल्लक दिसणारी, पण परिणामी महत्त्वाची ठरणारी चूक मला दाखवून दिली. भविष्य पाहण्याचा सर्वात अधिक लाभ हाच झाला." (पृ. ७३)

मीरत (उ.प्र.) येथील पं. शिवकुमार शास्त्री (एस्. के. दीक्षित) हे मुंबईतील चर्चगेटसमोरील ॲस्टोरिया हॉटेलात वर्षातून काही महिने येऊन राहत असत. त्यांच्या भृगसंहितेचा आठवले यांना आलेला अनुभव येथे देतो. त्यांचे मित्र श्री. एम्. आर. आजगावकर यांच्या मुलाचे भविष्य पाहताना "त्या वर्णनाच्या ओघात मुलाची माता एकांतात काय प्रार्थना करीत असते, यांचे अचूक वर्णन आले. ते ऐकून सौ. आजगावकर आश्चर्यचकित झाल्या. भविष्याच्या ओघात आजगावकरांच्या विवाहप्रसंगीच्या काही घटना ज्या मला किंवा इतरांना ठाऊक नव्हत्या - भृगूंनी हुबेहूब वर्णन केल्या." (पृ. ८६-८७) पुढे आठवले लिहितात, "हे भविष्यवाचन ऐकण्यासाठी एक ज्योतिषविषयाचे रसिक कलाकार मुद्दाम उपस्थित आहेत असे सांगून भृगूंनी माझ्या साध्या वेषाचे व कलियुगात राहून सत्ययुगी स्वप्ने पाहणाऱ्या माझ्या स्वभावाचे असे काही तंतोतंत शब्दचित्र रेखाटले, की आम्ही सगळे एकमेकांकडे पाहातच राहिलो." (पृ. ८७) पुढे आठवले काय म्हणतात हे बुद्धिवाद्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे, "माझ्या मुद्रेवरील काहीसे अविश्वासाचे भाव पाहून शास्त्रीजीनी संहितेतील माझ्याबद्दलचे श्लोक माझी खात्री पटविण्यासाठी मुळातून वाचून दाखवले. याच्याही पुढे जाऊन भृगूंनी आम्हाला एक चमत्कार दाखवला. आजगावकर यांच्या पुत्राला दोन मोठ्या बहिणी आहेत, तशाच दोन

बहिणी माझ्याही मुलाला असतील असे सांगून तो धागा पुढे पकडून माझ्या मुलाबद्दल आपल्या फार मोठ्या अपेक्षा आहेत, तो चक्रविद्याप्रवीण होईल, असे भृगूंनी सांगितले. येथे शास्त्रीजीनी 'क्या आपका लडका एंजिनिअरिंग कर रहा है?' असे विचारले व मी 'जी हाँ' म्हणून संमती दिली." (पृ. ८७) यानंतरची आठवले यांची विधाने सर्वात महत्त्वाची आहेत. "शास्त्रीजीवाचीत असलेली संहितेची पाने मी व आजगावकर यांनी नीट निरखून पाहिली. जुन्या पोथ्या असतात तसा कागद व तशी शाई असलेले ते हस्तलिखित होते. मला शास्त्रीजींनी पूर्वी पाहिलेले नव्हते. माझ्या मतांची व स्वभावाची तर त्यांना काहीच कल्पना असण्याची शक्यता नव्हती." (पृ. ८७) ही संहिता (कागदावरची) मूळ भूर्जपत्रावरून तयार करण्यात आली होती असे सांगून आठवले म्हणतात, "शास्त्रीजींनी ती मूळ ताडपत्री मला दाखवली. ती फूटपट्टीसारखी होती व तिच्यावर संस्कृत श्लोक होते." (पृ. ८५)

आठवले यांच्याबद्दलचे श्लोक (जे मूळ ताडपत्रीवरून कागदावर उतरवले गेले होते) ते दीक्षितशास्त्रींनी वाचून दाखवले. ते आठवले यांनी पाहिले की नाही हे त्यांनी सांगितले नसले तरी ते पाहिले असणार हे उघड आहे. अन्यथा 'संहितेची पाने नीट निरखून पाहिली' असे त्यांनी म्हणण्याचे काही कारण नव्हते. बुद्धिवाद्यांचा आक्षेप असा, की नाडीवाले प्रश्नकर्त्यांची माहिती अगोदर मिळवून ती नाडीतून वाचण्याचे सोंग करतात. हे खरे असेल तर दीक्षितशास्त्री सौ. आजगावकर एकांतात काय प्रार्थना करीत होत्या हे कसे सांगू शकले, याची उपपत्ती ते कशी देणार आहेत? तसेच आठवले यांच्या मित्राच्या स्नेह्याचे बाह्य जगाला माहीत नसलेले गुपित मद्रासचे नयनार कसे सांगू शकले, याची उपपत्ती ते कशी देणार आहेत? शिवाय आठवले यांच्या मित्राने आपल्या एका तमीळ स्नेहाकडून 'ग्रंडिंग' हा शब्द नाडीत असल्याची खात्री करून घेतल्याचा वर उल्लेख आलाच आहे. बुद्धिवाद्यांचा 'हेरगिरी करून नाडीवाले माहिती सांगतात' हा आरोप येथे पूर्णपणे कोलमडून पडतो. आठवले यांच्या स्वभावाचे वर्णन करणारे मूळ श्लोक दीक्षितशास्त्रींनी वाचून दाखवून बुद्धिवाद्यांच्या या तर्काच्या खंडनावर शिक्कामोर्तब केले आहे.

मद्रासच्या अगस्त्य नाडीकेंद्रात भविष्य पाहणाऱ्याचे बंडल हुडकून काढण्यासाठी आंगठ्याचा ठसा घेण्याची पद्धत आहे. ठशाच्या आधारे ते हुडकून

काढल्यानंतर त्यातील नेमके पान काढण्यासाठी आणि त्या पानातील माहिती पृच्छकाशी जुळते की नाही हे पाहण्यासाठी काही प्रश्न विचारण्यात येतात. त्या प्रश्नांची उत्तरे 'हो' किंवा 'नाही' एवढीच द्यायची असतात. बुद्धिवाद्यांचे म्हणणे असे की या प्रश्नांतून ते आपली सर्व माहिती कावून घेतात व तीच 'भविष्य' म्हणून सांगतात. हा तर्क स्वतःनाडीची परीक्षा घेण्याचे कष्ट टाळण्यासाठी ते घरी बसून लढवत असतात. त्यामुळे त्याची किंमत अनुभव घेतलेल्या लोकांच्या दृष्टीने शून्य आहे.[1] तथापि अशा तऱ्हेच्या तर्काचे वेवर्थ्य वरील उदाहरणाने स्पष्ट होते. कारण वरील उदाहरणात प्रश्नकर्त्यांच्या **जन्मकुंडलीवरून त्याचे पान हुडकून काढण्यात येते. प्रश्न विचारून नाही.** त्यामुळे नाडीग्रंथ खोटे ठरविण्यासाठी उभा केलेला बुद्धिवाद्यांचा सर्व तार्किक डोलाराच कोलमडतो.

कर्णपिशाचाचा सिद्धांत

नाडीग्रंथात इतकी अचूक माहिती येत असलेली पाहून काहीजणांनी हा कर्णपिशाचाचा प्रकार असावा असा तर्क केला आहे. या तर्काची कास बुद्धिवाद्यांना मात्र धरता येत नाही! कारण नाडीचा चमत्कार खोटा ठरविण्यासाठी पिशाचाच्या अस्तित्वावर, म्हणजे दुसऱ्या एका तसल्याच चमत्कारावर त्यांना विश्वास ठेवावा लागतो. पण पिशाच, भुते, आत्मा अशा गोष्टीवर त्यांचा विश्वास नाही. तथापि काही जणांचा हा तर्क कितपत बरोबर आहे, हे तपासून पाहणे अगत्याचे आहे. स्वतः आठवले यांनी आपल्या ग्रंथात पुढील विधान केलेले आढळून येते, "त्रिकालज्ञ ऋषिमुनींनी निर्माण करून ठेवलेल्या नाडीग्रंथांच्या बाबतीत देखील कित्येकांना आजही खात्रीपूर्वक असे वाटते, की संहिताग्रंथातील ही भविष्ये म्हणजे कर्णपिशाचाची किमया आहे." (पृ. १२८) येथे आठवले 'त्रिकालज्ञ ऋषिमुनी' हे शब्द

---

[1] १. अशा प्रकारे प्रश्न विचारून 'हो' किंवा 'नाही' या उत्तरावरून भविष्य पाहणाऱ्याची सर्व माहिती मिळवता येत नाही, हे याविषयी प्रत्यक्ष प्रयोग करून पाहिल्यानंतर **बोधअंधश्रद्धेचा** या ग्रंथाचे लेखक विंग कमांडर शशिकांत ओक यांना आढळून आले आहे. (पृ. २५२-३)

ज्या वाक्यात वापरतात, त्याच वाक्यात 'कर्णपिशाचाची' ही किमया आहे असे म्हणतात. म्हणजे हे भविष्य 'त्रिकालज्ञ ऋषिमुनी' वर्तवतात, पण त्याला काहीजण अज्ञानाने 'कर्णपिशाचाची किमया' म्हणतात, असे त्यांना म्हणायचे आहे हे स्पष्ट आहे. प्रस्तुत लेखक ही कर्णपिशाचाची किमया नसल्याचे स्वानुभवाने निश्चितपणे सांगू शकतो. मद्रासच्या नाडीकेंद्रात भविष्य पाहणाऱ्या लोकांच्या सदैव रांगा लागलेल्या असतात. त्यांचे भविष्य कर्णपिशाचाच्या आधारे त्या केंद्रातील लोकांना भराभर सांगता आले असते. पण तसे होत नाही. बंडले हुडकावी लागतात. पान शोधून काढावे लागते. काही जणांची पट्टी लवकर सापडत नाही. काही जण पट्टी न सापडल्यामुळे निराश होऊन परत जातात. ही गोष्ट कर्णपिशाचाच्या साह्याने हे लोक भविष्य सांगत नाहीत हे सिद्ध करते. शिवाय नाडीपट्टीत आपले नाव लिहिलेले (कोरलेले) सापडते हे वेगळेच. **श्री. ओकांनी व प्रस्तुत लेखकाने आपले नाव नाडीपट्टीत असल्याची खात्री करून घेतली आहे. 'अंडिंग' हा शब्द नाडीपट्टीत असल्याची आठवले यांच्या मित्राने तमिळ वाचकाकडून स्वतच्री खात्री करून घेतल्याचा उल्लेख मागे आलाच आहे. स्वतःआठवले यांच्याविषयीचे संस्कृत श्लोक मूळ संहितेतून दीक्षितशास्त्रींनी वाचून दाखवल्याचाही उल्लेख मागे आला आहे.** या सर्व गोष्टी कर्णपिशाचाचा सिद्धांत पूर्णपणे खोटा ठरवतात. राहता राहिला ऋषिमुनींनी स्वतःकर्णपिशाचे वश करून हे नाडीग्रंथ लिहिले काय, हा प्रश्न. या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे. ऋषिमुनींना जी पिशाचे वश झाली, ती इतरांना का होऊ नयेत? पिशाचे हल्ली नाहीत असे थोडेच आहे ? कर्णपिशाच वश केलेल्या काही व्यवतींना प्रस्तुत लेखक भेटला आहे. ते भूतकाळ बरोबर (आणि भराभर) सांगू शकले, पण त्यांचा भविष्यकाळ चुकला. स्वतःआठवले यांनी महाड येथील बाबाजी पटवर्धन या कर्णपिशाच विद्येत प्रवीण असलेल्या एका गृहस्थाची माहिती आपल्या ग्रंथात दिली आहे (पृ. १२८) से एखाद्या व्यक्तीचा भूतकाळ (जन्मकालीन ग्रह) सांगू शकत, असे आठवले म्हणतात. भविष्यकाल सांगू शकत असल्याचा मात्र उल्लेख नाही.

नाडीचा भूतकाळ बरोबर येतो, पण भविष्य चुकते (?)

काहीजण नाडीचा भूतकाळ बरोबर येतो, पण भविष्य चुकते, असा आक्षेप

घेतात. या विधानातील 'भूतकाळ' आणि 'भविष्यकाळ' हे शब्द सापेक्ष आहेत, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. कारण **भविष्य पाहणाऱ्याच्या दृष्टीने जो 'भूतकाळ' असतो, तो ऋषिमुनीना (जेव्हा त्याची नाडीग्रंथ लिहिले त्यावेळी) 'भविष्यकाळ'च होता.** आणि पृच्छकाचा तो भूतकाळ त्या ऋषिमुनीनी अगोदर 'भविष्य' वर्तवल्यामुळेच बरोबर आला, हे तो नाकारू शकत नाही. तेव्हा 'भविष्य' चुकते हे म्हणणे बरोबर नाही. आता नाडीग्रंथात भविष्य पाहिलेल्या तारखेनंतरचे पृच्छकाचे भविष्य चुकत असेल तर ते का चुकावे, याला निश्चित काही कारण असले पाहिजे. **पण ते नेहमीचे चुकते हे खरे नाही; व असे सर्वांचे चुकते असे सर्वेक्षण करून कुणी सिद्ध केलेले नाही.** [2] उलट सर्वच भविष्य बरोबर आल्याचीही उदाहरणे आहेत. जे ऋषिमुनी एखाद्या व्यक्तीची जन्मवेळ, त्या व्यक्तीचे नाव, ती भविष्य पाहात असल्याचा दिवस व वेळ, ती व्यक्ती जन्मण्यापूर्वीच इतक्या अचूकपणे सांगू शकतात, ते ऋषिमुनी त्या व्यक्तीचे भविष्य पाहिलेल्या तारखेनंतरचे भविष्य मात्र सांगू शकत नाहीत, असे कसे म्हणता येईल?

भविष्य पाहिलेल्या तारखेनंतरचे भविष्य चुकत असल्यास ते ज्यांच्या बाबतीत चुकते त्यांचेच काहीतरी चुकत असले पाहिजे असे म्हणावे लागते. निदान अशा प्रकरणांचे संशोधन झाले पाहिजे असे तरी म्हणता येईल. असे संशोधन आठवले यांच्याही पूर्वी नाडीग्रंथांचा कसून व बरेच कष्ट घेऊन अभ्यास केलेल्या पुण्याच्या आर. एस्. वझे या निवृत्त न्यायाधिशांनी केला असून ते पाहणे उद्बोधक आहे.

श्री. वझे यांचा वेदीश्वरम् कोइल (तंजावरजवळील केंद्र) येथील कौशिक नाडीग्रंथाचा अनुभव सांगण्यासारखा आहे. ते आपल्या पत्नीची कुंडली शोधून काळताना घडलेला हा प्रसंग आहे. "ज्याचे भविष्य पाहायचे, त्याचे नेमके पान

---

[2] २. 'गिरिराज' हे टोपणनाव घेतलेल्या एका नाडी अभ्यासकाने २५ लोकांच्या नाडी-भविष्याचा अभ्यास केला. तेव्हा २० लोकांचे भविष्य पूर्ण असत्य ठरले, ३ लोकांचे ८०% सत्य ठरले व २ लोकांचे १००% सत्य ठरले, असे आढळून आले. (पृ. १४२)

शोधताना तो आपल्या मातापित्यांचा कितवा गर्भ, याची चौकशी करतात. ती बरोबर असली, तर मग भविष्याचे ते पान बरोबर, असे समजून नि:शंकपणे पुढे वाचले जाते.

"**काही मिनिटांच्या फरकाने ज्यांचे जन्म झालेले असतात, त्यांच्या जीवनात घडणाऱ्या घटनात विलक्षण साम्य असू शकते.** अशा वेळी भविष्याचे पान नेमके आपलेच आहे, हे नक्की ठरवता येणे फार अगत्याचे असते. कित्येक वेळा हा उलगडा न झाल्याने असा अनुभव येतो, की विशिष्ट वयापर्यंत आयुष्यातील घटनांची तंतोतंत प्रचिती येते व नंतर मात्र तफावत पडत जाते.

"श्री. वझे यांच्या पत्नीच्या वडिलांच्या नावाचे आद्याक्षर श्री. वझे यांना ठाऊक होते; मात्र नाडीग्रंथातील भविष्यात त्यांच्या पत्नीच्या आईचे नाव भागीरथी असे निघाले. श्री. वझे यांनी वाचन तेथेच थांबविले. पत्नीच्या आईचे नक्की नाव काय याबद्दलची माहिती त्यांनी टेलिफोनवरून विचारली व नाव भागीरथी नसल्याचे त्यांना कळले. तदनुसार त्यांनी वाचले जाणारे पान बाजूस ठेवले. नंतर वडिलांचे व आईचे नाव ज्या पानावर बरोबर निघाले, ते पान त्यांनी पूर्ण वाचून घेतले.

"कित्येक वेळा नाडीग्रंथातील भविष्ये काही ठराविक काळापर्यंतच पटतात व पुढे त्यात फरक पडतो; याचे कारण वरील उदाहरणात सापडते. नाडीग्रंथातील भविष्ये पटरा नाहीत असे ठामपणे म्हणण्यापूर्वी नाडीग्रंथ पाहताना आपली पद्धत निर्दोष होती की नाही, हे पाहणे अधिक अगत्याचे आहे." (पृ. ३९-४०)

वरील वझे यांच्या अनुभवातून काही गोष्टी स्पष्ट होतात. 'काही मिनिटांच्या फरकाने ज्यांचे जन्म झालेले असतात, त्यांच्या जीवनात घडणाऱ्या घटनात विलक्षण साम्य असू शकते' हे त्यांच्या पत्नीचे भविष्य काही विशिष्ट कालमर्यादेपर्यंत बरोबर आले व नंतर चुकत असल्याचे (त्यांच्या आईचे नाव वेगळे आल्यामुळे) त्यांना कळले, यावरून स्पष्ट होते. यावरून जन्मकालीन आकाशातील ग्रहस्थिती व जीवनातील घटना यांचा घनिष्ठ संबंध आहे हेही स्पष्ट होते. यालाच फलज्योतिष म्हणतात,

नाडीग्रंथातील भविष्याचा फलज्योतिषाशी संबंध येतो तो इथेच[3]. पण याला 'फलज्योतिष' म्हणणे चुकीचे आहे. का व कसे हे मी पुढे स्पष्ट करणार आहे. येथे नाडीचा व ग्रहांचा 'संबंध' आहे एवढेच लक्षात ठेवावे. (तो कोणता हे पुढे स्पष्ट करण्यात येईल.) नाडीग्रंथातील भविष्य चुकते याचा दोष ऋषिमुनींवर लादता येत नाही, हा मुद्दा नीट ध्यानात घ्यावा. त्यासाठी हे उदाहरण दिले आहे.

जाताजाता एका महत्त्वाच्या व नेहमी विचारल्या जाणाऱ्या एका प्रश्नाचे उत्तरही येथे देता येईल. तो प्रश्न असा : जगात एकाच वेळा कितीतरी बालके जन्माला येतात. त्यांची जन्मवेळ एकच असल्यामुळे त्यांच्या जीवनातील घटना तंतोतंत सारख्याच असल्या पाहिजेत. पण असे काही घडून येत नाही, असे का? पहिली गोष्ट म्हणजे 'एकाच वेळी' हा शब्दप्रयोग चुकीचा आहे. विश्वात 'एकच 'वेळ' म्हणून काही नाही, असे आता आईन्स्टाइनच्या सापेक्षता सिद्धांताच्या आधारे शास्त्रज्ञ म्हणतात. (कालाच्या निरपेक्षतेच्या Absolute time च्या - न्यूटनच्या कल्पनेत 'एकच वेळ' असू शकते. ती कल्पना आता खोटी ठरली आहे.) दुसरी गोष्ट, आकाशातील जन्मकालीन सारख्याच ग्रहस्थितीमुळे जीवनात सारखेपणा असणे म्हणजे तादात्म्य (identity) असणे नव्हे. अशा व्यक्तीचे जीवन साच्यातून काढलेल्या गणपतीसारखे

---

[3] ३. अशाच प्रकारचा संबंध नाडीग्रंथातील भविष्याचा व आंगठ्यावरील (वा हातावरील) रेषांचा असल्याचा आढळून येतो. काही मिनिटांच्या फरकाने जन्मणाऱ्या व्यक्तींच्या भविष्यात जसे विलक्षण साम्य आढळून येते, त्याचप्रमाणे आंगठ्यावरील रेषांत किंचित फरक असलेल्या व्यक्तींच्या भविष्यात देखील विलक्षण साम्य असल्याचे आंगठ्याच्या ठशावरून हुडकून काढलेल्या बंडलातील पाने वाचताना (स्वतःचे पान हुडकून काढतेवेळी) भविष्य पाहणाऱ्याला आढळून येते. यावरून महाप्रमाणेच हातापरीज वा आंगठ्यावरील रेषांचा सुद्धा नाडीशी घनिष्ठ संबंध आहे, असे म्हणावे लागते. जन्मकुंडलीप्रमाणेच हाताच्या (वा आंगठ्याच्या) रेषांचा भविष्यकथनासाठी कसा व का उपयोग होतो हे यावरून स्पष्ट होते.

हुबेहूब असते, अशी कल्पना करणे चुकीचे आहे. याचे कारण मानवी जीवनातील घटना ग्रह ठरवीत नाहीत; मानवाची कर्मे ठरवितात. त्यामुळे ग्रहांचा मानवी जीवनावर 'परिणाम' होतो, असे म्हणणे (यालाच फलज्योतिष म्हणतात) चुकीचे ठरते. (हे पुढे अधिक स्पष्ट करण्यात येईल.) म्हणून नाडीग्रंथांचा व फलज्योतिषांचा या दृष्टीने काही संबंध येत नाही. **ज्योतिषशास्त्र खोटे ठरवून नाडीग्रंथ खोटे ठरवता येत नाहीत, असे मी याच कारणासाठी म्हणतो.** (ज्योतिषशास्त्रही केवळ तर्कवादाने खोटे ठरवता येत नाही.) पण केवळ तर्कवादाचा आश्रय घेऊन नाडीग्रंथ खोटे ठरविण्यासाठी **नाडीग्रंथांची परीक्षा कसेही करून टाळण्यासाठी** बुद्धिवादी नेहमीच असा अनुभवशून्य तार्किक काथ्याकूट करीत - असतात. नाडीग्रंथांचा व जन्मकालीन आकाशस्थ ग्रहस्थितीचा कसा संबंध नाही हे वाचकांना कळावे म्हणून एम्. आर्. आजगावकर यांचे येथे उदाहरण देतो. श्री. आजगावकर हे नाडीग्रंथ व अशाच विषयांचा बराच अभ्यास केलेले अनुभवी गृहस्थ आहेत. त्यांचे या विषयावरील विवेचन त्यांच्याच शब्दात दिले तर वाचकांना माझा मुद्दा नीट कळेल. ते म्हणतात, "अनेक पट्ट्या तपासल्यानंतर तूळ लग्न प्रथम अंशाची पट्टी बरोबर ठरली. तिच्यातील भविष्यवर्णनात माझे, माझ्या पत्नीचे, माझ्या मातापित्यांचे नाव गाव अचूक निघाले. नोकरीधंद्याचे वर्णन पण बरोबर आले. ज्या प्रश्नासाठी मी भविष्य पाहण्यास आलो होतो, त्याचा पण उल्लेख निघाला. एका धवलपुरुषाशी (white man) संबंध येऊन सागरी वाहतुकीसंबंधीचे नये काम मिळेल, हे संहितेचे भाकित अंशतःप्रत्ययास आले. "

"सूर्यसंहितेने माझी तूळ लग्न १ अंशाची कुंडली गृहीत धरून दिलेले भविष्य बरोबर ठरले. वास्तविक माझी कुंडली तूळ लग्न २१ अंशाची आहे. मीरतचे भृगशास्त्री श्री. दीक्षित यांनी याच अंशाचे माझे भविष्य भृगुसंहितेतून वाचले व ते जमले. कुंडलीचे अंश चुकले तरी भविष्य मात्र चुकत नाही, हा अनुभव पुष्कळजणांना आलेला आहे. याच्यामागे काय रहस्य आहे, याचा उलगडा होत नाही. त्याचा विचार झाला पाहिजे.

"ग्रहाचे निमित्त करून, दुसऱ्याच एका गूढ शक्तीच्या द्वारे तर भविष्य वर्तविली जात नसतील ना, असे वाटण्यास जागा आहे व याचाही शोध नीट घेतला जाणे

आवश्यक आहे." (पृ. १६० १६१) आजगावकर येथे नाडीग्रंथांच्या सत्याच्या अगदी जवळ आले आहेत.

हांचे अंश चुकले तरी भविष्य चुकत नाही, यावरून ग्रहांचा व नाडीग्रंथांचा काही संबंध नाही ही गोष्ट तर स्पष्ट होतेच, पण ग्रहांचा 'परिणाम' किंवा 'फलादेश' म्हणून मानवी जीवनातील घटना घडत नाहीत, तर वेगळ्याच कारणामुळे स्वा घडतात हेही यावरून स्पष्ट होते. हे वेगळे कारण कोणते हे वर सांगितलेच आहे. ते कारण म्हणजे पूर्वजन्मातील त्या व्यक्तीचे कर्म असून नाडीग्रंथलेखक ऋषिमुनी आपल्या योगसिद्धीमुळे मानवी जीवनातील त्याच्या कर्मामुळे घडणाऱ्या घटना, किंबहुना संपूर्ण विश्वातील सर्व घटना, जाणू व सांगू शकतात हे मान्य करावे लागते. आठवले यांनीही आमच्या पूर्वजांनी... या ग्रंथांच्या निर्मितीत योगसिद्धीमुळे प्राप्त झालेल्या दिव्य त्रिकाल ज्ञानाचाही उपयोग केला आहे, असे मानण्यावाचून गत्यंतरच उरत नाही" असे स्पष्ट म्हटले आहे. (पृ. ६४) स्वतःआजगावकरांनाही " नाडीग्रंथातील चमत्कार केवळ त्या ग्रंथकर्त्यांच्या ज्योतिषज्ञानावर आधारित नाहीत, तर त्याच्या मागे काही अतींद्रिय दिव्य गूढ शक्तींचा भाग निश्चितपणे आहे" या निष्कर्षावर यावे लागल्याचे आठवले म्हणतात. (पृ. १५८)

भविष्य चुकत नाही, मुद्दाम चुकविले जाते

पुढे जन्मणाऱ्या जगातील कोट्यावधी माणसांपैकी भारतात कुठेतरी जन्मलेल्या एखाचा सामान्य व्यक्तीच्या खासगी जपातील एखादी क्षुल्लक चूकसुद्धा ज्या ऋषिमुनींनी हजारो वर्षांपूर्वी लिहून ठेवली आहे, त्या ऋषिमुनींचे भविष्य ती व्यक्ती नाव पाहिल्यानंतर मात्र चुकीचे यावे, हे आश्चर्य नव्हे काय? पण ते चुकते हे खरे. आणि म्हणून या चुकीमागेसुद्धा त्या त्रिकालज्ञ ऋषिमुनींचा काही हेतू असावा असा संशय येतो. म्हणजे ते भविष्य मुद्दामच चुकीचे सांगितले जात असावे, असे म्हणावे लागते. आणि या म्हणण्याला बळकटी आणणारी उदाहरणेही आढळून येतात. त्यामुळे नाडीग्रंथांच्या निर्मितीमागचा म्हणजे भविष्य वर्तविण्याचा ऋषिमुनीचा उद्देशही त्या निमित्ताने स्पष्ट होतो. तो म्हणजे मानवाने भविष्यवादी नियतीवादी होऊ नये, स्वतःच्या प्रयत्नावर विश्वास ठेवावा. भविष्य सांगणाऱ्या - ऋषिमुनीनीच

भविष्यावर विश्वास ठेवू नये, या उद्देशाने हे भविष्यावर ग्रंथ लिहिले हे विधान विसंगत वाटले तरी ते तसे नाही. हे काही उदाहरणांनी स्पष्ट करता येईल. -

श्री. आजगावकरांचे मित्र श्री. वसंतराव तळेकर यांचे कौशिक नाडीतील पूर्वायुष्यातील भविष्य तंतोतंत खरे आले, पण उत्तर आयुष्यातील भविष्य चुकले. त्यांच्या छातीचा विकार डॉक्टरी उपायांनी बरा होईना, म्हणून कौशिक नाडीतील आरोग्य खंड ७५ रू. देऊन पाहिला. त्याचे आजगावकरांच्या शब्दात है भविष्य वर्णन:

"त्या खंडातील श्री. तळेकर यांच्या भविष्य वर्णनात आई-वडील, त्यांची पत्नी व चार मुले यांची नावे बरोबर निघाली. एका मुलीचे आधी ठेवलेले जयश्री हे नाव तीन वर्षानंतर बदलून संध्या असे ठेवले होते. हा बारकावा त्यात आवळला.

"जातकाला वासकासाची पीडा झाली आहे व ती होण्याचे पूर्वजन्मीचे कारण त्यात दिले होते. संहितेत आयुर्वेदीय उपचार व त्यासाठी त्या औषधांची यादी दिलेली आढळली. त्या औषधात काही विषद्रव्यांचा वापर आवश्यक असल्यामुळे से एखाद्या सिद्ध वैद्याकडून करून घ्यावे, असा सल्ला होता व **अशा एका वैद्याचा दक्षिणेतील पत्ता देखील संहितेने पुरवला होता. त्या वैद्याने औषध दिले व त्याच्या सेवनाने श्री. तळेकर बरे झाले.**

"कौशिक नाडीने वर्तविलेल्या भविष्याप्रमाणे तळेकर पुढे मोठ्या हुद्यावर व पगारावर सहकुटुंब वाशिंग्टन (अमेरिका) येथे गेले. ५-६ वर्षे त्यांची सर्वप्रकारे भरभराट झाली. श्री. तळेकर यांच्या भविष्यात ते वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त होतील, त्यांची दोन घरे होतील व एकूण आयुष्य ६७ वर्षांपर्यंत लाभेल, असे वर्णन होते.

"श्री. तळेकर हे १०-३-१९५४ या दिवशी वाशिंग्टनमधील ऑफिसात खुर्चीवर येऊन बसले. तेथे त्यांची हृदयक्रिया बंद पडून त्यांचे निधन झाले. नाडीग्रंथाने वर्तविलेल्या काही घटना काटेकोर प्रत्ययास आल्या, तर उत्तर आयुष्यातील घटना प्रत्यक्ष घडण्यापूर्वीच श्री. तळेकर हे अकाली आणि आकस्मिकपणे जग सोडून गेले." (पृ. १५८)

आता ज्या ऋषींनी तळेकरांचा रोग कोणता हे बरोबर सांगितले, त्यावर औषध कोणते घ्यावे, ते कुठे मिळते. हे बरोबर सांगितले, त्या वैद्याचा पचाही बरोबर सांगितला, व त्या औषधामुळे त्यांना गुणही आला) त्या ऋषीना त्यांचा मृत्यू केव्हा होईल हे कळले नाही, यावर विश्वास कसा ठेवावा? त्या ऋषींनी तळेकरांना जर अमेरिकेत नोकरीच्या जागी मृत्यू येणार आहे असे अगोदर भविष्य सांगितले असते, तर ते अमेरिकेत नोकरी करण्यासाठी गेले असते का? कोणी मृत्यूचे भविष्य खरे ठरविण्यासाठी एवढे कष्ट घेणार नाही. उलट मृत्यूचे भविष्य चुकीचे ठरविण्यासाठी मात्र कष्ट घ्यावे लागले तरी ते आनंदाने घेईल! हा मनुष्य स्वभाव आहे. कौशिक मुनींनी तळेकरांच्या मृत्यूचे भविष्य त्यांची दिशाभूल करण्यासाठीच चुकीचे सांगितले, हा तर्क जास्त सयुक्तिक वाटतो. इतर ऋषीच्या भविष्याचाही याला आधार आहे. उदा. भृगुसंहितेचे हे भविष्य पाहा,

"एकदा एक श्रीमंत लक्षाधीश आपले संहितेतील भविष्य पाहण्यासाठी (दीक्षितशास्त्रींकडे आला. कुंडली बरोबर आहे की नाही हे पाहिल्यानंतर 'इष्ट' पान काढताना प्रस्तुत भविष्य वाचू नये असा आदेश आला. त्या श्रीमंत माणसाची (भृगुशास्त्रींना) निराशा करावी लागली. पुढे काही दिवसानी तो धनिक मृत्यू पावल्याचे वृत्त समजले." (पृ. ८९) त्या धनिकाचा मृत्यू लवकरच होणार असल्यामुळे तो त्याला कळू नये हा

भृगु ऋषींचा उदेश येथे स्पष्ट दिसतो. त्या धनिकाला आपला मृत्यू अगोदर कळला असता तर तो ज्या काही गोष्टी पुढील अल्प आयुष्यात करणार होता, त्या त्याने केल्या नसत्या, किंवा वेगळ्या केल्या असत्या आणि तसे त्याने करू नये हा भृगूंचा उद्देश येथे स्पष्ट दिसतो. जेवे हा उद्देश साध्य होत नाही, तेथे मृत्यूच चुकीचा सांगण्यात येतो. इतर भविष्यही चुकीचे सांगण्यात हाच उद्देश असावा - जो सामान्य माणसाच्या दृष्टीला उमगत नाही, पण त्रिकालज्ञ ऋषीच जाणू शकतात. सामान्य मानवी बुद्धीला फक्त भविष्य चुकल्याचे तेवढेच दिसते. पण भविष्य सांगण्याच्या हेतूचा तो विचार करीत नाही. **भविष्य सांगून प्रयत्नांना खीळ बसावी असा ऋषिमुनींचा भविष्यकथनामागे हेतु नाही,** तर मनुष्याने जेथे शक्य होईल तेथे भविष्याचा अवश्य उपयोग करून घ्यावा; पण नेहमी त्यावर अवलंबून राहू नये. हे

ऋषिमुनींना अभिप्रेत आहे. **आणि भविष्याचा जेथे उपयोग होतो तेथे भविष्य बरोबरच येते.** उदा. तळेकरांचा रोग भविष्यवाचनामुळे बरा झाला. **पण जेथे त्याचा उपयोग नाही तेथे ऋषिमुनी मुद्दामच चुकीचे भविष्य सांगतात. तेथे मनुष्याने प्रयत्न करावा असे त्यांना अभिप्रेत असते.** तळेकरांचा मृत्यू चुकीचा सांगून त्यांना अमेरिकेत ५-६ वर्षे भरभराटीचे घालवण्यास प्रवृत्त केले. तो त्यांच्या प्रयत्नाच्या आधीन असा भाग होता. उलट छातीचा विकार डॉक्टरी उपायाने बरा होईना म्हणून ऋषिमुनींनी त्यांना योग्य मार्गदर्शन केले. तेथे तळेकर प्रयत्न करून थकले होते. म्हणूनच ते नाडीग्रंथाकडे वळले होते. आणि नाडीग्रंथाने त्यांना योग्य मार्गदर्शन करून साह्य केले.

भविष्यकाळ कळू नये, कळला तर चुकीचा कळावा, भूतकाळ मात्र बरोबर असल्याचा अनुभव यावा, यामध्ये ऋषिमुनीचा उद्देश **भविष्य पाहण्याचा कोणी सतत उद्योग करू नये, स्वतःच्या प्रयत्नावर पूर्ण विसंबून आपले कर्तव्य कर्म करीत राहावे (गीतेतील कर्मयोग आचरावा), याबरोबरच निसर्गाने (ज्यांचा परमेश्वरावर विश्वास आहे त्यांच्या दृष्टीने, परमेखराने मानवाला भविष्य अज्ञात राहावे अशीच योजना केली आहे, हे सत्यही त्याला कळावे, हाही त्यांचा उद्देश स्पष्ट दिसून येतो.** याचे प्रत्यंतर मागे दिलेल्या 'गिरिराज' यांच्या २५ लोकांच्या नाडी भविष्याच्या अभ्यासातून येते. तळटीप पहा.) २५ लोकांचे सँपल अपुरे असले तरी ८० टक्के लोकांचे भविष्य चुकते, असे जे त्यांना त्यात आढळून आले, त्यातून हाच निष्कर्ष निघत असल्यामुळे तो फारसा चुकीचा आहे असे म्हणता येत नाही. ही गोष्ट स्वतः'गिरिराज' यांनीच दिलेल्या त्यांच्या नाडीभविष्याच्या एका विलक्षण अनुभवाच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. **हे विलक्षण अनुभवाचे उदाहरण** त्यांच्याच शब्दात देतो

"माझ्या एका मिश्रच्या हातून एक गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडला होता. त्यासंबंधी अर्थातच मला अजिबात माहिती नव्हती. ती गोष्ट त्या मित्राशिवाय कोणालाच ज्ञात नव्हती. अशावेळी त्या मित्राची कुंडली मेऊन मी श्री. बाबूभाईंच्याकडे (मित्राच्या सांगण्यावरून गेलो असता मला त्या मित्राने केलेल्या गुन्ह्याची इत्यंभूत हकीगत ऐकण्यास मिळाली. अर्थातच, गुन्हा हातून घडण्यापूर्वी मात्र तशा प्रकारचे वर्णन त्या ग्रंथात ऐकण्यास मिळाले नाही. आम्ही जानेवारी महिन्यात त्या मित्राची कुंडली घेऊन श्री. बाबूभाईकडे गेलो होतो. त्यावेळी अर्थातच

त्याच्या हातून भविष्यकाळात (नोव्हेंबर महिन्यात) तशा प्रकारचा गुन्हा घडणार, अशी नोंद नव्हती; परंतु सुमारे एक वर्षांनंतर परत श्री. बाबूमाईकडे (जानेवारीमध्ये) मी गेलो असता, मित्राने सुमारे दोन महिन्यापूर्वी केलेल्या गुन्ह्याचा वृतांत त्यात वाचण्यास मिळाला. हे अद्भुत उदाहरण डोळ्यापुढे ठेवल्यानंतर पोलिस व सी. आय. डी. खात्यातील लोकांनाही गुन्हा शोधण्याच्या दृष्टीने या शास्त्राचा उपयोग होण्याची शक्यता आहे, असे मला वाटते." (पृ. १४६)

आपल्या मित्राच्या ज्या गुन्ह्याची माहिती गुन्हा पडण्यापूर्वी (नोव्हेंबरमध्ये) नाडीत 'गिरिराज' यांना वाचावयास मिळाली नव्हती, ती माहिती गुन्हा घडल्यानंतर कुठून व कशी का मिळेना (पावर 'गिरिराज' काही लिहीत नाहीत). भूतकाळ कळावा, पण भविष्यकाळ कळू नये हीच यात योजना असल्याचे स्पष्ट दिसून येते. भविष्यकालीन गुन्हा त्या व्यक्तीला कळला असता तर तिच्या हातून तो कदाचित घडलाच नसता. पण तो घडावा अशीच नियतीची (ऋषिमुनींची) योजना होती. समजा, त्या मित्राला त्याचे पुढील गुन्ह्याचे भविष्य कळले असते व त्याने तो गुन्हा टाळला असता, तर मग नाडीचे भविष्य चुकले असे म्हणता आले असते. मग माणसाला आपला भूतकाळ बरोबर कळावा, पण भविष्यकाळ चुकीचा कळावा हा ऋषींचा उद्देश असल्याचे म्हणजे परत बरोबर ठरले असते! पण 'बुद्धी कर्मानुसारिणी' या सिद्धांतानुसार कर्म बलवत्तर असल्यामुळे 'गिरिराज' यांच्या मित्राला आपला भविष्यकालीन गुन्हा कळू नये व तो त्याच्या हातून पडावा व घडल्यानंतरच कळावा अशीच नियतीची योजना होती व ऋषिमुनींनाही तेच अभिप्रेत होते, असे म्हणावे लागते. येथे पोलिसांना गुन्हा शोधून काढण्यास नाडीचा उपयोग होतो असे 'गिरिराज' म्हणतात. म्हणजे भूत असो, भविष्य असो, **नाडीचा मानवाला जेथे 'उपयोग होतो, तेथेच नाडीचे वाचन व्हावे- उठसूट ते वाचण्याचा उद्योग काम नये,** असा ऋषिमुनींचा नाडीग्रंथलेखनाचा उद्देश पुन्हा स्पष्ट होतो.[4] अशा रीतीने नाडीतून अनेक चिरंतन

---

[4] ४. नाडीचा मानवाला संकटकाळीच उपयोग होतो. म्हणून संकटकाळीच भविष्य पाहावे; ऊठसूट पाहू नये, हा त्यांचा अभिप्राय

सत्यांचे मानवाला ऋषिमुनी दर्शन घडवून देतात. म्हणूनच 'गिरिराज' यांनी "भारतातील या एकाच ग्रंथामुळे हजारो गोष्टींचा उलगडा होण्यास मदत होईल" असे शेवटी म्हटले आहे. (पृ. १४६)

नाडी भविष्य आणि कर्मसिद्धांत

कर्म बलवत्तर असेल तर जे घडायचे आहे तेच घडते व ते नाडीवाचनातून प्रत्ययास येते, असे वरीलसारख्या उदाहरणावरून म्हणावे लागते. अशा वेळी नाडीवाचनाच्या तारखेनंतरचे भविष्यही मग १०० टक्के खरे ठरते. याचीही अनेक उदाहरणे आढळून येतात. येथे नमुन्यासाठी काही देतो.

इ. स. १९४३ साली भारत सरकारच्या परराष्ट्र खात्यातर्फे डॉ. गोरे यांना परदेशी जाण्याची संधी मिळाली. १९४९ पर्यंत ते परदेशातच होते. १९४९ साली ते परत स्वदेशी आले. परत आल्यानंतर आपल्या मूळ शिक्षकाच्या जागी आपणास रूजू व्हावे लागू नये उलट आपला समावेश दिल्ली येथील सरकारी - संशोधन खात्यात किंवा 'सायंटिफिक डिफेन्स ऑर्गनायझेशन' मध्ये व्हावा अशी त्यांनी जोराची खटपट केली. पण त्यांच्या कुठल्याही प्रयत्नांना यश न येता त्यांना आपल्या मूळच्या शिक्षकाच्या जागीच पुन्हा काम सुरू करावे लागले.

"या घटनांचा स्पष्ट उल्लेख 'अरुणसहिते' मधील त्यांच्या कुंडलीच्या फलादेशात आढळला. 'अरुणसंहिता' ज्यांच्यापाशी होती, त्या ज्योतिष्याला देखील यापैकी कोणतीही घटना आधी माहीत नव्हती. अरुणसंहितेत म्हटले होते की, परदेशाहून परत आल्यानंतर 'आतकीला आपल्या मूळ शिक्षकाच्या जागेवर जावे लागेल'. १९४४ सालच्या डॉ. गोरे यांच्या 'भृगुसंहितेतील भविष्यात म्हटले होते की, 'या गृहस्थास 'राजदूत' म्हणून परदेशी प्रवास घडेल व तो परदेशी असताना भातृभूमीत त्याचा भाऊ, पुतण्या, सासरा यांचे मृत्यू घडतील. या घटना खरोखरच महल्या.

"डॉ. गोरे यांच्या पत्नीला डॉक्टरांच्या वयाच्या ३८ व्या वर्षी अपणात झाला. या अपघाताचा नुसता उल्लेखच भृगुसंहितेत आढळला नाही, तर अपघात गुडघ्याला होईल, असेही त्यात म्हटले होते. १९५१ साली सुमारे १० वर्षांच्या कालावधीनंतर

'काकी' यास कन्या संतती होईल असे अरुणसंहितेत म्हटले होते, त्याचाही जिवंत प्रत्यय डॉ. गोरे यांना आला.

"त्यांचा एक मित्र डॉक्टर आहे. त्याच्या कुंडलीचे भविष्य सांगताना, त्याचा भाऊ त्याच्या विशिष्ट वयात एकाएकी मृत्यू पावेल, असे संहितेत म्हटले होते. आश्चर्य असे, की एके दिवशी डॉक्टरांचा भाऊ बागेत फुले तोडीत होता. ते काम करून घरात आला, खाली बसला आणि गतप्राण झाला. स्वतःडॉक्टर असूनही त्या क्षणी त्या गृहस्थांना ते दृश्य उघड्या डोळ्यांनी पाहण्यापलीकडे काही करणे शक्य झाले नाही." (पृ. २१-२२)

येथे डॉ. गोरे यांच्या डॉक्टर मित्राच्या भावाचा मृत्यू अचानक झाला आहे. तो टाळण्यासारखा नव्हता. म्हणून त्याचे भविष्य त्याला कळूनही तो काही करू शकत नव्हता, म्हणून तो ऋषिमुनींनी सांगितला. तळेकरांचा मृत्यू मात्र त्यांच्या आर्थिक भरभराटीच्या काळी अमेरिकेत पडणार असल्यामुळे तो त्यांना अगोदर कळला असता तर तो टाळण्यासाठी त्यांनी कदाचित स्वतःची आर्थिक भरभराट करणारी अमेरिकेतील नोकरी धरली नसती. म्हणून नादीने तो सांगितला नाही.

कर्म बलवत्तर असतेच; पण ते तसे असल्याचे नाडी वेगवेगळ्या रीतीने प्रत्ययास आणून देते. केवळ भविष्य चुकीचे की बरोबर एवढेच पाहणारा बुद्धिवाद येथे तोकडा पडतो.

दुसरे उदाहरण आजगावकरांनी दिले आहे, ते त्यांच्याच शब्दात देतो, "आमच्या एका स्नेह्याच्या भगिनीचे वैवाहिक जीवन विफल झाले होते. पतीच्या व्यसनांनी व दुर्गुणांनी घरातील सर्वस्व नष्ट झाले होते. धन नाही, संतान नाही, मन जागेवर नाही, अशा अवस्थेत ती माहेरच्या आश्रयाला आली होती. आपले भविष्य भृगुसंहितेत पाहिले जावे म्हणून ती शास्त्रीजींकडे आली होती. शास्त्रीजी तिचे भविष्य पाहण्यास उत्सुक नव्हते; तरी पण ते त्यांना वाचावे लागले, **त्या वाचनात तिच्या पूर्वकर्मामुळे तिला हे भोग भोगणे अटळ आहे, असा भृगूंचा निर्णय निघाला.** त्यावर शुक्राने तिच्यासाठी रदबदली करून मृगूंनी कृपाळूपणे दुःखमुक्तीसाठी तिला एखादी उपासना, साधना सांगावी असा आग्रह धरला. (भृगुसंहितेतील भविष्य भृगुशुक्र- संवादाच्या

रूपाने सांगितले जाते.) त्यावर भृगूंनी सांगितले, की तिच्याबद्दल **सहानुभूती वाटत असूनही आपण काहीही करू शकत नाही.** हे भृगूचे नेहमीपेक्षा वेगळे व कठोर उत्तर शुक्राला सहन झाले नाही. शुक्र संतापून म्हणाला, 'या अभागिनीसाठी भृगूंनी दयार्द्र हावे म्हणून मला आता लढा करावा लागेल.' शुक्राचा तोच शब्द पकडून त्यानंतर भृगूनी सांगितले, 'लढा तू काय करणार? तो तर सुरू होऊन चार दिवस झाले आहेत. आणि या ओघात भृगूंनी त्यावेळी चालू झालेल्या **भारत-पाकिस्तान संघर्षाचे अचूक वर्णन केलेले ऐकावयास मिळाले व पुढे ते तंतोतंत प्रत्ययास आले.** त्या संवादात भारताने अणुबाँब का तयार करू नये, या शुक्राच्या प्रश्नास उत्तर देताना **श्री. भाभा व त्यांच्या कर्तबगारीचा आणि त्याचबरोबर त्यानंतर होणाऱ्या त्यांच्या दुःखद अकाली निधनाचाही उल्लेख भृगूंनी चातुर्याने केला होता. हे भविष्य वाचले गेल्यानंतर चारच महिन्यांनी खरोखरच भाभा आकस्मिकपणे विमान अपघातात मृत्यू पावले.** पृ. १६६-१६७)

कर्म बलवत्तर असेल तर ऋषी व नाडीग्रंथ काही करू शकत नाहीत याचे हे त्यांच्याच शब्दातील स्पष्टीकरण आहे. कर्मविपाक साधणे हे ऋषींचे काम आहे. **नाडीचा उद्देश कर्मविपाक सुलभ रीतीने व यथान्याय घडवून आणणे हा आहे. भविष्य बरोबर सांगणे हा नाही.** जेथे मनुष्य हस्तक्षेप करू शकतो तेथे चुकीचे भविष्य सांगूनसुद्धा तो कर्मविपाक साधण्यात येतो, जसे तळेगाव यांच्याबाबतीत साधण्यात आला; वा भविष्य सांगण्याचे टाळूनसुद्धा तो साधण्यात येतो, असे तो धनिकाच्या बाबतीत सामण्यात आला; वा आपली असहाय्यता व्यक्त करूनसुद्धा साधण्यात येतो, जसे आजगावकरांच्या मित्राच्या अभागी भगिनीच्या बाबतीत साधण्यात आला आणि जेथे कोणीही हस्तक्षेप करू शकत नाही अशा प्रसंगी भविष्य तंतोतंत बरोबर सांगून तो साधण्यात येतो, जसे डॉ. गोरे यांच्या बाबतीत किंवा त्यांच्या डॉक्टर मित्राच्या भावाच्या बाबतीत पडले, किंवा डॉ. भाभांच्या बाबतीत या भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्धाबाबतीत घडले, किंया नैसर्गिक घटनांच्या बाबतीत नेहमीच पडू शकते, जसे पुढील उदाहरणात घडले. हे नैसर्गिक उदाहरण आजगावकरांच्याच शब्दात देत आहे (या उदाहरणात श्री. अच्युतभाई : यांनी

गिरणीसाठी जपानहून आणलेले एक उघड्यावरील यंत्र कुठे ठेवावे, या प्रश्नाचे निमित्त करून भृगूंनी एका नैसर्गिक घटनेचे बरोबर भविष्य वर्तविले आहे.)

"**भृगु** - या पाहुण्याची प्रकृती अंघोळीने विपडते आणि उघडयावर पाऊस आला तर?

शुक - पण गुरुदेव, पाऊस आहेच कुठे? या मोहमय (मुंबई) नगरीतून पाण्याअभावी लोकांना हलविण्याची योजना चालू आहे. तेव्हा पावसाची चिंता कशाला ?

भृगु - लोकांच्या चिंता निवारण्यासाठी व स्वास्थासाठी पर्जन्याच्या आगमनाची व्यवस्था आम्ही करू. (या ठिकाणी विवक्षित तिथीचा उल्लेख मृगूंनी केला, त्या तिथीच्या दिवशी इंग्रजी तारीख २ येत होती.)

शुक्र - आणि पाऊस नव आला तर?

भृगु - पाऊस अवश्य येईल, आम्ही निर्देशिलेल्या तिथीला त्याचे आगमन होईलच होईल. आणि ऐक शुक्रा, त्यानंतर सतत २१ दिवसापर्यंत तो पडतच राहील. पावसासाठी धावा करणारे लोक तो थांबावा म्हणून प्रार्थना करू लागतील.

"अच्युतभाईच्या जपानी यंत्राचे निमित्त करून भृगूनी दिलेला हा भविष्यरूप दिलासा गतवर्षी सर्वांच्याच प्रत्यक्ष प्रत्ययास आला; कारण जुलै २२ पर्यंत मुंबईत पावसाचे किंचितही चिन्ह नव्हते. त्या रात्री महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आकाशवाणीवर भाषण करून पावसाअभावी निर्माण होणाच्या परिस्थितीला तोंड देता यावे म्हणून मुंबईच्या नागरिकांनी आपापल्या जन्मगावी जावे, असे आवाहन केले होते. २३ तारखेच्या पहाटे ४ वाजता भूगूंच्या भाकिताप्रमाणे पावसास सुरुवात झाली तीही जोरदार पुढे सतत २९ दिवस मुंबईत पावसाची संततधार होती हे सर्वश्रुतच आहे. अशा प्रकारे भृगूंची भविष्यवाणी अक्षरशःखरी ठरली." (पृ. १६४-१६५)

येथे (व यापूर्वी दिलेल्या उदाहरणात) व्यक्तीचा कर्मविपाकच नव्हे तर संपूर्ण मानवसमूहाचा कमविपाकसुद्धा कसा अगोदरच ठरून गेला आहे, हे भृगुसंहितेच्या

अचूक भविष्यातून व्यक्त झाले आहे. मानवी जीवनातीलच घटना नव्हे, तर संपूर्ण विसातील घटनासुद्धा त्रिकालज्ञ ऋषी जाणतात याचा हा साक्षात पुरावा आहे. **त्या घटना अगोदरच ठरून गेल्या असल्यामुळेच ते जाणतात, हे स्पष्ट आहे. ते हेही जाणतात की आपल्या भविष्याचा कोणाला उपयोग होणार आहे, ते कोण वाचणार आहे. आणि अशाच व्यक्तींचे व घटनांचे भविष्य त्यांनी आपल्या ग्रंथातून लिहून ठेवलेले आहे. जगातील प्रत्येक व्यक्तीचे भविष्य लिहिणे कसे अशक्य आहे असा फसवा पुक्तिवाद करून हे ग्रंथ म्हणजे एक प्रचंड फसवणूक आहे, असा धादांत खोटा प्रचार करणारे बुद्धिवादी त्यामुळे पूर्ण उघडे पडतात!** आणि आपण उघडे पडतो हे ते पक्के जाणून असल्यामुळेच या ग्रंथांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचे ते कसेही करून टाळतात व घरी बसून शुल्क तर्कवाद करीत असतात!

नाडीतील जप दान (शांती) अंधश्रद्धा आहे काय?

नाडीग्रंथात पूर्वजन्मातील कर्मामुळे भोगावे लागणारे दुख्र व कष्ट कमी करण्यासाठी जप दान यासारखे काही उपाय सांगितलेले असतात. याला 'शांती' म्हणतात. हा नाडीवाल्यांचा पैसे उकळण्यासाठी नाडीत घुसडलेला भाग असतो, असे काही जण म्हणतात. पण खुद्द ऋषीमुनींनीच ही शांती सांगितली असल्याचे अस्सल नाडीग्रंथाच्या आधारे म्हणता येते. कर्माचा भोग भोगावाच लागत असेल तर 'शांती' चा उपाय ऋषीमुनी कसा सांगतील? त्याचा उपयोग काय? हा येथे पहिला प्रश्न आणि पूर्वजन्म आहे याला पुरावा काय? हा दुसरा प्रश्न. पूर्वजन्म- पुनर्जन्म याबद्दलचा पुरावा देण्याचा नाडीग्रंयांचा उद्देश नाही. नाडीग्रंथांनी दिलेल्या उपायाचा प्रत्यक्ष परिणाम आढळून आला तर तो ग्रंथ पाहणाऱ्या पीडितास आपोआपच त्याचा अनुभव येतो. दुसऱ्या पुराव्याची जरूरीच नाही. आणि ही अंधश्रद्धा नसल्याचेही त्यातून अनायासेच सिद्ध होते आणि **कर्माचा भोग भोगावाच लागतो हा सिद्धांत त्यामुळे खोटा ठरत नाही. तो भोग भोगण्यासाठीच जप दान असते. से प्रायश्चित आहे**. जेथे कर्म बलवत्तर या फारच अशुभ असते तेथे ते भोगावेच लागते. 'शांती' मुळे तो भोग थोडा कमी वा सुसहा किंवा हलका होतो, इतकेच. किंवा जेथे तसे होण्याजोगे नसते तेथे (आजगावकरांच्या मित्राच्या भगिनीप्रमाणे) तो 'शांती' चा उपायही मग ऋषीमुनी सांगत नाहीत. ते कर्म मग भोगूनच संपवावे लागते. कधीकधी थोडे भोगून

झाल्यानंतर उपाय सांगितला जातो, जसे विदर्भातील तरुणाला आपल्या वडिलांचा कमरेखालील विकार डॉक्टरी उपायांनी नीट न झाल्यामुळे 'छायाशास्त्री' च्या सूर्यसंहितेने सांगितला. (पूर्वजन्मात भुंकणाऱ्या कुत्र्याला कमरेखाली ते अधू होण्याइतका रागाच्या भरात चोप दिल्याचा परिणाम त्या गृहस्थाला या जन्मात त्या विकाराच्या रूपाने भोगावा लागला होता व त्यासाठी ५ तोळे सोन्याची प्रतिमा करून ती गरीब ब्राह्मणाला दान द्यायला सांगितले होते. त्या व्यक्तीचे नाव व त्याचा रोग संहितेने बरोबर सांगितला होता.) आता तर वैज्ञानिक निकषावर पुनर्जन्माचे सत्यत्व पाश्चात्य वैज्ञानिकांनी पुराव्यानिशी प्रस्थापित केले आहे. (प्रस्तुत लेखकाने **विज्ञान आणि बुद्धिवाद** या ग्रंथातील प्रकरण ५ पाहा.) नाडीग्रंथातील 'शांती' प्रकरणाने पुनर्जन्माबरोबरच कर्मसिद्धांताचे सत्यत्वही प्रस्थापित होते. आणि पुनर्जन्म सत्य असेल तर कर्मसिद्धांत असत्य कसा असेल? कारण कर्मसिद्धांताचे (कर्मविपाकाचे) अधिष्ठान पुनर्जन्म हेच आहे. 'शांती' प्रकरणामुळे त्याला जास्त पुष्टी मिळते इतकेच. येथे या जप दानरूपी शांतीच्या परिणामकारकत्वाची काही उदाहरणे देतो.

एका गृहस्थाच्या नाडीभविष्यात सर्व गोष्टी बरोबर आल्या. त्यात एके ठिकाणी म्हटले होते, " 'जातकी' च्या पत्नीला पूर्वजन्मीच्या काही पापामुळे गर्भाशयासंबंधी काही विकार असतील. त्यामुळे 'जातकी'ने 'शांती' केली, तरच त्याला कन्यासंतती होण्याचा संभव आहे. या भविष्याप्रमाणे वयाच्या ५५ व्या वर्चपर्यंत त्या गृहस्थास स्थाने योग्य तो धार्मिक शांतीचा विधी केला होता, तरीही कन्यासंतती झाली नाही. ५५ व्या वर्षी त्याने एका मुलीला दत्तक घेतले. आश्चर्य असे, की त्या मुलीची जन्मतारीख पाहता, या गृहस्थाने 'शांती' केल्यानंतरच तिचा जन्म झाला होता; आणि प्रत्यक्ष पोटी न येता ती 'दत्तक' रूपाने त्याच्या घरी आली होती." (पृ. २४)

धार्मिक कृत्ये व व्रतवैकल्ये यांना काही जीवनात स्थान नाही असे म्हणणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालणारे हे उदाहरण आहे, असे आठवले यांनी म्हटले आहे. खुद्द बाबूभाई जोशी, 'छायाशास्त्री' यांनी आठवल्यांना आपला स्वतःचा नाडीचा पुढील अनुभव सांगितला आहे. आठवले म्हणतात, **"त्यांच्या ('छायाशास्त्री'च्या विवाहानंतर वीस वर्षेपर्यंत त्यांना पुत्रसंतती नव्हती. पयोव्रत**

करण्याचा सल्ला संहितेच्या भविष्यात त्यांना मिळाला आणि ते व्रत यथासांग यथाविधी केल्यावर त्यांना पुत्रसंतती झाली." (पृ.७५)

श्री. आजगांवकर यांचे मित्र श्री. द. गो. केळकर यांचा अनुभवही यासंदर्भात उद्बोधक आहे. अशा अनुभवामुळे मनुष्य कसा पूर्ण बदलतो- जप अनुष्ठान करू लागतो याचे प्रत्यंतर आणून देणारे हे उदाहरण आहे :

"श्री. केळकर यांना १९५८ साली फुफ्फुसाचा कर्करोग झाला. त्याआधी ५-६ वर्षे त्यांच्या पत्नीची कुंडली त्यांनी भृगुसंहितेतून वाचून घेतली होती. मृगूनी अखंड सौभाग्याचा आशीर्वाद दिला होता आणि आता तर ते सौभाग्य कर्करोगाने मासले होते. श्री. केळकर यांच्या कुंडलीतील रोगाध्याय शास्त्रीजीनी वाचला. आश्चर्य असे की भूगूनी त्यांच्या व्याधीवर पांढऱ्या गोळयांचा (होमिओपाथी) विशिष्ट उपचार वर्णन केला. त्याशिवाय एक जप आणि अनुष्ठान करण्यासाठी जवळजवळ दोन हजारांचा खर्च आवश्यक होता. त्याची सोय काय करावयाची, या विंचनेत असताना त्यांच्या भविष्यवर्णनात भृगूंनी तोड सुचवून त्यांना चिंतेतून मुक्त केले. अनुष्ठानासाठी लागणारा खर्च संहितेच्या वक्त्याने (नाडीवाचकाने) करावा, असा स्पष्ट आदेश भृगूंनी दिला. श्री. शास्त्रीजीनी त्या आशेप्रमाणे श्री. केळकर यांच्या धार्मिक अनुष्ठान उपविधानासाठी द्रव्य खर्च केले. **भृगूंच्या भविष्याप्रमाणे केळकर कर्करोगातून मुक्त झाले. या चमत्कृतिमय प्रसंगामुळे केळकर आणि शास्त्रीजी कायमचे मित्र झाले. केळकरांची संहितेवरील, मंत्र- अनुष्ठानावरील आणि ईसरी कृपेवरील बदा दृढमूल झाली.** पुढे त्यांनी गणपतीची उपासना केली... (हल्ली) ते हात पाहून लोकांना हिरे-माणके वापरण्याबद्दल अचूक सल्ला देतात. त्यांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे त्या त्या महांचे खडे घातल्यामुळे रोगमुक्तीचा, संकट निवारणाचा अनुभव आल्याची उदाहरणे घडली आहेत." (पृ. ८८-८९)

नाडीवाले पैसे उकळण्यासाठी नाडीत 'शांती' घुसडून सांगतात हा आरोप हे उदाहरण खोडून काढते. नाडीवाचन व्यवसाय असला तरी केवळ पैशासाठी तो केला जात नाही याचा हा पुरावा आहे. त्या पुराव्याला पुन्हा बळकटी आणणारी घटना नंतर घडली. तीही सांगितली पाहिजे.

"श्री. केळकर बरे झाल्यानंतर शास्त्रीजींनी त्यांच्यासाठी खर्च केलेली रक्कम ते परत देऊ लागले. त्यावेळी भृगूंची तशी आज्ञा नसल्यामुळे शास्त्रीजींनी त्या द्रव्याचा स्वीकार केला नाही." (पृ. ८९)

ऋषिमुनी त्रिकालज्ञ असल्यामुळे कुणी, किती, कशासाठी पैसे खर्च करावेत हे ते पूर्ण जाणतात. कर्मसिद्धांत हा पूर्ण न्यायनीतीवर अधिष्ठित आहे. पुढील नाडीतील आदेश याचे आणखी प्रत्यंतर आणून देतो

"कित्येकदा कुंडली वाचून झाल्यावर शेवटी त्या व्यक्तीकडून मोबदला मागू नये, असा स्पष्ट आदेश येतो. त्या विवक्षित ग्राहकाची सांपत्तिक स्थितीच तशी अडचणीची असते." (पृ. ८९) 'नाडीग्रंथ' पैसे उकळण्याचा 'धंदा' आहे असे म्हणणाऱ्यांना वरील उदाहरणे 'उत्तर' आहेत.

एका बुद्धिवाद्याचा नाडीचा अनुभव

येथे आठवले यांनी दिलेला एका बुद्धिवाद्याचा नाडीग्रंथाचा अनुभव देत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बुद्धिवाद्याप्रमाणे सर्वच बुद्धिवादी आंधळे नसतात, याची वाचकांना कल्पना येईल.

"श्री. ओमप्रकाश काहोल (M. Sc. 3. T.) हे विज्ञानाचे पदवीधर व प्राध्यापक आहेत. ते बुद्धिवादी आहेत आणि भविष्य किंवा 'गूढ' शास्त्रांवर त्यांचा स्वभावतः विश्वास नाही. असे असता त्यांचा एक मित्र श्री. सत्य व त्याची पत्नी यांना नाडीग्रंथावरून आपले भविष्य पाहायचे होते. नाडीग्रंथवाल्या पंडिताशी त्यांचा पूर्व परिचय होता.

"तिष्यांना सोयीचा दिवस पाहून ते त्या पंडिताच्या घरी गेले. पंडिताला त्यांच्या येण्याबद्दलची आगाऊ माहिती व सूचना नव्हती. पंडिताकडे आणखीही काही पृच्छक आलेले होते. उपस्थितापैकी इतर कोणाचेही 'भविष्य' न पाहता त्याने त्यावेळची प्रश्नकुंडली मांडली आणि तीवरून नाडीग्रंथातले पान शोधून कावले व श्री. काहोल यांचेच भविष्य वाचले. त्यांचेच भविष्य त्या दिवशी वाचले जावे असाथ देवी संकेत होता, असे आढळून आले. "संहितेच्या जीर्ण पानातील मजकुरात श्री. काटोल यांचे

नाव बरोबर लिहिलेले आढळले. ते ज्या मित्राबरोबर गेले होते, त्यांचे नाव व त्यांच्या पत्नीचेही वर्णन भविष्याच्या ओघात करण्यात आलेले व ते बिनचूक असलेले आढळले.

श्री. ओमप्रकाश हे त्यांचे नाव जसे भविष्यात नमूद होते, तसेच ते 'विज्ञानात पारंगत असतील, त्यांना शास्त्रीय संशोधनाची आवड असेल, याचा स्पष्ट उल्लेख त्या जीर्ण पानात होता.

"प्रो. काहोल हे तो चमत्कार पाहून स्तंभितच झाले. त्यांचा विज्ञानवादी दृष्टिकोन मुळापासून डळमळावा अशीच ती अद्भुत घटना होती. त्या दिवशीची त्यांनी छायाचित्रे घेतली आणि मनात संभ्रमात टाकणाऱ्या या प्राचीन विद्येचे समूळ संशोधन झालेच पाहिजे, असे प्रो. काहोल यांचे ठाम मत झाले. बुद्धिवाद्यांना आणि संशोधकांना आवाहन करण्यासाठी प्रो. काहोल यांनी आपला अनुभव प्रसिद्ध केला. (**Astrological Magazine, Bangalore** मार्च, १९६२)." (पृ. ५०-५१

श्री. आठवले यांनीसुद्धा आपल्या लेखनाचा उद्देश फलज्योतिषाची तरफदारी करणे हा नसून, "आपल्या पूर्वजांचे, भारतीय ऋषिमुनींचे ज्योतिषविषयक ज्ञान किती अचूक व गाढ होते, याचा नाडीग्रंथ म्हणजे स्वच्छ आरसा" कसा आहे हे दाखवून देणे असल्याचे म्हटले आहे. "या आरशात दिसणारी प्रतिबिंबे सामान्य मानवी बुद्धीला चकित करणारी आहेत. अशा या चमारात जमा होणाऱ्या ज्ञानाविषयी व प्रथसंगतीविषयी आम्ही अत्यंत उदासीन आहोत. या दुर्मिळ ग्रंथांचे संशोधन करून त्यांचा समाजाला उपयोग करून दिला गेला पाहिजे. निदान हे अमोल ग्रंथ उजेडात आणून त्यांची जपणूक केली पाहिजे. एवढी जागृती झाली तरी माझ्या लेखनाचे चीज झाले असे मी समजेन." (पृ. ५५)

प्रस्तुत लेखकाचा अनुभव

प्रस्तुत लेखक आणि विंग कमांडर शशिकांत ओक यांनीही या 'अद्भूत ग्रंथसंपत्तीचे अनन्यसाधारण महत्व जाणून ते ग्रंथ उजेडात आणण्यासाठी त्यांचा आठवलेप्रमाणेच प्रत्यक्ष अनुभव घेतला व त्यांचे संशोधन, (त्यांचा लेखकाप्रमाणे प्रत्यक्ष अनुभव घेऊन) करण्याचे महाराष्ट्रातील बुद्धिवाद्यांना आवाहन केले. त्या

आवाहनाला त्यांनी योग्य प्रतिसाद देण्याचे बाजूलाच राहिले, उलट आम्हाला उद्देशून हे दोघे नाडीवाल्यांचे ढोल पिटतात, त्यांचे प्रचारक आहेत, विंग कमांडर ओक यांचा हा तमाशा असून त्यात प्राचार्य गळतगे ढोलकी वाजवतात' अशा प्रकारची आमची टिंगल करणारे लेखन त्यांनी केले इतकेच नव्हे तर प्रस्तुत लेखकाला शिव्या देणारी खासगी पत्रेही लिहिली! यावर वाचकांचा कदाचित विश्वास बसणार नाही; म्हणून त्या पत्रांपैकी काहीना मुद्देसूद उत्तर देणारी दोन परिशिष्टे शेवटी प्रस्तुत मंचाला जोडली आहेत. त्यावरून वाचकांना या बुद्धिवाद्यांच्या या विषयावरील भूमिकेची व एकंदर त्यांच्या बौद्धिक पातळीची कल्पना येईल. (या उत्तराने परत चिडून त्यांनी त्याहूनही हीन पातळी गाठलेली पत्रे लिहिली आहेत!) अशाप्रकारची प्रतिक्रिया आठवले यांच्यावेळी का उठली नाही बरे? त्यावेळी महाराष्ट्रात बुद्धिवादी नव्हते काय? होते; पण त्यावेळी अंधश्रद्धानिर्मलून समिती नव्हती म्हणून अशी प्रतिक्रिया त्यावेळी उमटली नाही. एका नव्या बुद्धिवादी संस्कृतीची महाराष्ट्राला या समितीची ही एक खास देणगी आहे! '[5]

प्रस्तुत ग्रंथाच्या वाचकांना स्वतला विज्ञानवादी व बुद्धिवादी म्हणवून घेणाच्या या समितीच्या लोकांची कोणती वैज्ञानिक व बौद्धिक पातळी आहे, याचा चांगलाच परिचय आतापर्यंतच्या प्रकरणातून झाला आहे. जे लोक एक छंद म्हणून ज्योतिषविषयाचा अभ्यास केलेल्या एका सामान्य व्यक्ताने यांचे आव्हान स्वीकारले असता त्याला तोंड देऊ शकले नाहीत, खोटेपणा करून पळून गेले, (प्रकरण ३ पाहा) ते लोक त्रिकाल व सिद्धहस्त भारतीय प्राचीन ऋषिमुनीच्या, ज्याला जगात तोड नाही अशा अद्वितीय नाडीग्रंथाचे आव्हान स्वीकारतील काय? ते स्वीकारतील याची कोणी स्वप्नातही कल्पना करू शकणार नाही. प्रस्तुत लेखकाने ती कधीच केली नव्हती व

---

[5] ५. या विधानात अजिबात अतिशयोक्ती नाही. 'ओक नाडीवाल्यांचे ढोल पिटतात' असे शब्दप्रयोग आपल्या 'पुढारी'मधील लेखात प्रथम या समितीचे अध्यक्ष म्हणवून घेणाऱ्या दाभोळकरांनी केले असून नंतर त्यांच्या पाठीराख्यांनी वरीलप्रमाणे त्यांची से ओढली (बोध अंधश्रद्धेचा पृ. ३८)

म्हणून त्यांना याबाबत आवाहनही केले नव्हते. त्याचे महाराष्ट्रात या ग्रंथांचे संशोधन करणारे एकच आशास्थान होते. ते म्हणजे, शून्यातून वस्तूनिर्मितीचा चमत्कारात जमा होणारा भौतवैज्ञानिक सिद्धांत मांडणाऱ्या फ्रेड हॉइल या पाश्चात्य शास्त्रज्ञांबरोबर एकेकाळी काम केलेले जयंत नारळीकर रूह विज्ञानाची परंपरागत झापडे झुगारून देण्याचे, नवी क्षितिजे पादाक्रांत करण्याचे वैज्ञानिक साहस केले तर तेच करू शकतील अशी आशा प्रस्तुत लेखकाला, त्यांचा बुद्धिवादी दृष्टिकोन त्याला माहीत असूनही वाटत होती. म्हणूनच त्याने नारळीकरांना नाडीग्रंथांचे संशोधन करण्याचे आवाहन करणारी लागोपाठ अनेक पत्रे लिहिली. दुर्दैवाने त्यांनी प्रस्तुत लेखकाची घोर निराशा केली. पण त्यापेक्षाही मोठे दुर्दैव म्हणजे हे काम परत अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे त्यांनी सोपविले त्यांच्या या कृतीमुळे त्या समितीचा दर्जा उंचावला नाही, तर त्यांचा स्वतच्चाच दर्जा खाली आला त्यांचीही वैज्ञानिक पातळी या समितीच्या वैज्ञानिक पातळीतून भिन्न नाही हे सिद्ध झाले. भले ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खभौतशास्त्र असतील. पण सत्यशोधनाच्या वैज्ञानिक कर्तव्याच्या बाबतीत त्यांच्यात व या समितीच्या लोकात काही फरक नाही, हा निराशजनक व दुख्खदायक प्रत्यत आला. बोध अंधश्रवेचा या ग्रंथात या विषयीची सर्व साधत हकीगत मुळातूनच वाचकांना वाचावयास मिळेल. पण पुनरुवतीचा दोष पदरूनही येथे या ग्रंथाच्या वाचकांसाठी नारळीकरांच्या भूमिकेची शास्त्रीय तपासणी नाडीग्रंथाविषयी कसा अवैज्ञानिकपणा दाखवला हे सांगणे अगत्याचे आहे.

नाडीग्रंथ आणि जयंत नारळीकर

श्री. नारळीकरांना मी लिहिलेल्या अनेक पत्रांपैकी फक्त पहिल्या पत्राला त्यांनी उत्तर दिले आहे. त्यात ते म्हणतात की **"त्यांच्या व माझ्या विज्ञान कशाला म्हणावे' या विषयीच्या दृष्टिकोणामध्ये फार मोठा फरक आहे.** त्यांची याविषयीची मते सुस्पष्ट असून से या विषयावर अधिक काही लिहू इच्छित नाहीत." त्यांची या विषयावरची मते काय आहेत हे मला माहीत होते. ती मते मी त्यांना बाजूला सारून या नाडीग्रंथांचे संशोधन करावे असे आवाहन केले होते, पण **ते आपल्या मतांनाच चिकटून बसू इच्छित होते! आणि संशोधनाशिवाय उराशी बाळगलेल्या मतांना चिकटून बसणे वाला ते 'विज्ञान' म्हणत होते! मी आणि कुणीही सुबुद्ध मनुष्य अशा न तपासता**

बाळगलेल्या मतांना चिकटून बसणे याला अंधश्रद्धा म्हणतो. म्हणजे ज्याला कोणीही सुबुद्ध मनुष्य 'अंधश्रद्धा' म्हणतो, त्याला नारळीकर 'विज्ञान' म्हणत होते याला पुरावा त्यांनी मला लिहिलेले साक्षात पत्र आणि असे अंधश्रद्धेलाच विज्ञान म्हणणारे नारळीकर अंधश्रद्धा निर्मूलन समितीला पत्र पाठवून या 'अंधश्रद्धेचे (नाडीचे निर्मूलन करण्यास सांगतात 'अंधनैव नीयमानाःयथांधा' हे उपनिषत्कारांचे वचन प्रत्यक्ष त्यांच्या अनुभवावर आधारलेले असावे, असे अशावेळी वाटू लागते!

बरे, नारळीकरांची ही 'सुस्पष्ट मते' तरी कोणती? ती त्यांनी मला सांगितलेली नसली तरी ओकांना लिहिलेल्या पत्रात सांगितली आहेत. त्यांचे पहिले 'सुस्पष्ट मत म्हणजे नाडीग्रंथ ही 'बनवेगिरी' (**hoax**) आहे हे त्यांना कसे कळले, हे त्यांनी सांगितलेले नाही. कोणताही शास्वश कुठलेही विधान विनाआधार किंवा पुराव्याशिवाय कधी करीत नसतो. नारळीकर असे विधान करतात त्या अर्थी त्यांच्याजवळ हे विधान सिद्ध करणारा पुरावा असला पाहिजे. पण तो त्यांनी सादर केलेला नाही. पुरावा असता तर तो त्यांनी सादर केला असता. आणि तो पुरावा नाडीग्रंथांची प्रत्यक्ष तपासणी केल्यानंतरच मिळू शकतो. ती तपासणी तर त्यांनी केलेली नाही. म्हणजे हे विधान त्यांनी कसलाही आधार कसलाही पुरावा, नसताना केले आहे. आणि हाच 'विज्ञान कशाला म्हणावे' या विषयीच्या त्यांच्या आणि माझ्या दृष्टिकोणातला ते म्हणत असलेला फरक होय! दुसऱ्या शब्दात, विज्ञान म्हणजे पुराव्याच्या आधारे बोलणे असे मी म्हणतो; उलट विज्ञान म्हणजे कसलाही पुरावा नसताना बोलणे असे नारळीकर म्हणतात. आणि नारळीकर आंतरराष्ट्रीय कीर्तिचे शास्त्रज्ञ आहेत. मी एक सामान्य मनुष्य आहे. त्यांना विज्ञानातील ज्या 'खाचाखोचा' माहीत आहेत, त्या मला कशा माहीत असतील?

दुसरे त्यांचे 'सुस्पष्ट मत' म्हणजे नाहीत सांगितलेली जप-दान इ. 'शांती' ही अंधश्रद्धा आहे. आता ज्यांनी नाडीची स्वतःतपासणी केलेली नाही, त्यांना त्यात सांगितलेल्या जप दान इत्यादी 'शांती'विषयी बोलण्याचा अधिकार कसा प्राप्त होतो ? जप दान इत्यादीचा त्यांनी अनुभव घेतला आहे काय? किंवा इतरांच्या अनुभवांचा त्यांनी अभ्यास केला आहे काय? किंवा निदान त्याविषयी जुजबी माहिती तरी त्यांना आहे काय? असती तर ती त्यांनी सादर केली असती. ओकांना लिहिलेल्या पत्रात ती

त्यांनी सादर केलेली नाही. मग तिला ते अंधश्रद्धा कसे काय ठरवतात? कदाचित 'विज्ञान कशाला म्हणावे हे त्यांना पक्के माहीत असल्यामुळे त्याच्या आधारे तिला ते अंधश्रद्धा ठरवत असावेत. त्यांच्या आणि माझ्या 'विज्ञान कशाला म्हणावे या विषयीच्या दृष्टिकोणात फार मोठा फरक असल्याचे ते म्हणतात, त्याचे हेच कारण असावे. **कसलाही अनुभव, आधार, पुरावा वा माहिती नसताना एखाद्या गोष्टीला अंधमन्दा ठरविता येते, हे त्यांच्या आणि माझ्यामध्ये 'विज्ञान कशाला म्हणावे याविषयी फार मोठा फरक असल्याचे निदर्शक होय**

तिसरे त्यांचे 'सुस्पष्ट मत' असे की नाडीची तपासणी त्यांच्यासारख्या एकट्यादुकट्याचे काम नसून १०००-२००० व्यक्तीची सैंपल्स त्यासाठी घ्यावी लागतील. विंग कमांडर ओकांनी आपले नाडीत नाव येते हाच सर्वात मोठा चक्रावून सोडणारा चमत्कार असल्याचे सांगून व हे कसे हे स्वानुभवाने सांगणारी स्वतः लिहिलेली पुस्तिका त्यांना प्रत्यक्ष भेटीत देऊन, नाडीच्या या चमत्काराचे संशोधन करण्याचे आवाहन नारळीकरांना केलेले असताना नारळीकर हजार-दोन हजार व्यक्तींच्या सैंपलचा आग्रह कशासाठी धरतात? नारळीकरांचे नाव त्यांच्या नाडीपट्टीत आढळून आले तर नाडीभविष्याच्या चमत्काराची १०० टक्के प्रचीती त्यांना आली, असे ठरत नाही काय? आईन्स्टाइनच्या सामान्य सापेक्षता सिद्धांताची परीक्षा १९१९ साली एडिंग्टन या शास्यशाने खप्रास सूर्यग्रहणाच्या वेळी एकाच प्रयोगात - एकाच तपासणीत घेतली, आणि तो सिद्धांत त्या परीक्षेत उतरून विज्ञानजगात सर्वमान्य झाला, हा इतिहास नारळीकरांना सांगावयास पाहिजे काय ? नाडीत भविष्य पाहणाऱ्याचे नाव आढळणे, त्याच्या आईबापांची, पत्नीची नावे आढळणे, त्याची जन्मवेळ आवळणे आणि हे भविष्य ती व्यक्ती जन्मण्यापूर्वी लिहिलेले आढळणे, हीच त्या नाडी भविष्याची crucial test निर्णायक परीक्षा - ठरत नाही काय? याला हजार-दोन हजार सैंपल्स कशाला पाहिजेत? **हजार-दोन हजार संपल्स लागणारे हे अनमानधपक्याचे भविष्य नाही की ज्यामध्ये बहुसंख्य भाकिते बरोबर आली तर ते परीक्षेला उतरले म्हणावे.** पण मी असले प्रश्न त्यांना विचारतो, ते 'विज्ञान कशाला म्हणावे' हे मला माहीत नसल्यामुळे असेल कदाचित. हस्तीदंती मनोऱ्यात बसून काय शक्य आहे व काय शक्य नाही. याविषयी तर्क करणाऱ्या बुद्धिवादाला विज्ञान

म्हणतात हे मला माहीत नसल्यामुळेही असेल कदाचित 'माझ्या दुर्बिणीतून पाहिले तर तुम्हाला चंद्रावर खड्डे दिसतील' असे गॅलिलियो म्हणत असतानाही ते अशक्य आहे असे म्हणून त्याच्या दुर्बिणीतून पाहण्यास नकार देणाऱ्या त्या काळातील त्याच्या हस्तीदंती मनोऱ्यातील धार्मिक (बुद्धिवादी) विरोधकाप्रमाणेच, हल्लीच्या, विज्ञान 'नवा धर्म' म्हणून स्वीकारलेल्या, या नव्या नारळीकरी 'धार्मिक' बुद्धिवाद्यांनाच 'निज्ञान कशाला म्हणावे' हे कळते, हे मला माहीत नसल्यामुळेही असेल कदाचित! आणि सर्वात महत्वाचे म्हणजे विज्ञान धर्माप्रमाणेच रूढीने जखडलेले आहे, प्रयोगशील व सृजनशील नाही, नवनिर्मापक नाही, मुक्त शोध (free inquiry) हे त्याचे लक्षण नाही हे मला माहीत नसल्यामुळे असेल कदाचित. **पण या रूढीवादी विज्ञानाला विरोध करून, रूकीस्त धर्माला विरोध करणाऱ्या लोकांप्रमाणे, 'पाखंडी' म्हणवून घेण्यातही मला आनंद वाटेल.** टी. एच्. हक्सले याने म्हटल्याप्रमाणे 'वैज्ञानिक सत्य' हे नेहमीच पाखंडी असते. आणि खंडी विज्ञानच केव्हाही सत्य शोधू शकते. कारण खऱ्या अर्थाने विज्ञान नेहमीच पाखंडी असते. आणि म्हणून ते पुढे मुसंडी मारू शकते अशा अनेक नारळीकरांना बाजूला सारून, न जुमानता. उदा. देतो. (हे आईन्स्टाइनलासुद्धा न जुमानता विज्ञान पुढे कसे जाते याचे उदाहरण आहे.)

नाडी भविष्य आणि आधुनिक भौतविज्ञान

सृष्टिज्ञान या पुण्याहून निघणाऱ्या विज्ञानविषयक मासिकात १९६२ साली लिहिलेल्या माझ्या लेखात **ग्रहांचा मानवावर परिणाम होतो हे खरे नाही व फल ज्योतिष हे शास्त्र नाही,** हे माझे म्हणणे मी मांडले आहे. (या ग्रंथाचे ३ रे प्रकरण पाहा.) मात्र ज्योतिष्यांचे भाकित खोटे ठरते असे मी कोठेही म्हटलेले नाही. किंबहुना तसे **भाकित करण्याचे काही संकेतसूचक नियम ज्योतिष्यांनी शोधून काढले असल्याचे माझे मत मी मांडले आहे.** माझ्या मताच्या पुष्ट्यर्थं मी 'व्यवस्थे'चा (system चा) सिद्धांत त्या लेखात मांडला आहे. ज्योतिष्यांच्या बाजूने हा सिद्धांत (वैज्ञानिक मासिकात) मांडण्याचे मला धाडस होण्याचे कारण मला ज्योतिषविषयक

आलेला प्रत्यक्ष अनुभव होय.'[6] हा 'व्यवस्थे'चा सिद्धांत मी का व कशाच्या आधारे मांडला याचे भौतशास्त्रीय विवेचनही मी माझ्या लेखात केले आहे. (त्याला नंतरच्या शोधांनी मिळालेल्या पुष्टीचाही नंतर जोडलेल्या टीपेत समावेश केला आहे. प्रस्तुत ग्रंथ. पृ. ४२)

मी या गोष्टीचा उल्लेख येथे दोन कारणासाठी करीत आहे. पहिले कारण असे, की कोणत्याही विषयावर विशेषतःज्योतिषासारख्या अनुभवाधिष्ठित विषयावर- केवळ 'तार्किक' वा 'बौद्धिक' युक्तिवाद करणे व्यर्थ आहे. तर्कवाद काहीच सिद्ध करू शकत नाही. बुद्धिवाद्यांचा भर तर्कावर असतो, अनुभवावर नाही. जॉन्सन या प्रसिद्ध विचारवंताने बर्कलेचे कल्पनावादी (**Idealistic**) तदज्ञान रस्त्यावर पढलेल्या दगडाला लाथ मारून 'भी बर्कलेचे तत्त्वज्ञान असे खोटे ठरवतो' असे म्हटल्याचे प्रसिद्ध आहे. एखादे तत्त्वज्ञान दगडाला लाथ मारून खोटे (किंवा खरे) ठरवता येत असेल तर वैज्ञानिक शोध घेण्याची काय जरूरी ? आज विज्ञानाने बर्कलेचे तत्त्वज्ञान उचलून धरले आहे. **(Mysterious Universe** हा जेम्स जीन्स या प्रसिद्ध शास्त्रज्ञाचा ग्रंथ पाहा. **The universe is great though**t.] विश्व ही a एक महान कल्पना या विचार आहे हा आधुनिक विज्ञानाचा निष्कर्ष असल्याचे जीन्स म्हणतो.) शेवटी तर्कही अनुभवावरच उभा राहू शकतो. हवेत नाही. ज्योतिषाचा पाया तर केवळ अनुभव हाच आहे.

---

[6] ६. माझ्या लहानपणी माझ्या वडिलांनी कराडच्या कै. उद्धव विष्णु करयांच्याकडून माझ्या जन्मकुंडलीवरून सविस्तर भविष्य लिहून घेतले होते व वे ८० टक्के अनुभवाला उतरले होते. माझ्या लग्नाचे त्यात सांगितलेले वय वर्ष खोटे ठरविण्याचा माझा प्रयत्नही अयशस्वी झाला होता. कारण माझी आजी (आईची आई) - जिचे माझ्यावर जिवापलीकडे प्रेम होते-माझे लग्न डोळयांनी पाहूनच मरणार असे म्हणून अंथरूण धरून पडली होती व मला तिच्या इच्छेसाठी माझ्या इच्छेविरुद्ध लन करावे लागले होते. आश्चर्य असे की माझ्या लग्नानंतर पोटयाच दिवसांत ती वारली.

दुसरे कारण असे, की अनुभवाची भक्कम बैठक असलेला सिद्धांतच शेवटी खरा ठरतो. विज्ञान अनुभवाधिष्ठित म्हणजेच प्रयोगाधिष्ठित आहे. प्रयोगानेच विज्ञानातील कोणत्याही सिद्धांताची कसोटी लागते. ज्योतिषशास्त्र खरे की खोटे हे जसे अनुभवाने ठरविले पाहिजे, तकने नाही, त्याचप्रमाणे महांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम कोणत्या स्वरूपाचा आहे, हे वैज्ञानिक प्रयोगांनी ठरविले पाहिजे, केवळ ज्योतिषविषयक कल्पनेने सिद्धांताने नाही. आणि विज्ञानातील प्रयोगाचे परिणाम नेहमी दृश्य अनुभवाच्या स्वरूपाचे असतात. पण महांचे असे दृश्य परिणाम अनुभवाला येत नाहीत. अन्यथा त्यांच्या जन्मकालीन स्थानाबरोबरच त्यांच्या आकारमानाचा, त्यांच्या घटनेचा व अंतराचाही विचार झाला असता, तो होत नाही. म्हणून हा 'गूढ' परिणाम आहे असे कोणी म्हणेल. पण हा 'गुल'च नव्हे तर 'परिणाम' सुद्धा नाही कारण परिणाम नेहमी दृश्य असतो असे मी म्हटले आहे व 'व्यवस्थे'चा सिद्धांत मांडला आहे. (कारण 'व्यवस्थे'त परिणाम नसतो.) एका उदाहरणाने तो सिद्धांत समाजावून ही दिला आहे. त्याचे येथे वाचकांच्या माहितीसाठी व सोयीसाठी पुनरावलोकन करता येईल.

एक मनुष्य दररोज शहरातील मनोन्याच्या घड्याळात सहाचे टोले पडताच आपल्या घरातून बाहेर पडतो असे समजू या गोष्टीचे निरीक्षण करीत असलेल्या पण वेळेची कल्पना नसलेल्या एखाद्या व्यक्तीला ते सहाचे टोलेच त्या मनुष्याला बाहेर पडायला लावातात असे वाटेल. एका अर्थाने हे खरे असले तरी केवळ त्या टोल्यात हे सामर्थ्य आहे असे म्हणता येणार नाही. तसे असते तर त्या टोल्यानी शहरातील प्रत्येक मनुष्याला घराबाहेर पडायला लावले असते. म्हणजे त्या टोल्यांचा व त्या मनुष्याच्या घराबाहेर पडण्याचा संबंध 'कारण व परिणाम' असा नसून केवळ 'व्यवस्थेचा आहे. या उदाहरणात सहाचे टोले पडताच तो मनुष्य घराबाहेर पडेल असे (त्या विशिष्ट 'व्यवस्थे'च्या आधारे) भविष्य सांगावे, त्याप्रमाणे ग्रहांची अन्यकालीन विशिष्ट स्थाने व मानवी जीवनातील घटना यांच्यातील व्यवस्थेमुळे व्यक्तीचे भविष्य बरोबर सांगता येणे असंभवनीय नाही.

अशी व्यवस्था ग्रहांच्या व मानवी जीवनाच्या बाबतीतच नाही, तर संपूर्ण विश्वाच्या बाबतीतच असल्याचे आता आढळून आले आहे ! आणि सर्वात मोठे

आश्चर्य म्हणजे हा शोध इतर कोणी लावलेला नसून खुद्द भौतशास्त्रज्ञांनी लावला आहे! हा शोध क्वांटम सिद्धांत म्हणून प्रसिद्ध आहे.

मी १९६२ साली सृष्टिज्ञान मासिकात फलज्योतिषावर लेख लिहिला त्यावेळी वॉटम सिद्धांत नव्हता काय? वास्तविक क्वांटम सिद्धांताचा शोध मॅक्स प्लॅंक या शास्त्रज्ञाने १९०० सालीच लावला होता. पण मी मांडलेल्या 'व्यवस्थे'च्या कल्पनेचा पाठपुरावा करणारा प्रयोग त्यावेळी करण्यात आलेला नव्हता. तो १९८२ साली करण्यात आला. तो इतक्या विलंबाने का करण्यात आला, हे कळण्यासाठी टम सिद्धांताच्या विकासाचा थोडा इतिहास माहीत करून घेणे अगत्याचे आहे.

मॅक्स प्लॅकने क्वॉटमची कल्पना भौतशास्वात मांडली त्यावेळी भौतशास्वज्ञांना अणूच्या रचनेचे स्पष्ट ज्ञान नव्हते. पुढे नील्स बोहर याने अणूच्या रचनेचे ग्रहमालेचे मॉडेल मांडले. नंतर भौवशास्वात एकाहून एक क्रांतिकारक शोध लागत गेले. इलेक्ट्रॉन 'वस्तू' अगर 'कण' नसून 'तरंग' आहे असा लुई द ब्रोग्ली याने सिद्धांत मांडला. (याला 'वस्तूतरंग' सिद्धांत म्हणतात.) त्याला डेव्हिसनच्या प्रयोगाने पुष्टी मिळाली. हे तरंग रूपातील इलेक्ट्रॉन अणूत 'स्टैंडिंग वेव्ह'च्या (अखंड तरंगाच्या) स्वरूपात असतात अशी एरविन श्रोडिंजर या शास्त्रज्ञाने कल्पना मांडली व त्याला गणिताचा आधार दिला. (याला 'वेव्ह फंक्शन' म्हणतात.) मॅक्स बॉर्न या शास्वज्ञाने हे इलेक्ट्रॉनचे तरंग खरे तरंग नसून 'संभवनीयतेचे तरंग' (प्रॉबिलिटी वेव्हज) असतात अशी कल्पना मांडली (तीच बरोबर म्हणून अणुविज्ञानात संमत झाली आहे.) दुसरीकडे क्ष-किरणसुद्धा म्हणजे तरंगसुद्धा 'वस्तू' किंवा 'कण' असतात असे कॉप्टन वाला प्रत्यक्ष प्रयोगात आढळून आले अशा रीतीने भौतिक वस्तु एकाच वेळी 'कण' आणि 'तरंग' अशा परस्परविरुद्ध गुणांनी युक्त असल्याचे सिद्ध झाले! याला बोहरने 'कॉंप्लीमेंटरिटी' म्हणून संबोधले आहे. ('तुला सगुण म्हणू की निर्माण रे, स्थूल म्हणू की सूक्ष्म रे' या आध्यात्मिक कल्पनेचे 'कॉम्प्लीमेंटरिटी' हे भौतशास्त्रीय रूप) हा गोंधळ कमी आहे, किंवा हे शोध पुरेसे क्रांतिकारक नाहीत म्हणून की काय, हायजेनबर्ग या शास्त्रज्ञाने 'अनिश्चितता तत्त्वा' चा (अनसर्टन्टी प्रिन्सिपल) शोध लावून भौतशास्त्रातून कार्यकारणभावाचेच (causality) उच्चाटन केले याचा अर्थ अणूत इलेक्ट्रॉन कुठे आहे हेच शास्वज्ञाना सांगता येत नाही असा होतो. आणि

सांगायचेच झाले तर अणूची बंदिस्त पेटी उघडून आत प्रत्यक्ष डोकावून पाहिले पाहिजे म्हणजेच श्रोडिंजरचे 'वेव्ह फंक्शन' (गणित) बाजूला ठेवले पाहिजे. याचा अर्थ असा की, विज्ञानाचे व्यवच्छेदक लक्षण मानले गेलेले 'भाकित करणे' (prediction) यासाठी गणिताचा (तर्कशास्त्राचा) उपयोग करता घेत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष स्वतःच्या डोळ्यांनीच पाहिले पाहिजे हा भौतविशनातील पेचप्रसंग 'मेहरमेंट प्रॉब्लेम' (मापनाची समस्या) किया श्रोडिंजरच्या 'मांजराचा विरोधाभास (श्रोडिंजरने बंदिस्त पेटीतील मांजराचे उदाहरण देऊन उभा केलेला प्रश्न) म्हणून प्रसिद्ध आहे. अशा रीतीने विश्वाचे आणि पर्यायाने अणूचे रहस्य कनि कळणार नाही. **नैषा तर्कैन मतिरापनिया (रू. उप १.२.९**) हे उपनितकारांनी हजारो वर्षापूर्वी शोधून काढलेले विश्वाविषयीचे सत्य भौतशास्त्रज्ञांना विसाव्या शतकात प्रत्यक्ष प्रयोगांनी कळले![7] *

सूक्ष्म जगात कार्यकारणभाव नाहीसा झाला तरी स्थूल जगात जेथे असंख्य अणू असतात तेथे तो अस्तित्वात असल्याचे सांख्यकीय माकिताच्या (stastical prediction) आधारे शाखश मानून स्वतःचे समाधान करीत होते. पण हे खोटे समाधान होते. त्याला कसलाही तात्त्विक आधार नव्हता. म्हणून कार्यकारण भावावर

---

[7] ७. महाराष्ट्रातील बुद्धिवाद्यांपुढे नेमका हाच पेचप्रसंग आहे त्यांना नाहीच तक खोटे ठरविता येत नाहीत तर्कवाद बाजूला ठेवून प्रत्यक्ष स्वतःच्या डोळ्यांनी नाडीग्रंथ पाहिल्याशिवाय अनुभव घेतल्याशिवाय त्यांचे सत्य त्यांना कळणार नाही. आणि तर्कवादाचा अवलंब करावयाचा झाला तर नाडीच्या 'माकिता'ची (नाडीचे सत्यासत्य ठरविण्याची आशा त्यांनी सोडून दिली पाहिजे हा पेचप्रसंग नाडीला तिचा अनुभव न घेता एकतर्फी 'अंधश्रद्धा' ठरवून त्यांनी टाळला आहे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय इलेक्ट्रॉन सापडत नाही असे सांगणाऱ्या वटम सिद्धांताला 'अंधश्रद्धा ठरविण्यातलाच हा प्रकार आहे त्यामुळे क्वांटम सिद्धांत (किंवा नाडी) अंधश्रद्ध ठरत नाहीत. खुद्द हे बुद्धिवादीच अंधश्रद्ध ठरतात गंमत अशी की या अंधश्रद्धेलाच ते sanity (समजूतदारपणा म्हणतात!

अविचल श्रद्धा असलेल्या आईन्स्टाइनने त्याला जोराचा विरोध केला. कार्यकारणभावाचे अस्तित्व नाकारणे हे विज्ञानाच्या पद्धतीवरच गदा आणणे होते. विज्ञान तर्काधिष्ठित- असून तर्क कार्यकारणभावावर कार्य करतो. जेथे कार्यकारणभाव नाही तेथे तर्काचे काही चालत नाही. अशावेळी (वैशनिक भाषेत) जुगाराने घटना घडतात (**God plays dice with the world**) किंवा (व्यावहारिक भाषेत) भुताटकी घडते (**spooky connections hold**) असे म्हणावे लागते (आणि स्वतःआईन्स्टाइनने हेच शब्दप्रयोग केले आहेत.) पण त्याने क्वांटम सिद्धांताला विरोध करण्याचे मुख्य कारण, तो सिद्धांत त्याच्या सापेक्षता सिद्धांतावरच (त्यातील प्रकाशाला वेगमर्यादा असल्याच्या गृहीतकृत्यावरच गदा आणत होता, हे होते! क्वॉटम सिद्धांत सापेक्षता सिद्धांताला सरळ छेद देत होता!

आईन्स्टाइनच्या सापेक्षता सिद्धांतामुळे विश्वात भूत वर्तमान भविष्य असा कालभेद नसल्याचे पूर्वीच सिद्ध झाले होते. (पाहा, **विज्ञान आणि बुद्धिवाद** या ग्रंथातील शेवटची दोन प्रकरणे.) **क्वांटम सिद्धांताने कार्यकारणभावाचे उच्चाटन करून विश्वात स्थलमेवही नसल्याचे सिद्ध केले.** आईन्स्टाइनच्या सिद्धांतानुसार विश्व कालातीत

तत्त्वावर अधिष्ठित असले तरी कार्यकारणभाव (**Locality**) अबाधित होता. (**Localit**y म्हणजे कार्यकारण संबंध स्थानिक आहे ही कल्पना) त्यामुळे विज्ञानाची कार्यपद्धती सुरक्षित होती. क्वांटम सिद्धांताने स्थलभेद नष्ट करून कार्यकारणभावाचेच (स्थानिक पातळीवर कार्यकारण संबंध असल्याच्या कल्पनेचेच) उच्चाटन केले व विज्ञानाचा पायाच उखडून काढला. आईन्स्टाइनच्या सिद्धांताला या मुद्यावर विरोध होता. त्या सिद्धांतामुळे त्याच्या सापेक्षता सिद्धांतातील प्रकाशाच्या वेगमयदिष्या तत्त्वाचेही उल्लंघन होत होते. **प्रकाशाला वेगमर्यादा असल्याचे प्रयोगाने सिद्ध झाले होते. पण क्वांटम सिद्धांतालाही प्रायोगिक आधार होता. (संपूर्ण आधुनिक इलेक्ट्रॉनिक्सच त्यावर आधारले आहे.**)[8] क्वांटम मेकॅनिक्सचा पुरस्कर्ता नील्स बोहर

---

[8] ८. ज्यावेळी विज्ञानातील दोन प्रयोगात विरोध निर्माण होतो त्यावेळी विश्वाविषयीच्या वैज्ञानिक दृष्टिकोणात बदल (Paradigm shift) घडवून

आणि आईन्स्टाइन यांच्यामध्ये या मुद्यावर १९२७ साली युरोपातील सॉल्व्हे परिषदेत मोठा वाद झाला. आईन्स्टाइनने क्वांटम सिद्धांत चुकीचा ठरविण्यासाठी एखादा काल्पनिक प्रयोग (thought experiment) सुचवाया व बोहरने त्या प्रयोगातील दोष दाखवून देऊन तो प्रयोग त्याच्यावरच उलटवून क्वांटमसिद्धांत बरोबर असल्याचे सिद्ध करावे, अशा प्रकारची दोपातील जुगलबंदी या परिषदेतून गाजली. त्यामध्ये बोहरचा विजय झाला व आईन्स्टाइनला पराभव पत्करावा लागला. पुढे आईन्स्टाइनने १९३५ साली रोझेन व पोडोलकी यांच्या साह्याने पुन्हा नोटम सिद्धांत चुकीचा ठरविण्यासाठी एक काल्पनिक प्रयोग सुचविला. (हा 'ईपीआर परहोक्स' या नावाने प्रसिद्ध आहे.) बोहरने त्यातही दोष असल्याचे दाखवून दिले. मात्र तो प्रयोग काल्पनिक असला तरी तो प्रत्यक्षात केला तर आईन्स्टाइन आणि बोहर यांच्यातील वाद कायमचा मिटणार होता. म्हणजे तो निर्णायक प्रयोग होता. कारण त्यात प्रकाशाच्या वेगमर्यादेचे उल्लंघन होते की नाही हे सिद्ध होणार होते. पण प्रकाशापेक्षाही जास्त वेगाने 'परिणाम' दिसून येणाऱ्या यंत्रणेची त्या प्रयोगात सोय करावी लागत असल्यामुळे तो करणे अत्यंत जिकीरीचे काम होते. डेव्हिड बोहम या शास्त्रज्ञाने १९५१ साली आईन्स्टाइनच्या या प्रयोगाची कल्पना त्यात थोडी सुधारणा करून उचलून धरली. पण त्या प्रयोगाची सैद्धांतिक तपासणी करणारी चौकट अजून तयार झाली नव्हती. ती चौकट जे. एस. बेल या शास्त्रज्ञाने १९६४ साली एका प्रमेषाने तयार केली. (याला 'बेलचे प्रमेय' म्हणतात.) त्या प्रमेयाच्या आधारे क्लॉजर फ्रीडमन यांनी न लॉरेन्स बर्कले प्रयोगशाळेत १९७२ साली एक प्रयोग केला. ह्या प्रयोगामुळेच मेलचे प्रमेय सिद्ध झाले. म्हणजे **क्वांटम सिद्धांताला बळकटी मिळाली.** पण मा प्रयोगात प्रकाशाची वेगमर्यादा ओलांडली जाते का नाही हे तपासून पाहण्याची सोय नव्हती. क्योंटम सिद्धांतानुसार प्रकाशाची वेगमर्यादा ओलांडली जाते; आणि हे प्रयोगाने सिद्ध होणे आवश्यक होते. हा प्रयोग शेवटी ॲलेन अस्पेक्ट आणि त्याच्या

आणण्याची गरज निर्माण होते. कारण विश्वाचे कार्य विसंगत (परस्परविरोधी) तत्त्वावर कधीच चालत नसते. म्हणजेच ती विसंगती सकृद्दर्शनी असते. भासमान असते.

सहकाऱ्यांनी पॅरिस येथे १९८२ साली यशस्वीरीत्या केला. या प्रयोगाने क्वांटम सिद्धांत पुन्हा सिद्ध झाला **आईस्टाइनचे म्हणणे चुकीचे असल्याने व जोहरचे म्हणणेच बरोबर असल्याचे निर्णयकपणे सिद्ध झाले. विश्वात जसा कालभेद नाही, तसा स्थलभेदही नाही, हे शेवटी सप्रयोग सिद्ध झाले.** '[9]

हा भौतविज्ञानाचा इतिहास मी येथे थोडया विस्ताराने सांगण्याचे कारण **हे शोध व प्रयोग नाडीग्रंथांचे सत्यत्व निरपवादपणे सिद्ध करतात** (ते कसे सिद्ध करतात हे सोदाहरण पटवून देणे हा या लेखाच्या मर्यादबाहेरचा विषय आहे. या विषयीची चर्चा **विज्ञान आणि चमत्कार** या ग्रंथाच्या १६ व्या प्रकरणात केली आहे ती पाहावी. या शोधामुळे कार्यकारणभाव व स्थलकालभेद यांचे सूक्ष्म जगातूनच नव्हे तर स्थूल जगातूनही उच्चाटन झाले आहे. कार्यकारणभाव व स्थलकाल यांच्या बाबतीत सूक्ष्म व स्थूल असा विकात भेदच नसल्याचे सिद्ध झाले आहे. स्थलभेद व कालभेद हे भासमान आहेत. आणि तसे ते भासमान (खोटे) असल्यामुळेच भारतीय ऋषिमुनी तत्त्वतज्ञ (म्हणजे उपनिषदाच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेच नव्हे तर व्यवहारात सुद्धा (म्हणजे पातंजलगोगशाखाच्या दृष्टीनेही सिद्धपुरुष आहेत असू शकतात या बद्दलचा हा भौतशास्त्रीय प्रायोगिक पुरावा आहे. **अशा रीतीने नाडीग्रंथ खरे असल्याचे भौतशाखाचे प्रयोगच सिद्ध करतात.**

मी नारळीकरांना या ग्रंथांचे संशोधन करण्याचे का आवाहन केले याचा आता वाचकांना उलगडा होईल. (मी त्यांना लिहिलेल्या पत्रात क्वांटम सिद्धांताचा स्पष्ट उल्लेख केला आहे. **बोध अंधश्रद्धेचा**, पृ. ३०)

---

[9] ९. ५ जून २०००च्या इंडियन एक्सप्रेस'ने पी. टी. आय्. जी पुढील बातमी दिली आहे. विन्स्टनच्या डॉ. लिजुन बैंगने प्रकाशाच्या वेगाच्या ३०० पट वेगाने प्रकाशकांच्या गडवण्यात एका प्रयोगात यश मिळवले असून या अत्यंत गुप्त शोधाविषयीचा निबंध **Nature** या नियतकालिकाला प्रसिद्धीसाठी त्याने पाठविला आहे. ही **Sunday Times** ची वार्ता असल्याचे बातमीत म्हटले आहे.

कालभेद नष्ट झाल्यामुळे घटना कुठे व का घडली याचे कारण हुडकण्याची जरुरी नाही. चित्रपटातील रिळात घटनांचा कार्यकारणभाव कुठे असतो? सर्वच दृश्ये समोर असतात. उलट कार्यकारणभावात कारण अगोदर व कार्य नंतर असा क्रम (कालक्रम) असतो. हा कालक्रम (कालभेद) सर्वच दृश्ये समोर असल्यावेळी नष्ट झालेला असतो. (चलच्चित्रामध्ये मात्र तो असतो. **क्वांटम सिद्धांताने विश्व चलचित्र नसल्याचे सिद्ध केले. बालाच 'व्यवस्था' म्हणतात.** व्यवस्थेत अगोदर- नंतर, कारण-परिणाम असा भेद नसतो. व्यवस्था म्हणजे एक समयावच्छेदता (simultaneity)! **त्यामुळे महांचा मानवी जीवनावर 'परिणाम' होण्याचा प्रश्नध निर्माण होत नाही.** हा गूढ परिणामच नव्हे तर परिणामसुद्धा नाही असे मी का म्हटले व ते शब्द ठळक का ठेवले, हे आता वाचकांच्या लक्षात येईल. भी दिलेल्या उदाहरणात 'वेळेची कल्पना नसलेल्या असे का म्हटले व हे शब्द ठळक का ठेवले आहेत, हेही आता वाचकांच्या लक्षात येईल. काळ हा कृत्रिम किंवा भासमान आहे. तो भूतकाळाकडून भविष्याकडे 'वाहतो' हा आपला प्रम आहे. आणि **वस्तू या घटना जवळ किंवा दूर असतात हा स्थलमेवही भासमान किंवा कृत्रिम आहे. सर्व वस्तू किंवा घटना जशा एक समयावच्छेदेकरून उपस्थित आहेत, तशाच त्या परस्पराहून अभिन्नही आहेत. अभिन्नतेत कार्यकारणभेद नसतो.** म्हणजे कारण अगोदर व परिणाम नंतर अशा प्रकारचा घटना घडण्याचा कालक्रमभेद जसा नसतो, तसा स्थलभेद म्हणजे जवळ-दूर, वर-खाली, पुढे-मागे हा भेदही नसतो. सर्व घटना सर्वच ठिकाणी अभित्ररूपात उपस्थित असतात. म्हणून मुंडकोपनिषद्‌कार म्हणतात.

ब्रह्मैवेदममृतं पुरस्ताद् ब्रह्म पश्चाद् ब्रह्म दक्षिणतश्चोत्तरेण ।

अथ च प्रसृतं ब्रह्मैवेदं विश्वमिदं वरिष्ठम् ॥ (मुं. उप. २.२.११)

याचा अर्थ असा की सगळीकडे विश्वास पसरलेले आहे. ते कुठे नाही असे नाही. त्यामुळे ब्रह्म जाणणाऱ्याला कालभेद व स्थलभेद नाही. अणूत घडते (असते) ते ब्रह्मांडात घडते (असते). 'पिंडी ते ब्रह्मांडी' या तत्त्वानुसार तो पतंजलीनी सांगितलेले 'सर्वभावाधिष्ठातृत्व' प्राप्त करून 'सर्वज्ञ' बनतो **सत्यपुरुषान्यवाख्यातिमात्रस्य सर्वभावाधिष्ठातृत्वं सर्वज्ञातृत्वम् (वो. सू. ३.४९)** म्हणूनच बृहदारण्यकोपनिषदातील सर्वात्म (अद्वैत) भाव सांगणाऱ्या ४.५.१५ या श्लोकावर भाष्य करताना शंकराचार्य

म्हणतात, **"न च देशकालनिमित्ताद्यपेक्षत्वं व्यवस्थितात्मवस्तुविषयत्वात् आत्मज्ञानस्य ।"** याचा अर्थ आत्मवस्तु या विषयात स्थित झालेल्या ब्रह्मश या आत्मश मनुष्याला देशकालनिमित्त म्हणजे स्थल-भेद, कालभेद व निमित्त (कारण) भेद त्याच्या दृष्टीला अडथळा निर्माण करू शकत नाहीत. भृगु-अगस्त्यादी ऋषिमुनी असे स्थलकालनिमित्तादी भेदाच्या पलीकडे जाऊन सर्वज्ञ बनल्यामुळेच ते नाडीग्रंसारखी 'अद्भुत ग्रंथसंपत्ती निर्माण करू शकले. भारतीय अध्यात्मज्ञानाला प्रारखे झालेले नतद्रष्ट आम्ही ते ज्ञान प्राप्त करून घेण्याचे बाजूलाच राहिले, त्या ज्ञानाचा वारसा जपणे हेही बाजूलाच राहिले. उलट या ग्रंथसंपत्तीला 'बनवेगिरी' ठरवीत आहेत तेही त्याचा अनुभव न घेता । यापेक्षा मोठे दुर्दैव दुसरे कोणते असू शकेल काय?

टीप: (१) जर सर्व घटना अगोदरच ठरलेल्या असतील (predestine- tion) (कार्यकारणभाव अस्तित्वात नसलेल्या 'व्यवस्थेत त्या तशा अगोदरच ठरलेल्या असतात) तर मानवाला इच्छा स्वातंत्र्य कुठे ठरले? त्याला कर्म करण्याचे यात स्वातंत्र्य कुठे आहे? त्यामुळे कर्मविपाकाला काय अर्थ उरला? कर्मसिद्धांत त्यामुळे खोटा ठरत नाही काय? या सर्व प्रश्नांचे उत्तर 'व्यवस्था' हेच आहे. "व्यवस्थे'त 'कर्म व त्याचे फल (कारण परिणाम) भासमान् (खोटे) असतात. अज्ञानामुळे मनुष्य 'मी करतो' (व मी फल भोगतो) असे म्हणतो. (**'अहंकारविमूढात्मा कर्ता मितिमन्यते'** असे गीता म्हणते.) 'मी कौरवांना अगोदरच मारले आहे, तु निमित्तमात्र हो असे कृष्ण अर्जुनाला सांगतो ते कर्माचे कर्तेपण (व भोक्तेपण) स्वतक्रडे घेणे चुकीचे आहे हे पटविण्यासाठीच. यालाच 'कर्मयोग' म्हणतात. अर्जुनाचा युद्धाचा प्रयत्न 'ईश्वरनियोजनामुळे' ('व्यवस्थेमुळे) व्यर्थ ठरत नाही. नाटकातील पात्रे आपआपली कामे 'स्वेच्छेनेच करतात. नाटककाराने त्यांची पात्रे ठरवून दिली असली तरी ती प्रभावीपणे व समर्थपणे करणे हे त्यांच्या स्वतच्या इच्छेवरच अवलंबून आहे. ती समर्थपणे वठवली नाही तर त्यांना ती पुन्हा नीट करावी लागतात (म्हणजेच पुनर्जन्म घ्यावा लागतो). हाच कर्मसिद्धांत. जीवन हे नाटक आहे असे समजून नाटकातील पात्राप्रमाणे अनासक्त बुद्धीने कर्म करणे हाच कर्मसिद्धांत असून आपले नियोजित पात्र योग्य रीतीने वठविले तर नियतीच इच्छास्वातंत्र्य यात विशेष निर्माण होत नाही.

याविषयीची शास्त्रीय चर्चा **विज्ञान आणि चमत्कार** याच्या १६ व्या प्रकरणात केली आहे.)

(२) **क्वांटम सिद्धांतामुळे प्रकाशाच्या वेगाची मर्यादा उल्लंघली जात असली तरी सापेक्षता सिद्धांत खोटा ठरत नाही.** कारण संदेशवहनासाठी त्या प्रकाशातीत वेगाचा (superluminal speed) उपयोग करता येत नाही. **अशा रीतीने निसर्गाने प्रकाशाचा वेग मर्यादित करून (संदेशवहनासाठी प्रकाशमाध्यम मानवास उपलब्ध करून देऊन) मानवी जीवन शक्य केले आहे. प्रकाशवेगमिती म्हणजे मानवी जीवनाच्या चित्रपटासाठी निसर्गाने निर्माण केलेला पडदा (screen) किंवा मानवी जीवनाच्या नाटकासाठी उमे केलेला रंगमंच (stage) होय!** हा चित्रपट किंवा हे नाटक खोटे (भासमान असल्याचे शास्त्रज्ञांना क्वाँटम सिद्धांताने तात्विक पातळीवर तो पडदा कावून घेतल्यामुळेच (प्रकाशवेगमिती ओलांडता येते हे सिद्ध करणाऱ्या स्वांटम सिद्धांतातील ॲस्पेक्टच्या प्रयोगामुळेच माहीत झाले! **म्हणून नील्स बोहरने we are both the actors and spectators (म्हणजे या नाटकातील पात्रेही आपणच आणि प्रेक्षकही आपणच असे म्हटले आहे.** कारण मुळात नाटकच खोटे आहे (आणि नाटक याचा अर्थ 'खोटे' असाच नाही काय? अर्थात खोटे हे अध्यात्माच्या दृष्टीने.) आणि म्हणून आईन्स्टाइन म्हणतो त्याप्रमाणे हे विश्व म्हणजे ईश्वराचा जुगार नाही की भुताटकीही नाही, तर ते एक काटेकोर नियोजन (व्यवस्था) आहे. **ईश्वर हा जुगारीही नाही आणि भूतपिशाचही नाही. तो एक श्रेष्ठ नाटककार आहे.**

(३) ज्ञानेश्वर अध्यात्मशास्त्र खरे असल्याचे (म्हणजे अध्यात्म हे शास्त्र असल्याचे) गीतेतील 'कर्मयोग' सिद्ध करतो असे म्हणतात. म्हणजे गीताग्रंथ हा अध्यात्मशास्त्र खरे असल्याचा (अध्यात्म हे शास्त्र असल्याचा पुरावा आहे असे त्यांचे म्हणणे असून ते त्यांनी पुढील ओवीत सांगितले आहे **'तथा अध्यात्मयशास्त्रासी । जै साक्षपणाची ये पुसी ते बेड़जे जया ठापासी ते हे गीता ॥'** (या अध्यात्मशास्त्राच्या खरेपणाविषयी जेव्हा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा (तो खरेपणा सिद्ध करण्यासाठी) जेथे यावे लागते ती ही गीता) त्यांची क्षमा मागून **भौतशास्त्र (सापेक्षता व क्वांटम सिद्धांत)**

खरे असल्याचे सिद्ध करणारा पुरावा म्हणजे नाडीग्रंथ होय, हे त्यांची ओवी बदलून पुढीलप्रमाणे सांगता येईल.

तया भौतिक शाखासी जै साचपणाची ये पुसी । तै येईजे जया ठायासी ते । ते हे गीता || (त्या क्वांटम भौतिक शास्त्राच्या खरेपणाविषयी जेव्हा प्रश्न निर्माण 'होतो तेव्हा तो खरेपणा सिद्ध करण्यासाठी) जेथे यावे लागते ती ही नाडीग्रंथसंपत्ती.) दुसऱ्या शब्दात आपल्या भारतीय ऋषिमुनींनी 'नाडीग्रंथलेखन' करून लोकांचे नाडीभविष्य वर्तवून गीतेतील कर्मयोग तर आचरला आहेच, पण त्याचबरोबर कर्मसिद्धांताचे शास्त्रीयत्वही सिद्ध केले आहे असे म्हणता येईल. हेच दुसऱ्या शब्दात सांगायचे तर नाडीग्रंथ लिहून (नाडीभविष्य वर्तवून) भारतीय ऋषीमुनींनी अध्यात्माला वैज्ञानिक (किंवा विज्ञानाला आध्यात्मिक) बैठक दिली आहे आणि अशा रीतीने अध्यात्म व विज्ञान म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे सिद्ध केले आहे. असे म्हणता येईल. अन्यथा भौतशास्त्रातील एखाद्या प्रयोगाने अध्यात्मशास्त्राचे (विश्व स्थलकालातीत तत्त्वावर अधिष्ठित असल्याचे म्हणणे सिद्ध झाले असते ना. अर्थात याचा अर्थ असा नाही की अध्यात्मशास्त्राचे सत्यत्व भौतशास्त्रीय प्रयोगावर त्या प्रयोगांनी त्याला मिळणाऱ्या समर्थनावर अवलंबून आहे. उलट भौतशास्त्रीय प्रयोगांचे सत्यत्वच से प्रयोग आध्यात्मिक सत्याला कितपत समर्थन देतात यावर अवलंबून आहे असे म्हणता येईल. भौतिक शास्त्रातील सत्याची कसोटी अध्यात्म आहे, अध्यात्मशास्त्रातील सत्याची कसोटी भौतिकशास्य नाही, असा याचा अर्थ आहे. (**विज्ञान आणि चमत्कार** या ग्रंथातील १६ व्या प्रकरणात याचा अधिक खुलासा केला आहे.)

परिशिष्ट ४

आधीची परिशिष्टे प्रकरण २ ला संलग्न आहेत

श्री अद्वयानंद गळतगे यांनी 'अंनिस'ला दिलेले उत्तर

(भाग १) (प्रकरण १० पाहा)

भोज (बेळगांव) कर्नाटक दि. २५ मार्च १९९९

श्री प्रकाश घाटपांडे,

सप्रेम नमस्कार. आपले दि. ९ ३ ९९ चे पत्र व सोबतचा लेख हे दोन्ही मिळाले. आपण हा लेख माझा अभिप्राय कळावा, म्हणून पाठविला आहे. माझा नाडीविषयीचा अभिप्राय 'घोष अंधा' या पुस्तकाला मी लिहिलेल्या प्रस्तावनेवरून 'अंनिस'ला कळलेलाच असल्यामुळे, माझ्याकडून आपण आणखी कोणत्या वेगळ्या अभिप्रायाची अपेक्षा करीत आहात, हे कळत नाही. आपल्या लेखाने माझी भूमिका मी बदलेन असे 'अंनिस'ला वाटत असेल, तर तसे का वाटावे हेही कळत नाही. अनुभवावर (परीक्षेवर आधारलेली भूमिका कोणीही बदलू शकत नाही. तथापि, आपण आपला लेख आगत्याने मला पाठविला असल्यामुळे व रिसबूडांनीही ११ पत्रे मला लिहिली असल्याने मी हे उत्तर दोन भागात देत आहे. आपण पत्रावर १-३-१९९९ ही तारीख लिहिली आहे. पण भोजच्या पोस्ट ऑफिसचा शिक्का ९-३- १९९९ असा आहे. मी ९ मार्च रोजी सकाळीच लांबच्या प्रवासाला (अलाहाबादला) गेलो व २३ मार्च रोजी परतलो. याच अवधीत रिसबूड यांची ८ पत्रे येऊन पडली होती. ती सर्व मला २३ मार्च रोजी पाहायला मिळाली. (११-३-९९ रोजी रिसबूडांनी लिहिलेले पत्र २३ मार्चला, मला दुपारी मिळाले.) उत्तरास विलंब का झाला हे आपणास (व रिसबूडांस) कळावे, म्हणून मी हे लिहीत आहे.

रिसबूडांची ८ पोस्टकार्डे

श्री. रिसबुड यांनी ९ मार्चपूर्वी मला लिहिलेल्या दोन पत्रांना, मी प्रवासाला निघण्यापूर्वीच उत्तरे लिहिली आहेत. त्यांची प्रतिक्रिया म्हणून त्यांनी लागोपाठ ८ पोस्टकार्डे (व नंतरचे ९ वे पत्र) लिहिली आहेत. ही आठ पत्रे पोस्टकार्डवर, व माझ्या उत्तराची अपेक्षा न करता लिहिली आहेत. ही सर्व पत्रे पोस्टकार्डवर न लिहिता, एकाच पत्रात सविस्तरपणे आपले म्हणणे त्यांना मांडता आले नसते काय ? निश्चित मांडता आले असते. मग अशी ८ पोस्टकार्डे १२ दिवसात लागोपाठ लिहिण्यात त्यांचा काय उद्देश ? तो अर्थात, तेच जाणोत. मला जाणवले ते हे, की ही पत्रे म्हणजे त्यांच्या माझ्याविषयी उचंबळून आलेल्या भावनांचे १२ दिवसातील catharsis आहे. माझ्या

लिखाणामुळे त्यांना झालेली मळमळ त्यांनी लागोपाठ १२ दिवस ओकली आहे. माझ्या लिखाणाने ते किती अस्वस्थ झाले आहेत, हे यावरून दिसून येते. वास्तविक एवढे भावनाप्रधान बनण्याचे काहीच कारण नव्हते. शास्त्रीय पद्धतीने डोके शांत ठेवून, सोडविण्याचा हा प्रश्न आहे. म्हणून मी 'अंनिस'ला अगदी साधे प्रश्न प्रथम विचारतो. त्याची उत्तरे द्यावीत.

प्रथम माझ्या साध्या प्रश्नाचे 'अंनिस'ने स्पष्ट उत्तर द्यावे.

माझा 'अंनिस'ला एक साधा व सरळ प्रश्न आहे. त्याचे स्पष्ट उत्तर आपण दोघांनी 'अंनिस'तर्फे द्यावे, हा प्रश्न असा नाडीप्रकरणाचा निकाल लावण्याचे 'अंनिस'च्या मनात खरोखरच आहे काय? दुसऱ्या शब्दात, नाडीचे सत्यासत्य **'अंनिस'ला प्रामाणिकपणे ठरवायचे आहे काय?**

या प्रश्नाचे 'नाही' असे उत्तर असेल, तर पुढे चर्चा करण्याचे, मला व ओकांना पत्रे लिहिण्याचे किंवा 'अंनिस'च्या 'वार्तापत्रा'त या विषयावर लेख लिहिण्याचे काहीच कारण नाही. त्याने काही साधणार नाही. काही साधायचेच , असेल, तर ते 'नाडीचे सत्यासत्य ठरविणे टाळणे' हे काम साधेल. त्यासाठीची आपली सर्व धडपड आहे, हे त्यातून सिद्ध होईल.

या प्रश्नाचे 'होय' असे उत्तर असेल तर?

या प्रश्नाचे 'अंनिस'चे उत्तर 'होय' असे असेल तर माझा 'अंनिस'ला एक दुसरा साधा आणि सरळ प्रश्न आहे. त्याचेही स्पष्ट उत्तर आपण दोघांनी 'अंनिस'तर्फे द्यावे. हा दुसरा प्रश्न असा नाडीचे सत्यासत्य तर्कवादाने ठरते, की नाडी केंद्रात जाऊन, नाडीची परीक्षा घेतल्याने ठरते?

या प्रश्नाचे 'अंनिस'चे उत्तर 'तर्कवादाने ठरते' असे असेल, तर नाडीचा प्रश्नच मिटतो. 'अंनिस'ची नाडीविषयक भूमिका शास्त्रीय नाही, हे त्यावरून सिद्ध होते. जयंत नारळीकर सुद्धा नाडीची प्रत्यक्ष तपासणी करूनच, तिचे सत्यासत्य ठरविले पाहिजे, अशी रास्त (म्हणजे शास्त्रीय) भूमिका घेतात. (मात्र ही तपासणी हजार-दोन हजार सँपल्स घेऊन केली पाहिजे, असे त्यांचे म्हणणे आहे, ते कसे शास्त्रीय

निकषांखाली टिकू शकत नाही, हे विज्ञानातील त्याच्या प्रगतीतील - उदाहरणे देऊन मी दाखवून दिले आहे.)

या प्रश्नाचे उत्तर 'परीक्षा घेऊन' असे असेल तर?

या प्रश्नाचे 'अंनिस'चे उत्तर 'नाडीचे सत्यासत्य, नाडी केंद्रात जाऊन तिची परीक्षा घेऊन ठरते' असे असेल तर आपण (अंनिस) नाडीकेंदात जाऊन तिची परीक्षा घ्या. 'वार्तापत्रा'त लेख लिहीत बसू नका. त्याने काहीही साधणार नाही. 'शिळ्या कढीला ऊत' हा आपल्या लेखाचा मथळा मात्र असे सुचवितो, की आपल्याला ('अंनिस'ला) नाडीचे सत्यासत्य तिची परीक्षा घेऊन ठरवायचे नाही, तर कसेही करून ते टाळायचे आहे. हे मोठे दुर्दैव आहे. वास्तविक 'सत्य' हे शिळ्या कढीसारखे नसते. एखाद्या गोष्टीतील सत्य शोधणे, हे कधीच शिळे होत नाही. ते शिळे झाले म्हणून वैज्ञानिकांनी ते सोडून दिले असते, तर विज्ञानात प्रगतीच झाली नसती व अंधश्रद्धा बोकाळल्या असत्या नाडीच्या प्रकरणात फसवणूक असते, लबाडी असते, असे ती फसवणूक व ती लबाडी उघड करून दाखवल्याशिवाय 'अंनिस'ला म्हणता येणार नाही. वास्तविक नाडीचे प्रकरण हे 'अंनिस'ने आपल्यासमोरील एक आव्हान मानले पाहिजे. पण तसे न मानता हे एक 'संकट' आहे असे, ती मानत असावी, असे दिसते. ही पराभूत वृत्ती 'अंनिस'ने टाकून द्यावी व नाडीला सामोरे जावे. आपण आपल्या लेखाच्या शेवटी म्हटले आहे, की "प्रत्येकाने मारुतीच्या बेंबीत बोट घालून, स्वतः अनुभव घेतला पाहिजे, असा त्यांचा (म्हणजे ओकांचा) आणि त्यांचे मित्र गळतगे यांचा 'वैज्ञानिक' आग्रह आहे!" आपण नाडीची परीक्षा तिचे सत्यासत्य ठरविणे हे विंचवाच्या - दंशाप्रमाणे संकट मानता, हे यावरून स्पष्ट होते, आणि ते टाळण्याची आपली धडपड यावरून उघड होते. म्हणजे नाडीचा इंगा (नाडीचे सत्य) मारुतीच्या बेंबीत बोट घालण्यापूर्वीच आपल्याला कळाला आहे, असे दिसते! म्हणजे नाडीला नाडीच्या सत्याला आपण भिता. जे सत्याला भितात त्यांना भोळसट, अंधश्रद्धाळू म्हणतात. वैज्ञनिक म्हणत नाहीत. वैज्ञनिक- अर्थात्, खरे वैज्ञानिक- कोणत्याही परीक्षेला भीत नाहीत. ते कोणत्याही परीक्षेला भीत नाहीत, याचे कारण ते सत्यशोधक असतात. आणि सत्याचा शोध सर्व घटनांची परीक्षा घेऊनच तडीस जाऊ शकतो. नाहीत किती सत्य आहे, की ती लबाडी आहे) हे तिची परीक्षा घेऊनच

ठरवता येणार आहे. तिच्या परीक्षेला 'अंनिस' भीत असेल, तर 'अंनिस' चे 'विज्ञान' हे सत्यशोधक विज्ञान नाही, तर त्याने विज्ञानाचे केवळ कातडे पांघरले आहे. असे म्हणावे लागेल. -

मी अजूनही आशा सोडलेली नाही. झाले गेले आपण सारे विसरून जाऊ 'या, व नाडीचे सत्यासत्य, तिची जाहीर परीक्षा घेऊन ठरवू या. मी 'बोथ अंधश्रद्धेचा' या पुस्तकाच्या पान १८२ ते १८४ पर्यंत मांडलेल्या अटीनुसार हे काम तडीस नेऊ या. त्यामुळे कुणालाही तक्रार करण्यास जागा उरणार नाही.

आपला लेख अवश्य 'वार्तापत्रात' छापा. पण त्याचबरोबर आपल्याला ('अंनिस' ला) दिलेले हे दोन भागातील माझे उत्तरही छापले जाणे अगत्याचे आहे. (ते एका अंकात शक्य झाले नाही, तर दोन-तीन अंकात छापले जावे.) माझे उत्तर ' वार्तापत्रा' ने छापले नाही, तर "तुमचे म्हणणे ऐकूनच घेणार नाही" हे मी न केलेले विधान रिसबूडांनी माझ्यावर जे लादले आहे, ते 'अंनिस'लाच मग लागू होईल.

श्री अद्वयानंद गळतगे यांनी 'अंनिस'ला दिलेले उत्तर

(भाग २)

श्री रिसबूड यांनी मला ६/३/९९, ९ / ३ / ९९, ११/३/९९, १२/३/ १९, १५/३/९९, १५/३/९९, १६/३/९९, १७/३/९९ व १९ / ३ / ९९ अशा तारखेची एकूण ९ पत्रे लागोपाठ लिहिली आहेत. त्या पत्रांना क्रमाने येथे उत्तर देत आहे.

(१) **लहानसहान गोष्टीतसुद्धा रिसबूड सरळ व्यवहार करीत नाहीत. मग मोठ्या गोष्टीत त्यांच्याकडून त्याची अपेक्षा कशी करावी?** हे कळण्यासाठी त्यांच्या पहिल्याच पत्राचा येथे विस्ताराने विचार करीत आहे.

“ पुणे ता २" एवढेच लिहिलेल्या, पण पुण्याच्या पोस्ट ऑफिसचा २७ फेब्रुवारीचा शिक्का पडलेल्या पत्रात रिसबूड म्हणतात, "आपण दिलेला फोन नंबर पाहून मी contact करण्याचा प्रयत्न केला. पण नंबर चुकीचा असावा, असे वाटते. तरी आपला घरचा **फोन नंबर** मला कळवावा ही वि." (अधोरेखित रिसबूडांचे) मी माझ्या ३/३/९९ च्या उत्तराच्या पत्रात लिहिले, की "आपण फोनवरून contact

करण्याचा प्रयत्न केला म्हणजे नेमके काय केले व मी दिलेला फोन नंबर चुकीचा असल्याचा निष्कर्ष आपण कशाच्या आधारे काढला, याचा आपल्या पत्रावरून बोध होत नाही. मी चुकीचा फोन नंबर देतो, असा यात माझ्यावर सुप्त आरोप असून आपण कोणताही निष्कर्ष घाईने काढता, हे यातून सूचित होते. साध्या फोन नंबरच्या चौकशीची ही अवस्था! मग पाच लाख रुपयांचे बक्षिस डोक्यावर घेतलेल्या नाडी भविष्याविषयी बोलायलाच नको."

मी असे का लिहिले हे प्रथम सांगतो. रिसबूडांनी फोन केल्यानंतर मी थोड्याच वेळात निपाणीतील माझ्या मुलाच्या घरी आलो व मला सुनेनं सांगितलं, की "पुण्याहून अमक्यांचा फोन आला होता. व त्यांनी गळतगे सर आहेत काय असे विचारले. ते कॉलेजला गेले आहेत, दुपारी दोनला येतील, असे मी त्यांना सांगितले. " मी सुनेला विचारले, की "त्यांनी 'अद्वयानंद गळतगे' असे माझे नाव घेऊन विचारले काय?" तर "नुसतेच गळतगे सर आहेत काय, असे विचारले. " असे तिने सांगितले. आता माझा रिसबूडांना प्रश्न आहे, की त्यांनी माझे नाव घेण्याचे का टाळले? नाव न घेता चौकशी करण्याची, ही कसली पद्धत? अशा पद्धतीने चौकशी करून, मी चुकीचा फोन नंबर दिला असा निष्कर्ष ते कसा काढतात ?

आता माझ्या पत्राला त्यांनी आपल्या ६/३ च्या पत्रात काय उत्तर दिले पाहा. ते म्हणतात, "मी जेव्हा प्रथम फोनवर contact करण्याचा प्रयत्न केला तेव्हा कानडीत व इंग्रजीत Please check the number, you have dialled असे उत्तर दोन-तीनदा मिळाले. फोनच्या डिरेक्टरीत निपाणीचा कोड नंबर ८३३१ आहे. 'भोज' हे नाव डिरेक्टरीत नाही व म्हणून ८३३८ हे पुस्तकात चुकीने छापले गेले असावे, असे वाटले. उगाच मनमुराद निष्कर्ष काढण्याइतका मी वेडा नाही.'

आता वस्तुस्थितीकडे लक्ष दिले, तर रिसबूड हे मनमुराद निष्कर्ष काढणारे वेडे आहेत, की डोळस बुद्धिवादी आहेत हे कळेल. वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी त्यांनी माझ्या पुढील प्रश्नांना उत्तरे द्यावीत.

(१) मी का पाहिली? पुस्तकात 'फोनचा कोड नंबर दिलेला असताना, त्यांनी डिरेक्टरी

(२) फोन खात्यातर्फे चुकीचा कोड नंबर असल्याचे सांगितले गेल्यानंतर व check करण्यास सांगितल्यानंतर पुन्हा पुस्तकातील कोड नंबर चेक करून पाहण्याऐवजी त्यांनी डिरेक्टरी का पाहिली?

(३) मी पुस्तकात ०८३३८ असा कोड नंबर दिलेला असताना "८३३८ हे चुकीचे (पुस्तकात) छापले गेले असावे" असे ते कसे म्हणतात ?

(४) पुस्तकातील मी दिलेला कोड नंबर चुकीचा छापला गेला असेल व डिरेक्टरीतील कोड नंबरवरही contact होत नसेल तर त्यांनी शेवटी माझ्या सुनेशी फोनवर contact कसा केला, हे ते का सांगत नाहीत?

(५) मी पुस्तकात दिलेल्या कोड नंबरवरच शेक्टी त्यांनी contact केलेला असताना ते मला नंतर लिहिलेल्या पत्रात 'पुस्तकातील नंबर चुकीचा असावा, ' असे कसे म्हणतात ?

(६) मी भोजचा फोन नंबर दिलेला नसताना, मला घरचा (भोजचा) फोन नंबर ते कसा विचारतात ? भोजला माझ्याकडे फोन आहे, हे त्यांनी कशाच्या आधारे ठरविले?

वरील प्रश्नसरणीवरून लक्षात येईल, की पुस्तकात दिलेल्या कोड नंबरवरच रिसबूडांनी शेवटी contact केला. म्हणजे पुस्तकात मी दिलेला कोड नंबर चुकीचा, हा त्यांचा निष्कर्ष चुकला, हे त्यांना माहीत आहे. पण ही गोष्ट ते उघडपणे मान्य करीत नाहीत. पुस्तकात चुकीचा नंबर दिल्याच्या, आपल्या निष्कर्षाला ते अजूनही चिकटून बसले आहेत, त्यात आपली गफलत झाली हे अजूनही ते मान्य करायला तयार नाहीत. उलट स्वतःचे समर्थन करतात की, "मी मनमुराद निष्कर्ष काढणारा वेडा नाही." पुस्तकात दिलेला कोड नंबर चुकीचा असल्याचा त्यांचा निष्कर्ष 'मनमुराद' नाही, तर काय डोळस आहे? आपली चूक झाली हे मान्य करण्याइतपतही त्यांच्यात प्रांजळपणा नाही, हे यावरून सिद्ध होते. "साध्या फोन नंबरच्या चौकशीची ही अवस्था! मग पाच लाख रुपयांचे बक्षीस डोक्यावर घेतलेल्या नाडी भविष्याविषयी बोलायलाच नको," असे मी का म्हटले हे आता लक्षात येईल.

(२) या ६/३ च्या पत्राच्या शेवटी रिसबूड लिहितात, 'मी तुमचे म्हणणे ऐकूनच घेणार नाही' हे म्हणणे ठीक वाटत नाही." मी 'तुमचे म्हणणे ऐकूनच घेणार नाही' असे मी कुठेच म्हटलेले नाही. मी माझ्या ३/३ च्या पत्रात म्हटले आहे, की "नाडीचा अनुभव न घेता लिहिलेले काहीही वाचण्यात मला रस नाही." यावर ९ / ३ च्या पत्रात रिसबूड मला विचारतात, की " तर मग आपण माझे पत्र का वाचले ?" याला त्यांच्याच भाषेत उत्तर द्यायचे तर असे देता येईल, की "मग आपण मला इतकी पत्रे का लिहिली? आपण ती लिहिली म्हणून मी ती वाचली. आणि ती वाचली म्हणून हे उत्तर मी देत आहे. नाहीतर उद्या तुम्ही म्हणाल, की गळतग्यांजवळ आमच्या प्रश्नांना उत्तर नाही." पण रिसबूडांना माझे "अनुभव न घेता लिहिलेले वाचण्यात मला रस नाही." हे विधानचं कळालेले नाही. अनुभव न घेता लिहिलेल्यात रस न घेणाऱ्या माणसाने असले लेखन वाचूच नये, असे ठरत नाही. आणि तसले लेखन वाचल्याने त्यात त्याला रस आहे, असेही ठरत नाही. ही साधी गोष्ट रिसबूडांना कळाली असती तर, "माझे पत्र का वाचले ?" असला अडाणी प्रश्न त्यांनी मला विचारला नसता.

(३). ९/३ च्या पत्रात मला उद्देशून रिसबूड म्हणतात, "महाभारत काळानंतर कोणते महर्षी झाले, ते आपल्याला माहीत असल्यास कळवावे." महाभारत काळानंतर (त्रिकाळज्ञानी) महर्षी झाले, असे विधान मी कोठेच केलेले नाही. असे असताना त्यांनी मला हा प्रश्न का विचारावा, हे कळत नाही. माझे म्हणणे 'अगस्त्य नाडीग्रंथांचा माझा अनुभव, हे ग्रंथ लिहिणारे लोक सिद्धी प्राप्त झालेले असावेत, असे सुचवितो' एवढेच आहे. हे सिद्ध पुरुष केव्हा होऊन गेले, याविषयी मी काहीही म्हटलेले नाही म्हणायचे नाही.

(४) त्याच (९/३ च्या पत्रात रिसबूड मला उद्देशून म्हणतात, "दुसऱ्यास दूषणे दिल्याशिवाय लिहायचे नाही अशी आपली प्रतिज्ञा असावी." मी काय दूषणे दिली? मी फक्त त्यांना असा प्रश्न विचारला की, "द्वापार युगानंतरत्रिकाळज्ञानी 'महर्षी' झाले नाहीत, असे जे आपण म्हणता त्याचे ज्ञान आपल्याला कसे झाले?" आणि हे ज्ञान आपल्याला श्रीमद्भागवतावरून झाले असे स्वतःरिसबूडच माझ्या प्रश्नाचे उत्तर देतात आणि मी दुसऱ्यांना दूषण देतो, हा आरोप अशा रीतीने स्वतःच खोडून काढतात!

(५) आता माझी त्यांना विनंती, की "श्रीमद्भागवताच्या कोणत्या श्लोकात असे म्हटले आहे, हे त्यांनी कळवावे."

(६) त्यानंतरचे माझे त्यांना पुढचे प्रश्न : "श्रीमद्भागवतकार जे म्हणतात, त्यावर रिसबूड कशाच्या आधारे विश्वास ठेवतात? तो आधार ते शास्त्रीय मानतात काय? मानत असतील, तर तसे मानण्याचे त्यांचे शास्त्रीय निकष कोणते ?" या सर्व प्रश्नांची उत्तरे वैज्ञानिक निकषाला उत्तरतील, अशी त्यांनी द्यावीत, अन्यथा 'श्रीमद्भागवतकार जे म्हणतात, ते खरे आहे असे कसलाही वैज्ञानिक आधार नसताना रिसबूड मानतात.' हा आरोप (अंधश्रद्धाळूपणाचा) मुकाट्याने मान्य करावा.

(७) त्याच (९/३च्या) पत्रात रिसबूड म्हणतात, "पट्ट्या जीर्ण झाल्यामुळे त्यांच्या प्रती करून घेतल्या असण्याची शक्यता ओकांनीच दर्शविली आहे. मग कार्बन टेस्टचा काय उद्देश राहतो?" काय उद्देश राहतो, हे उघड आहे. निदान, पट्ट्यांचा सर्वात अलीकडचा काळ तरी त्यामुळे निश्चित करता येतो. त्यामुळे या पट्ट्यां किमान किती जुन्या आहेत, एवढे तरी निश्चित होईल.

(८) याच (९ / ३च्या पत्रात रिसबूडांनी माझ्या verification विषयी अनेक प्रश्न विचारले आहेत. त्या सर्व प्रश्नांची मी त्यांना आयती उत्तरे द्यावीत अशी त्यांची अपेक्षा आहे. ही आयती उत्तरे त्यांना द्यायला, मी काही त्यांचा पैसे देऊन मद्रासला पाठवलेला नोकर नाही. त्यांना याविषयी कुतूहल असेल, तर स्वतःमद्रासला जाऊन त्याची उत्तरे त्यांनी मिळवावीत. शेवटी अंधश्रद्धेविरुद्ध तुम्ही लढा देत असल्याचा डांगोरा पिटीत आहात ना? मग हा लढा दुसऱ्यांच्या मार्फत आणि तोही गळतग्यांसारख्या "अंधश्रद्धेची ढापणे लावलेल्या माणसामार्फत तुम्ही कसा लढू पाहता ? कूट लिपीचा उलगडा करण्याचे काम इतरांवर सोपविण्याऐवजी तुम्ही स्वतच्र का करत नाही? 'कार्बन टेस्ट'ची कल्पना तुम्हाला का सुचत नाही? या माझ्या प्रश्नाने चिडून जाऊन रिसबूड "तुम्ही उंटावरून शेळ्या हाकण्याचे, शहाणपण दाखवता. पण मग तुम्हीच ही टेस्ट का करीत नाही?" असा प्रश्न मला विचारतात. वास्तविक पुण्यात बसून, मद्रासमधील नाडीचे इतरांकरवी संशोधन करू पाहणारे, रिसबूडच उंटावरून शेळ्या हाकण्याचे शहाणपण दाखवत आहेत. मद्रासला प्रत्यक्ष जाऊन त्याचे संशोधन करणारे गळतगे नव्हे. रिसबूडांच्या उणीवा दाखवताच त्यांचा

विवेक सुटतो व स्वतला लागू होणाऱ्या उपमा, ते दुसऱ्यावर लादून मोकळे होतात. रागाने त्यांची दृष्टी इतकी आंधळी बनते, की दुसऱ्यांना उद्देशून आपण जी विधाने करतो, ती आपल्यालाच लागू होतात, याचे त्यांना भान राहत नाही. याची अनेक उदाहरणे देता येतील. १५ / ३ च्या पत्रात ते मला उद्देशून म्हणतात, की "तुमच्या डोळ्यावर अंधश्रद्धेची ढापणे" आहेत. माझ्यावर अंधश्रद्धेचा आरोप करणारे रिसबूड, 'द्वापारयुगानंतर त्रिकालज्ञानी महर्षी झाले नाहीत.'* या भागवतातील कथित विधानावर मात्र डोळे झाकून विश्वास ठेवतात का विश्वास ठेवतात ? कारण नाडी ग्रंथ खोटे ठरविण्यास त्याचा उपयोग होतो म्हणून! नाडीग्रंथ खोटे ठरविण्यासाठी, मद्रासला जाऊन त्यांची तपासणी करण्याचे कष्ट टाळण्याची किती नामी युक्ती ही! पुण्यात घरात बसून हे करता येते! आणि तेही कसलाही पुरावा न देता. केवळ भागवताच्या आधारे आणि ही रिसबुडांची अंधश्रद्धा नव्हे बरे का. अंधश्रद्धा मद्रासला जाऊन नाडीची प्रत्यक्ष परीक्षा करणाऱ्या गळतग्यांकडेच असू शकते! आणि गळतग्यांच्या या अंधश्रद्धेचे गुपित फक्त रिसबूडनाच माहीत आहे ! (इतरावर जे आरोप रिसबूड करतात, ते त्यांनाच कसे लागू होतात व भावनेच्या आहारी गेल्यामुळे त्यांना याचे कसे भान राहात नाही, याची उदाहरणे यथाक्रम पुढे दिसून येतील.) '

(९) रिसबूडांनी ११/३ चे पत्र माझी शुद्ध टिंगल करण्याच्या हेतूने लिहिले आहे. कानडीतूनही आपल्याला शिव्या देता येतात, हे गळतग्यांना कळावे, हा त्यांचा हेतू यात उघड दिसतो. मी त्यांच्या पातळीला अर्थातच उतरू शकत नाही.

(१०) १२ / ३ च्या पत्रात रिसबूडांनी माझ्यावर नाडी केंद्राचा प्रचार करण्याचा आरोप केला आहे. नाडीकेंद्रात नाडीविषयीची परीक्षा घेऊन जे आढळले, ते सांगणे म्हणजे नाडीकेंद्राचा प्रचार करणे, ही 'प्रचारा'ची ज्यांची कल्पना आहे, त्यांच्या कल्पना दारिद्र्याची कीव करावी तितकी थोडीच आहे.

(११) मी रिसबूडांना लिहिलेल्या माझ्या दुसऱ्या पत्रात म्हटले आहे, की "नाडीचा अनुभव न घेणारे आपण नाडीचा प्रत्यक्ष अनुभव घेणाऱ्या मला अमुक मुद्दा बाजूला ठेवा, तमुक वाद करा असा सल्ला द्यावा, याचा अर्थ काय?" या माझ्या विधानाचा राग येऊन रिसबूड १५/३ च्या पत्रात म्हणतात, "केवढी ही घमेंड!" वास्तविक नाडीचा अनुभव घेणाऱ्याना ज्या गोष्टी कळतात, त्या व तशा नाडीचा

अनुभव नसणाऱ्यांना कळणार नाहीत, एवढेच यात मला सुचवायचे आहे.पण रिसबूडांना यात घमेंड दिसते. कारण ते स्वतःच घमेंडखोर आहेत. कसे हे त्यांचे पुढचेच विधान सांगते. ते पुढे मला उद्देशून म्हणतात, "वार्तापत्राचा एप्रिलचा अंक प्रसिद्ध झाल्यावर, माझ्या सल्ल्याप्रमाणे कूट लिपीच्या मुद्यावर तुम्हाला व विंग कमांडरांना झक मारत यावे लागेल." आता कुणाचे विधान घमेंडखोर आहे बरे ?.

---

* भागवतकार द्वापारयुगानंतर त्रिकालज्ञ ऋषी झाले नाहीत असे म्हणत असतील, तर हे नाडीग्रंथ किमान द्वापारयुगात लिहिले गेले असे ठरते. पण नाडीग्रंथाविषयी भागवतांची साक्ष काढणाऱ्यापुढे द्वापारयुग केव्हा संपले, भागवत केव्हा लिहिले गेले याचा कालनिर्णय करण्याची समस्या आहे. (नंतर जोडलेली टीप)

(१२) याच (१५ / ३च्या) पत्रात रिसबूड म्हणतात, " 'अनुभव-अनुभव' असा डांगोरा आपण सतत पिटीत आहात. पण आपण काय अनुभव घेतलात, तर ओकांनी पढवून ठेवलेल्या कुणा राघवनच्या शब्दावर विश्वास ठेवून खुषीत गाजरे खात बसलात!" वास्तविक मी कोणकोणते अनुभव घेतले हे माझ्या प्रस्तावनेत मला सांगणेच शक्य नाही व नव्हते. त्यासाठी तर मी प्रत्येकाने अनुभव घ्यावा असा आग्रह धरला आहे. राघवनचे उदाहरण मी इतरांना पटावे, म्हणून दिले आहे. माझी खात्री राघवन पेक्षा माझ्या अनुभवांमुळे झाली आहे. तो अनुभव रिसबूडांना नसल्यामुळे व तो घ्यायचा नसल्यामुळे वास्तविक तेच खुषीत गाजरे खात बसले आहेत!

(१३) याच (१५/३च्या पत्रात पुढे रिसबूड म्हणतात, "पट्टीत नसलेली नावे कशी वाचता येतात, याचे संशोधन करायला नारळीकर कशाला हवेत ? साधी कॉमनसेन्स असलेल्या माणसालाही ते करता येईल. तुमच्या डोळ्यावर अंधश्रद्धेच्या कापणे असल्यामुळे तुम्हाला काहीच दिसणे शक्य नाही. तुम्ही फक्त घमेंडीत वावरावे." कुणाच्या डोळ्यावर अंधश्रद्धेची ढापणे आहेत, कोण घमेंडीत वावरत आहेत, याची एकदा नाडी केंद्रातच तटस्थ पंचांच्या साक्षीने परीक्षा होऊ द्या ना? आहे तयारी ? पट्टीत नसलेली नावे कशी वाचता येतात, हे एकदा त्या सर्वांच्या साक्षीने जगाला कळू

द्याच. आता मागे घेतलात, तर तुम्ही घमेंडखोर तर आहातच, पण पोकळ घमेंडखोर आहात हे सिद्ध होईल. तेव्हा लवकरात लवकर तारीख ठरवा. आम्ही सदैव तयार आहोतच. इत: पर पोकळ वल्गना बंद !

(१४) कार्बन टेस्टविषयी एक खास पत्र रिसबूडांनी १५/३ ला लिहिले आहे. त्याला उत्तर वर क्रमांक ७ आणि ८ मध्ये दिलेले आहे, ते पाहावे. याच (१५ / ३ च्या पत्रात ते शेवटी मला उद्देशून म्हणतात, "तुमचे ज्ञान जितके तोकडे आहे, तितकाच तुमच्या अहंकाराचा ताठा मोठा आहे." नाडीपट्टीत व्यक्तीचे नाव कोरून येते की नाही, याची शहानिशा करण्याच्या प्रश्नांमध्ये एखाद्याच्या ज्ञानाचा आणि अहंकाराचा संबंध कोठे येतो? या असंबद्ध गोष्टींची आठवण त्यांना का होते? कारण ते स्वतःच ज्ञानाची घमेंड बाळगतात आणि अहंकारी आहेत म्हणून! रिसबूडांना किती चटकन् राग येतो, याचा हा पुरावा! आणि त्यांच्या घमेंडीचा व अहंकाराचाही !

(१५) 'विद्या विनयेन शोभते' असा सल्लाही रिसबूड याच पत्रात मला देतात. ९/३ च्या पत्रातही Try to address others in courteous language असा सल्ला मला त्यांनी दिला आहे. केवळ माझी टवाळी टिंगल करण्यासाठी खास एक पोस्टकार्ड लिहिणारे रिसबूड मला courteous (सभ्य) भाषेत लिहिण्याचा सल्ला देतात! यापेक्षा मोठा विरोधाभास दुसरा कोणता असू शकेल? त्यांची दृष्टी रागामुळे किती आंधळी बनली आहे, याचाच हा पुरावा आहे. (रागामुळे ते विवेक हरवून बसतात, हे वेगळेच.) मी त्यांना फक्त दोन पोस्टकार्डे लिहिली आहेत. त्यात मी discourteous (असभ्य) काय लिहिले आहे, याचे एक तरी उदाहरण त्यांनी का दिले नाही? उलट रिसबूडांची 'घमेंड बाळगणे', 'अहंकारी आहात, 'गाजरे खात बसा', 'अनुभव चुलीत घाला' (११/३चे पत्र) ही भाषा 'सभ्य' आहे काय ? ९९ / ३ च्या पत्रात ओकांना रिसबूड 'महामूर्ख' म्हणतात, मला उद्देशून "तुमच्या डोक्यात गुर्मी' आहे, अशी भाषा वापरतात. ही भाषा 'सभ्य' आहे काय ?

(१६) १६ / ३ च्या पत्रात रिसबूडांनी नाडीवाले जादू करतात, असे म्हटले आहे. हे पुण्यात बसून म्हटले, तर त्याला शून्य किंमत आहे. अनुभव घेऊन म्हटले तर, विचार करता येईल. पण अनुभव घेणारे खुद्द 'अंनिस' चेच ओंकार पाटीलही असे म्हणत नाहीत. ही गोष्ट रिसबूड कसे वाटेल ते बरळतात, हे दाखवून देते.

(१७) याच (१६/३च्या पत्रात शेवटी रिसबूड मला उद्देशून म्हणतात, "ओक नाडीचा तमाशा फड उभा करतात आणि तुम्ही ढोलकी वाजवून साथ करता! What a shame!" 'अंनिस'ला आम्ही नाडीविषयी मांडलेले पुरावे खोडून काढता न आल्यामुळे, शेवटी अशा अलंकारिक भाषेत आमची सवंग टर उडविण्याच्या पातळीला रिसबुडांना यावे लागले आहे. स्वतला विज्ञानवादी व बुद्धिवादी म्हणवून घेणा-या 'अंनिस'चीच ही वास्तविक shame आहे. पुराव्याची जागा अशा उपमा अलंकारांनी भरून काढू पाहणाऱ्या 'अंनिस'च्या रिसबूडांचीच तर ही मोठीच shame आहे! पण रागाने आंधळ्या बनलेल्या त्यांच्या दृष्टीला हे दिसणे शक्य नाही. विवेक गमावलेल्या त्यांच्या बुद्धीला हे कळणे ही शक्य नाही. आम्ही मांडलेल्या पुराव्यांची छाननी करून ते खोडून काढायचे तर शारीरिक कष्ट घेतले पाहिजेत, मद्रासला गेले पाहिजे. ती इच्छा / कुवत / धाडस नसल्यामुळे रिसबूड आमची सवंग भाषेत टर उडविण्याशिवाय बाकी दुसरे काय करू शकतात ?*

---

(१८) १७/३ चे पत्र (पोस्टकार्ड) रिसबूडांनी इंग्रजीत लिहिले आहे. यात मी सत्य दडपले आहे, असा माझ्यावर आरोप करून कोणकोणती 'सत्ये' दडपली याचा पाढा वाचला आहे. त्यात पहिले astrological truth आहे. हे astrologi- cal truth शं. बा. दीक्षितांच्या पुस्तकातील असावे. ते अगस्त्य नाडीकेंद्राला लागू होत नाही. ते कसे हे त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय कळणार नाही. दुसरे कूटलिपीचे decnding दडपल्याचा आरोप आहे. त्याला क्र. ८ मध्ये उत्तर दिले आहे. तिसरे त्रिकाळज्ञानी महर्षींच्या अस्तित्वाबद्दलचे सत्य दडपल्याचा आरोप आहे. त्याला क्र. ३ ते ६ पर्यंत उत्तर दिले आहे. चौथे एकूण भूर्जपत्रांची संख्या किती होईल, या विषयीचे सत्य दडपल्याचा आरोप आहे. या आरोपाला प्रत्यक्ष वैज्ञानिक तपासणीपुढे शून्य किंमत आहे. पाचवे 'बोध अंधश्रद्धेचा' पुस्तकातील पान १२१ वरील ओकांचे एक विधान दडपल्याचा आरोप आहे. हे विधान प्रत्येक वेळी भूर्जपत्रातील मजकूर बदलतो, त्यामुळे पट्ट्या संख्येने कमी वाटल्या, तर आश्चर्य नाही अशा आशयाचे आहे. हे विधान, गळतग्यांनी दडपण्याचा प्रश्न कुठे आणि कसा उद्भवतो? ओकांनीसुद्धा रमणी गुरुजींचा हवाला देऊन हे विधान केले आहे. तेव्हा त्याची शहानिशा प्रत्यक्ष रमणी गुरुजींची परीक्षा घेऊन हवी तर करून घ्यावी. पुढे या पुस्तकाच्या ८४

पानावरील चौथ्या परिच्छेदात २०० वर्षांपूर्वी नाडी ग्रंथांचे पुनर्लेखन झाल्याचे श्री ओकांनी मान्य केल्याचे आणि हे मला माहीत असल्याचे रिसबूड म्हणतात. त्यामुळे काय फरक पडतो? किमान २०० वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या नाडी ग्रंथलेखकांना या शतकात जन्मलेल्या लोकांची नावे कशी माहीत झाली. (यात फसवेगिरी नसेल तर) हा प्रश्न शिल्लकच राहतो.

---

* मी हे पत्र लिहिल्यानंतर घाडपांडे यांनी 'अंनिस'च्या वार्तापत्रात प्रसिद्ध झालेला आपला लेख मला पाठवला असून त्याचा मूळचा 'शिळ्या कढीला ऊत' हा मथळा बदलून "विंग कमांडरांचा बहुरंगी बहुढंगी वग (ढोलकी खुद्द प्राचार्य गळतगे)' असा मथळा दिलेला आढळून येतो. या गोष्टीची सुचनाच रिसबुडांच्या १६-३ च्या पत्रात मिळते. (नंतर जो़डलेली टीप)

(१९) शेवटी याच पत्रात रिसबूड मला उद्देशून म्हणतात, "तुम्ही सत्याचा पाठपुरावा करता हा तुमचा दावा खोटा आहे. तुम्हाला फक्त 'अंनिस'चा पाणउतारा करायचा आहे." माझा दावा मी पुराव्यानिशी मांडला आहे. तो पुराव्यांनीच रिसबुडांना खोडून काढावा लागेल. नुसती फुसकी विधाने करून नाही. 'अंनिस'चा पाणउतारा नाडीच्या शास्त्रीय परीक्षेत मिळालेल्या पुराव्यामुळे होत असेल तर 'अंनिस' ची अब्रू तकलादू आहे, बेगडी आहे हेच सिद्ध होत नाही काय ?

(२०) शेवटच्या १९ / ३ च्या पत्रात रिसबूडांनी नवीन गोष्ट सांगितली आहे ती अशी, ते मला उद्देशून म्हणतात, "आंगठ्याच्या ठशाबरोबर सर्व तपशील तुम्ही १६-१२-१९९८ रोजी दुपारी १२ ॥ वाजता दिलात. तो तिथल्या रजिस्टरमध्ये नोंदवला गेला. पट्टी वाचणारा स्वामी तुमची बंडले आणण्याच्या मिषाने आतल्या भागात गेला. आणि रजिस्टरमधली सर्व माहिती त्याने वाचली. त्याच्या स्मरणशक्तीचे कौतुक व कौशल्य मानले पाहिजे. तुमचे नाव त्याने पट्टीतून वाचण्याचा देखावा केला आणि तुम्ही म्हणे अवाक् झालात! Gullibility, thy name is Galatge असेच मी म्हणेन." नाडीचा अनुभव नसल्यामुळे रिसबूडांनी कल्पनेच्या कशा भराया मारल्या आहेत, हे कळण्यासाठी त्यांचा हा विस्तृत उतारा मी येथे दिला आहे. मी प्रस्तावनेत पान आठवर म्हटले आहे, की "मी स्वतःच्या आंगठ्याचा उसा १६ डिसेंबर रोजी दुपारी

१२ ॥ वाजता दिला." येथे मी 'सर्व तपशील दिला असे कुठेही म्हटलेले नसताना, त्यांनी तसे का म्हटले? 'मी सर्व तपशील दिला' हे त्यांना अंतर्ज्ञानाने कळले, की कुणा गुप्त एजंटामार्फत कळले? पुढे ते म्हणतात, "तो (तपशील) तेथल्या रजिस्टरमध्ये नोंदवला गेला" हे त्यांना कसे कळले? तेथे रजिस्टरच ठेवलेले नसल्याने त्यात तपशील नोंद करण्याचा, व ते रजिस्टर आतल्या भागात जाऊन वाचण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, त्यामुळे नाडीवाचकाच्या स्मरणशक्तीचे कौतुक/कौशल्य मानण्याचाही प्रश्न निर्माण होत नाही. पुढचा माझे नाव वाचण्याचा देखावा करण्याचा तर प्रश्नच नाही. Gullibility, thy name is Galatge असे सूत सुद्धा नसताना सुताने स्वर्ग गाठणारे रिसबूड म्हणतात, अनुभव व माहिती हे दोन्ही नसल्यामुळे केवळ कल्पना शक्तीने लिहिलेले, त्यांचे हे भाकड पुराण वाचून Fantasy, thy name is Risbud असेच मला आता म्हणावे लागते!

(२१) शेवटी एक गोष्ट रिसबूडांना स्पष्टपणे सांगू इच्छितो, माझे 'अंनिस'शी कसलेही भांडण नाही. माझे भांडण पुराव्याशिवाय एखाद्या (असत्य) गोष्टींचा प्रचार करणाऱ्याशी आहे. कोणतेही सत्य प्रत्यक्ष प्रयोगाने, शास्त्रीय परीक्षेने पुरावे सादर करून ठरते. कल्पनाविलासाने, पुस्तकातील तात्त्विक चर्चेने वा तर्कवादाने ठरत नाही. "तुम्ही भलेही शास्त्रीय दृष्टिकोनाची बढाई मारा. पण तुमचा पिंड भोळसट, अंधश्रद्धाळू माणसाचा आहे." असे रिसबूड १७/३ च्या पत्रात मला उद्देशून म्हणतात, हे विधान त्यांनी कशाच्या आधारे केले आहे? त्यानी हे विधान पुराव्यानिशी सिद्ध करावे. ते पुराव्यानिशी त्यांनी जर सिद्ध केले नाही, तर त्यांचाच पिंड शास्त्रीय दृष्टिकोनाची पोकळ बढाई मारणाऱ्याचा आहे, असे मला म्हणावे लागेल. आणि का म्हणू नये? कारण शास्त्रीय दृष्टिकोन पुराव्याच्या आधारे बोलण्याने सिद्ध होतो. पुराव्याशिवाय जो बोलतो, त्यालाच भोळसट व अंधश्रद्धाळू म्हणतात. कोण पुराव्यानिशी बोलतो व कोण पुराव्याशिवायच बोलतो हे पुरावेच (किंवा त्यांचा अभावच) सांगतात, तेव्हा 'अंनिस'ला नाडीविषयीचे आपले म्हणणे तिची शास्त्रीय परीक्षा घेऊन पुरावे सादर करूनच सिद्ध केले पाहिजे. आम्ही सादर केलेले पुरावे खोडून काढायचे तर त्याविरुद्ध पुरावे 'अंनिस'ने सादर केले पाहिजेत. ही पुरावे सादर करण्याची जबाबदारी रिसबूड व 'अंनिस' कधीच टाळू शकणार नाहीत. तर्कवाद

करून, प्रतिपक्षाला शिव्या देऊन किंवा ज्योतिषशास्त्रातील माहितीचे बुजगावणे दाखवून, ही जबाबदारी टाळू पाहणे, हा शुद्ध पलायनवाद आहे. आपली,

अद्वयानंद गळतगे.

प्रती : ओक, दाभोळकर, अंनिस वार्तापत्र

परिशिष्ट ५

श्री. पेंडसे यांना घाटपांडे यांनी लिहिलेल्या पत्राला गळतगे यांचे उत्तर (प्रकरण १० पाहा)

भोज (बेळगांव) २/८/१९९९

श्री. प्रकाश घाटपांडे, सप्रेम नमस्कार.

(१) आपण श्री. प्रकाश पेंडसे यांना उत्तरादाखल लिहिलेल्या पत्राची प्रत मिळाली." आपण त्या पत्रात केलेली विधाने मी यापूर्वी तर्कशुद्ध रीतीने खोडून काढली आहेत. असे असताना त्यांची आपण या पत्रात पुनरुक्ती का केली आहे? एखाद्या विधानाची पुनरुक्ती केल्याने ते विधान बरोबर ठरत नाही. तर्कविरोधी भूमिकेला आपल्याला कसेही करून चिकटून बसायचे आहे काय? तसे असेल, तर ती जाणूनबुजून स्वीकारलेली 'तार्किक अंधश्रद्धा' ठरते. आणि आपण ती तशी स्वीकारली असेल, म्हणजेच (आपल्याच शब्दात) "आपल्या तर्कबुद्धीने जर झोपेचे सोंग घेतले असेल तर मीच काय कोणीही तुम्हाला जागृत करू शकणार नाही.

(२) आपण या पत्रात पुढील एक विधान केले आहे: “नाडीग्रंथाच्या टीकेसाठी सर्कबुद्धी पुरेशी आहे." आपण नाडीग्रंथाविषयी स्वीकारलेली ही 'तर्कबुद्धी' ची भूमिका तर्काच्या कसोटीवरच कितपत टिकते हे तपासून पाहिले असता वरील निष्कर्षाला पुष्टीच मिळते. कसे ते पाहू.

(३) आपण या पत्रात म्हटले आहे की "आपण म्हणता तो (नाडीग्रंथाचा) अनुभव घेणे हे मारुतीच्या बेंबीत बोट घालण्यासारखे आहे असे मला वाटते.” यावर मी म्हणतो की "तुम्हाला असे वाटते याचे कारण तुमची चुकीच्या भूमिकेला

आंधळेपणाने चिकटून बसण्याची प्रवृत्ती असे मला वाटते." आता कुणाचे 'वाटणे' बरोबर? हे कसे ठरवायचे? अर्थात, प्रत्यक्ष बेंबीत बोट घालून! याला दुसरा पर्याय नाही! अशारीतीने आपली तर्कबुद्धीची भूमिका चुकीची असल्याचे तर्कबुद्धीनेच सिद्ध होते! मी स्वतः'बेंबीत बोट घालून' पाहिले आहे. आपण (व आपली अंनिस) मात्र त्याला तयार नाही. 'बेंबीत बोट न घालताच' नाडीची सत्यासत्यता ठरविण्याची आपली भूमिका अशा रीतीने तर्कबुद्धीनेच चुकीची सिद्ध झालेली / होत असताना त्या भूमिकेला आपण आंधळेपणाने चिकटून बसला आहात नव्हे तिचे तर्कबुद्धीने वरचेवर समर्थन करीत आहात, हा आपला 'तार्किक आंधळेपणा' नव्हे काय ?

(४) मारुतीच्या बेंबीविषयीचे आपले वरील विधान असे सूचित करते, की 'नाडीग्रंथाचा अनुभव घेणे' हे 'मारुतीच्या बेंबीत बोट घालण्या सारखे आहे. आता याविषयीचा आपला तर्कबुद्धीचा युक्तिवाद कितपत बरोबर आहे हे पाहू, ही मारुतीच्या बेंबीची गोष्ट अशी आहे : मारुतीच्या बेंबीत बोट घालणाऱ्या पहिल्या व्यक्तीला विंचवाचा डंख बसला. पण ती व्यक्ती खरे बोलली नाही. बेंबीत 'गारवा' आहे असे ती खोटेच म्हणाली. म्हणून दुसऱ्या व्यक्तीने बोट घालून पाहिले. तिलाही तसाच डंख असला. पण तीही खोटेच बोलली. अशा रीतीने बेंबीत बोट घालणारा प्रत्येकजण खोटे बोलला, व प्रत्येकाला डंख बसला. आपले असे म्हणणे आहे काय, की नाडीग्रंथाचा अनुभव घेणारा प्रत्येकजण 'नाडीत आपले नाव कोरून येते' असे खोटेच म्हणतो? असे आपले म्हणणे नाही. आपले म्हणणे आहे, की नाडीवाले प्रत्येकाला नाव कोरून येते असे खोटेच सांगतात. येथे आपण दिलेले मारुतीच्या बेंबीचे उदाहरण कोलमडते. म्हणजे एक तर आपल्याला ही गोष्ट माहीत नाही किंवा तिचे उदाहरण देणारी आपली तर्कबुद्धी बरोबर काम करू शकलेली नाही.

(५) पण आपल्या सोयीसाठी ही कथा थोडी बदलून घेऊ व बेंबीत बोट घालणाऱ्या व्यक्तीऐवजी नाडीवालेच सर्वांना मारुतीच्या बेंबीत 'गारवा' आहे असे सांगतात, व तेही खोटेच असे समजू. आता या नव्या कथेनुसार नाडीबाले खोटे सांगत असतील, तर मारुतीच्या बेंबीत बोट घालणाऱ्या प्रत्येकाला विंचवाचा डंख बसायला पाहिजे. पण तसे होत नाही. प्रत्येकाला त्या बेंबीत 'गारवा'च लागतो. एकालाही डंख बसल्याचा अनुभव नाही. (अन्यथा मद्रासच्या तांबरम् नाडीकेंद्राला

लोकांच्या झुंडीच्या झुंडी गेल्या नसत्या.) म्हणजे हे सुधारून घेतलेले उदाहरणही लागू होत नाही. ते लागू व्हायचे झाल्यास निदान एकाला तरी डंख बसायला पाहिजे. पण असे कधी घडलेले नाही. तरीही आपण हे उदाहरण पुनःपुन्हा देता, याचे गुपित त्या अर्थी आपल्याला हा डंख बसला आहे, असे दिसते. आणि तोही बेंबीत बोट न घालता ! आपल्याला बेंबीत बोट न घालता हा डंख कसा बसला, एकदा आपण जगाला सांगावे. ते आपण सांगितलेत तर (आपल्याच शब्दात) "आपला हा शोध आपल्याला जागतिक कीर्तीवर नेऊन सोडेल."

(६) आपले आणखी एक विधान असे आहे : "ही (नाडीची) केस प्रायमा फेसी केसच नाही. या नी. र. वऱ्हाडपांड्यांच्या मताशी मी सहमत आहे." 'प्रायमा फेसी' म्हणजे 'प्रथमदर्शनी एखादी केस एकतर प्रथमदर्शनी 'वाजवी' असते, किंवा 'गैरवाजवी' असते. तेव्हा नुसतेच 'प्रथमदर्शनी केस नाही या विधानाला काही अर्थ नाही. म्हणजे वास्तविक आपले विधान असे पाहिजे "ही नाडीची केस प्रायमा फेसी 'वाजवी' केस नाही." तेव्हा ते विधान असे आहे असे समजू व त्याचा विचार करू.

आता एखाद्या केसमध्ये तथ्य (वाजवीपणा) आहे की नाही, हे न्यायाधीश प्रथमदर्शनी कसे ठरवितो? तर आपल्या पूर्वानुभवावर ठरवतो, कल्पनाविलासावर नाही. नाडी भविष्य खोटे असते, असा सर्वाचा पूर्वानुभव असला तरच नाडीची केस प्रायमा फेसी 'वाजवी' केस नाही असे म्हणता येईल. पण असा काही सर्वांचा पूर्वानुभव नाही. फलज्योतिषाचा अनुभव त्यासाठी कुचकामाचा आहे. कारण नाडीग्रंथ म्हणजे फलज्योतिष नव्हे. फलज्योतिष व्यक्तीच्या जन्माच्या वेळेच्या ग्रहस्थितीवर आधारलेले असते. उलट नाडीग्रंथ व्यक्ती जन्माला येण्यापूर्वीच तिची जन्मवेळेची ग्रहस्थिती कोणती असेल, हे सांगतो. अशारीतीने हा भविष्याचा अनोखा प्रकार असून, त्याची प्रत्यक्ष तपासणी करूनच त्यात कितपत तथ्य (वांजवीपणा) आहे, हे ठरविले, शोधले पाहिजे. तात्पर्य, ही नाडीची केस प्रायमा फेसीच्या पद्धतीने 'वाजवी' की 'गैरवाजवी' ठरवता येत नाही.

(७) एखादी व्यक्ती जन्मण्यापूर्वीच तिच्या जन्मवेळेची ग्रहस्थिती सांगणे,

म्हणजे ती केव्हा जन्मेल हे सांगणे, इतकेच नव्हे तर तिचे नाव काय असेल इत्यादी इतर तपशीलही सविस्तर सांगणे, हे केवळ असंभाव्य (अशक्य आहे; त्यासाठी पूर्वानुभव असण्याची जरुरी नाही, कारण कुठल्याही अनुभवात हे बसत नाही, असा येथे कोणी (बुद्धिवादी) युक्तिवाद करील, तर त्याला उत्तर असे, की बुद्धिवादाचे म्हणणे खोटे ठरविणाऱ्या 'असंभाव्य' घटना शास्त्रीय कसोट्यावर व * श्री पेंडसेंनी मला आपणाला लिहिलेल्या पत्राची प्रत पाठवलेली नाही. आपण पत्रात उल्लेख केलेला लेख 'शिळ्या कढीला ऊत' हा आहे, असे मी गृहीत धरले आहे.

प्रत्यक्ष अनुभवाने, सत्य ठरल्याचे अनेक ऐतिहासिक दाखले आहेत. असे दाखले शास्त्रज्ञांनी संशोधनाअंती अनेक ग्रंथातून नोंद करून ठेवले आहेत. त्या नोंदींच्या माहितीसाठी संदर्भग्रंथांची मला मोठी यादी येथे द्यावी लागेल. ती मी येथे देत नाही. नमुन्यासाठी पुढील ग्रंथ (अलीकडील दाखल्यासाठी) पाहा : **New Directions in Purapsychology John Beloff, 1974** (विशेषतःजर्मनीमधील रोझेनहाइम येथील पोलीसांची व शास्त्रज्ञांची मती गुंग करणारे भानामतीचे प्रकरण.) प्रस्तुत लेखकाचे **'विज्ञान आणि बुद्धिवाद' व 'विज्ञान आणि चमत्कार'** हे प्रकाशनाच्या वाटेवरील दोन ग्रंथ, अशा दाखल्यांनी भरले आहेत. नाडीला प्रायमा फेसी वाजवीपणा नाकारणाच्या वऱ्हाडपांड्यांच्या पत्राला मी दिलेल्या उत्तरातही काही (ताजे contemporary म्हणून) दाखले दिले आहेत, तेही पाहा. (**बोध अंधश्रद्धेचा**, पान १६९-१७६)

(८) नाडीभविष्यातील तथ्य नाकारणाऱ्यांना हे माहीत नाही, की ही केस विज्ञानाच्या आधुनिक कालविषयक संकल्पनेच्या दृष्टीने मुळीच 'असंभाष्य' नाही. ही आधुनिक विज्ञानाची कालविषयक संकल्पना भौतशास्त्रातील आईन्स्टाइनच्या विशेष सापेक्षता सिद्धांतावर व क्वांटम सिद्धांतातील हायजेनबर्गच्या अनिश्चिततेच्या तत्त्वावर आधारलेली आहे. यात लक्षात ठेवायची गोष्ट ही की भविष्यात हे दोन्ही सिद्धांत खोटे ठरले, तरी नाडीग्रंथाच्या सत्यतेला त्यामुळे मुळीच बाधा येत नाही. कारण त्याचे सत्य अनुभवाच्या कसोटीला उतरणारे आहे. कोणताही वैज्ञानिक सिद्धांत शेवटी अनुभवाच्या (प्रयोगाच्या = सत्यापनाच्या कसोटीला उतरला, तरच तो स्वीकारार्ह

(शास्त्रीय) ठरतो. अन्यथा नाही. विज्ञानाची तीच अंतिम कसोटी आहे. आणि त्याच कसोटीवर शेवटी नाडीग्रंथाच्या सत्यासत्यतेचा निर्णय केला पाहिजे.

(९) आपली पुढील आणखी विधाने अशी, "नाडीग्रंथावरील टीका ही काही पहिलीच नाही. या अगोदर **अमृततुषार**, ले, आत्मानंद, **नाडीग्रंथ : एक अभ्यास,** ले. शांताराम आठवले या जुन्या काळातील पुस्तकातही टीकेचा भाग आहे." जुन्या ग्रंथात नाडीवर टीका आहे. म्हणून ती खरी मानावी (व नाडीग्रंथ खोटे मानावेत) हा जो गर्भित अर्थ, आपण येथे सुचवला आहे, तो तर्कदुष्ट आहे. एखाद्या गोष्टीचा खरे खोटेपणा त्या गोष्टीवर पूर्वी टीका झाली होती की नाही, किंवा ती किती जुनी आहे यावरून ठरत नाही.*[10]

(१०) वरील ग्रंथाच्या लेखकांनी नाडीग्रंथावर विनाअनुभवच टीका कला आहे की अनुभवाच्या आधारे ? नाडीसारख्या प्रकरणावर विनाअनुभव कोणी टीका करणार नाही, हे उघड आहे. (आपण आणि आपली 'अंनिस'च याला अपवाद आहात!) आणि तशी कोणी केली, तर त्याची दखल घेण्याची आवश्यकता नाही.

(११) वरील ग्रंथ लेखकांना काही नाडीग्रंयांच्या व नाडीवाल्यांच्या खोटेपणाचा अनुभव आला असेलही. म्हणून सर्वच नाडीग्रंथ खोटे ठरत नाहीत. आपला वाद तांबरम् अगस्त्य नाडीग्रंथासंबंधी आहे. ते खोटे असल्याचे त्यांनी (वरील लेखकांनी) अनुभवाने दाखवून दिले असेल, तर ते आपण पुराव्यानिशी मांडावे. पण मग तो त्यांचा पुरावा त्यांच्या अनुभवावर आधारलेला असल्यामुळे 'नाडीग्रंथाच्या टीकेसाठी तर्कबुद्धी पुरेशी आहे' हे आपले म्हणणे तो खोडून काढतो! पण असा पुरावा आपण मांडलेला नाही. मग आपण वरील लेखकांची साक्ष का काढली आहे ? तर्कबुद्धीने नाडीचा खरेखोटेपणा ठरविता येतो, म्हणजेच 'नाडीवर टीका करण्यासाठी तर्कबुद्धी

---

[10] * शांताराम आठवले यांनी नाडीग्रंथावर टीका केली, असे घाटपांडे येथे धडधडीत खोटे सुचवितात. तो ग्रंथ त्यांनी अजिबात वाचलेला नाही, हे यावरून उघड होते. (प्रकरण १० पाहा.) (नंतर जोडलेली टीप)

पुरेशी आहे,' अशी भूमिका घेणारे आपण 'अनुभवाच्या आधारे नाडीवर टीका करणाऱ्या' वरील लेखकांची साक्ष काढावी, हे विसंगत नाही काय? ही गोष्ट असे सूचित करते, की आपली तर्कबुद्धीवरची भिस्त तकलादू आहे. दिखाऊ आहे, सोयीसाठी, डावपेचाचा भाग म्हणून आपण ती (तर्कबुद्धीची भूमिका) स्वीकारली आहे. खरे व निर्णायक महत्त्व अनुभवाला आहे, हे आपल्याला पटले आहे व मान्यही आहे. पण तो अनुभव तांबरम्ला जाऊन आपण घेतला, तर आपण उघडे पडू ही आपल्याला भीती आहे. माझे हे म्हणणे खोटेही असेल. पण ते खोटे असल्याबद्दल आजपर्यंत तरी काही पुरावा आढळून आलेला नाही. आपल्याला माझी विनंती व प्रेमाचा आग्रह आहे, की आपण व अंनिस माझे हे म्हणणे प्रत्यक्ष अनुभवाने खोटे ठरवावे, त्यामुळे मला मुळीच दुःख होणार नाही. सत्याची तरफदारी करणाऱ्याला सत्य काय आहे हे कळाले तर दुःख होण्याचे काय कारण? उलट त्याला त्याचा आनंदच होईल. आपण 'शिळ्या कढीला ऊत या लेखात कूटलिपीसंबंधी ओकांना जो सल्ला दिला आहे, तो आपण व अंनिस यांनी मिळून अंमलात आणावा (ओक मदत करतील), पण तत्पूर्वी नाडीचा अनुभव घेऊन त्यात लबाडी कशी असते, हे आम्हाला (तिचा अनुभव घेतलेल्या) सर्वांसमोर दाखवून द्यावे. **आपण असे केलेत, तर मी येथे प्रतिज्ञापूर्वक सांगतो, की 'माझी नाडीच्या बाबतीत फसगत झाली' असे (माझ्यापुरते तरी) लेखी जाहीर निवेदन करीन.** आणि आपण असे काही केले नाही, तर आपल्याला आपल्या (खोट्याच) तर्कबुद्धीच्या भूमिकेला आंधळेपणाने चिकटून बसायचे आहे, हे माझे म्हणणे खरे असल्याचे दुप्पट जोमाने सिद्ध होईल!

(१२) आपले शेवटचे विधान असे आहे. "पट्ट्यातील मजकूर दरवेळा बदलत असल्याने व पट्ट्या संख्येने कमी वाटल्या, तरी यापुढे असंख्य वर्षे मानवाला मार्गदर्शन होत राहील यात शंका नाही? याला बिनडोकपणा म्हणायचे, की श्रद्धा हे आपणच ठरवावे." ज्या विधानाला उद्देशून आपण हा बिनडोकपणाचा आरोप केला आहे, ते श्रीकुमार व रमणीगुरुजी यांच्या नाडीविषयीचे आहे. तांबरमूच्या अगस्त्यनाडीविषयी नाही. आपला वाद आहे अगस्त्य नाडीविषयी हा वडाची साल पिंपळाला लावण्याचा प्रकार आहे. दुसरे असे, की हे विधान करताना ओकांनी संबंधित व्यक्तीकडून तसे वदवून घेतल्याचे स्पष्ट म्हटले आहे. म्हणजे हा

बिनडोकपणा (असलाच तर) श्रीकुमार व रमणी गुरुजी यांचा असू शकतो. ओकांचा नाही. पण श्रीकुमार व रमणी गुरुजी यांचा तो आहे, हे तरी कसे त्यांची नाडी न तपासता ठरवणार? अर्थातच, आपल्या दृष्टीने 'नाडीग्रंथाच्या टीकेसाठी तर्कबुद्धी पुरेशी आहे!' तात्पर्य, तर्कबुद्धीचे हे आपले बुजगावणे कायमचेच उभे केलेले आहे! आणि त्याला जेव्हा आव्हान दिले जाते व ते खोडून काढले जाते तेव्हा जुन्या (आत्मानंद - आठवले या) लेखकांचा अनुभव आपल्या मदतीला धावून येतो! नव्या (ओक गळतगे या) लेखकांचा अनुभव मात्र (रिसबूडांच्या शब्दात) 'चुलीत घालण्याच्या लायकीचा असतो स्वतःनाडीचे संशोधन करण्याचे कष्ट घ्यायचे नाहीत व दुसऱ्यांच्या कष्टाला तुच्छ लेखायचे ही नीती बाकी 'तार्किक आंधळ्याना शोभणारीच आहे!

आपला स्नेहांकित,

अद्वयानंद गळतगे

ता. क. :- आपण (अंनिसचा) कार्यकर्ता म्हणून लेख लिहिलेला नाही, असे म्हटले आहे. मग तो अंनिसच्या वार्तापत्राला का पाठवला? आपण अंनिसची तरफदारी करीत नाही, असे प्रतिज्ञेवर म्हणता काय? स्वतःआपला तो लेख आपण अंनिसचा (शारीरिक नसला तरी) बौद्धिक कार्यकर्ता असल्याचा पुरावाच आहे. शारीरिक कार्यकर्त्यांचा खरा आधारस्तंभ बौद्धिक कार्यकर्ता हाच असतो.

प्रती ओक, दाभोळकर, अंनिस वार्तापत्र,

लेखकाचे निवेदन : या ग्रंथात वरील ४ व ५ ही दोन परिशिष्टे एक धर्मसंकट म्हणूनचं समाविष्ट केलेली आहेत. आमच्यावर व पर्यायाने नाडीप्रथावर विकृत टीका करणारे लेख 'अंनिस'च्या वार्तापत्रात या लोकांनी छापल्यामुळे व खासगी पत्रे लिहिल्यामुळे त्यांचा प्रतिवाद करणे हे कर्तव्य ठरले व तो केल्याचे सर्वांना कळणे आवश्यक आहे. त्यांच्या लेखनाचा दर्जा पाहता त्यांना उत्तर न देता त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य झाले असते, हे खरे असले तरी कधी कधी अप्रिय कार्यही आपद्धर्म म्हणून करावे लागते. राजाला वाकुल्या दाखविणाऱ्या अडाणी गुराखी पोराची टोपी हिसकावून घेण्याचाच हा प्रकार आहे, हे खरे आहे. टोपी घेतल्यामुळे गुराखी राजाला

म्हणतो, 'राजा भिकारी, टोपी घेतलीऽ' आणि ती त्याला परत दिल्यानंतर म्हणतो, 'राजा भ्याला, टोपी दीऽलीs.' याला म्हणतात राजावरील गुराख्याचा शाब्दिक विजय! पण तो शाब्दिक विजयही मिळविण्याचा आनंद या बुद्धिवाद्यांना मिळवता आलेला नाही, हे वरील पत्रव्यवहार दाखवून देतो!

पुण्यामध्ये मद्रासच्या नाडीकेंद्रातील लोकांनी नाडीग्रंथ वाचण्याच्या मद्रास - सारख्याच केंद्रांची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बुद्धिवाद्यांना आता 'मद्रास लांब आहे म्हणून नाडीग्रंथाचा अनुभव घेऊ शकत नाही,' अशी तक्रार करता येणार नाही. ही केंद्रे उघडून एक वर्ष उलटले तरी हे लोक तिकडे फिरकायला तयार नाहीत. यावरून वाचक योग्य तो निष्कर्ष काढतीलच.

परिशिष्ट ६

महाराष्ट्र अंधश्रद्धा संरक्षण समिती

(अर्थात, ५ लाख रुपयांच्या बक्षिसांचे रहस्य)

प्रस्तुत ग्रंथात उपस्थित केलेले मुख्य प्रश्न व त्यांची उत्तरे :

प्रकरण १ चा प्रश्न : कडेगावच्या भानामतीचा खोटेपणा सिद्ध करण्यासाठी 'अंनिस'कडून तपासणीत लबाडी का करण्यात आली ?

प्रकरण २ चा प्रश्न : दैवी चमत्कार खोटे म्हणणाऱ्या 'अंनिस'ने अनुराधा देशमुखांच्या विभूति चमत्काराची तपासणी जाग्यावर जाऊन आजपर्यंत का केली नाही ?

प्रकरण ३ या प्रश्न ज्योतिषशास्त्र थोतांड म्हणणाऱ्या 'अंनिस'चे आव्हान गिरीश शहा यांनी स्वीकारले असताना ती आव्हानप्रक्रिया पूर्ण न करताच मध्येच ती का पळून गेली ?

प्रकरण ४ चा प्रश्न : हेरवाडच्या भानामतीची तपासणी करण्यासाठी 'अंनिस' ने वापरलेली पोलिसी पद्धत अपयशी ठरल्यानंतर ती घडत राहिली असताना तिची तपासणी करण्यासाठी 'अंनिस' पुन्हा तेथे का गेली नाही ?

प्रकरण १० चा प्रश्न : नाडीभविष्याच्या खरेखोटेपणाची तपासणी नाडीकेंद्रात जाऊन विंग कमांडर ओकांच्या (किंवा तटस्थ निरीक्षकांच्या) समक्ष 'करण्याऐवजी 'अंनिस' इतकी वर्षे ओकांनाच (दुरून) दोष देत का बसली आहे ? या सर्व प्रश्नांची उत्तरे स्पष्ट आहेत. ती पुढीलप्रमाणे.

प्रकरण १ चे उत्तर : कडेगावच्या भानामतीच्या तपासणीत 'अंनिस' ने लाबडी केली नसती, तर 'भूतभानामती' हा प्रकार खोटा असतो हा 'अंनिस' करीत असलेला प्रचार पूर्ण लबाड व शुद्ध मतलबीपणाचा होता, हे सिद्ध झाले असते व 'विज्ञान प्रबोधिनी' चे उद्दिष्ट समाजाला सत्य समजू नये यासाठी खोटा प्रचार करणे हे आहे, हे जगाच्या निदर्शनास आले असते. म्हणजे विज्ञानाच्या नावाखाली हे लोक विज्ञानविरोधी कार्य करतात, हे सिद्ध झाले असते. 3

प्रकरण २ चे उत्तर : अनुराधा देशमुखांचा विभूती चमत्कार जाग्यावर जाऊन 'अंनिस' ने तपासला असता, तर दैवी चमत्कार खोटे असतात हा तिचा स्वत:चाच प्रचार खोटा होता, हे तिला जाहीरपणे मान्य करावे लागले असते.

प्रकरण ३ चे उत्तर : गिरीश शहांनी स्वीकारलेल्या 'अंनिस' च्या आव्हानाची प्रक्रिया तिने पूर्ण केली असती, तर 'ज्योतिषशास्त्र थोतांड आहे', हे 'अंनिस' चे म्हणणे खोटे होते, हे तिला जाहीरपणे मान्य करावे लागले असते.

प्रकरण ४ चे उत्तर : 'अंनिस' ने हेरवाडच्या भानामतीची पूर्ण तपासणी केली असती, तर भानामती ही अंधश्रद्धा नाही हे तिला जाहीरपणे मान्य करावे. लागले असते.

प्रकरण १० चे उत्तर : नाडीकेंद्रात जाऊन विंग कमांडर ओकांसमोर अगर तटस्थ लोकांसमोर अंनिसने नाडीची तपासणी केली असती, तर नाडी भविष्य हे थोतांड नाही व नाडीग्रंथ ही बनवेगिरी नाही, हे तिला जाहीरपणे मान्य करावे लागले असते.

अशा रीतीने भूतभानामती खोटी नाही, दैवी चमत्कार खोटे नाहीत, ज्योतिषशास्त्र हे थोतांड नाही, नाडीग्रंथ ही बनवेगिरी नाही हे सर्व सिध्द झाल्यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीला महाराष्ट्रात कशाचे निर्मूलन करण्याचे काम उरले असते ?

तिला आपली समिती गुंडाळून ठेवावी लागली असती. ती स्थापन करणारे लोक बेकार झाले असते.

तेव्हा प्रश्न ५ लाख रुपयांच्या बक्षिसाचा नाही. प्रश्न अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या लोकांच्या चरितार्थाचा आहे. लढा अंधश्रद्धेविरुध्दचा नाही. लढा बेकारीविरुद्धचा आहे.

'अंनिस'चे लोक बेकार व्हावेत अशी विज्ञानवाद्यांची मुळीच इच्छा नाही. त्यांच्या चरितार्थाची विज्ञानवाद्यांना चिंता नाही. त्यांची चिंता वेगळीच आहे. ''अंनिस' च्या लोकांनी 'बुद्धिवाद' नावाच्या टोपलीखाली 'पाच लाख रुपयांचे या बक्षिस' या नावाचा एक कोंबडा लपवून ठेवला आहे. आणि ते म्हणत आहेत ती, 'सत्याचा सूर्य कसा उगवतो हे आम्ही पाहणार आहोत.'

'अंनिस' च्या म्हातारीने कोंबडा झाकून ठेवल्याचे दु:ख नाही. पण सत्याच्या सूर्याला भिणाऱ्या घुबडांचा काळ सोकावतो. विज्ञानवाद्यांची ही खरी चिंता आहे.

00

परिशिष्ट ७

नाडी भविष्य पुढील घटनांच्या संदर्भात बरोबर येतेच असे नाही, असे का?

(प्रकरण १० पाहा)

विंग कमांडर शशिकांत ओक - माझ्या आधीच्या पुस्तकातून प्राचार्य आद्ग्यानंद गळतगे यांच्या पुस्तकातील महत्त्वाचा भाग देऊन वरील प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. तो अनेकांनी ती असेल.

येथे माझ्या जिवलग मित्राचे एक जळजळीत उदाहरण देऊन यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. सन २००२. वायूसेनेत पंजाबमध्ये पोस्टिंगवर असताना माझी ओळख फ्लाईंग ऑफिसर धनंजय मोटेशी झाली. सांगलीचा उमदा तरुण, रोज पहाटे जप-साई साधना, ऑफिसच्या कामात हाय ग्रेडिंग, इंग्रजी अस्खलित, बॉक्सिंग, गिटार वादन, पेंटींग-ड्रॉइंग हॉबीज, थोडक्यात बेस्ट ऑल

राऊंडर. लगेच आमची मैत्री झाली. त्याने नुकतीच विकत घेतलेली इंडीका मोठ्या आनंदाने आईला- बहिणींना अभिमानाने दाखविण्यासाठी लुधियानाहून सांगलीपर्यंत एकट्याने चालवत आणली.

वाटेत पुण्यात त्याचे नाडी भविष्य पहायला तो व मी एकत्र. पट्टी सापडली. उज्ज्वल भविष्य. मोठ्या हुद्यावर बढत्या. मुले-बाळे भरपूर आयुष्य. लग्न या दोन महिन्यात ठरेल. मात्र विवाह वयाच्या पुढील वर्षात घडेल. सातव्या कांडात वधूचे वर्णन-मॉडर्न नावाची, सिनिक ब्युटीच्या ठिकाणची, वगैरे वगैरे. पुढील काही दिवसात नाडी कथनाप्रमाणे तंतोतंत वर्णन असलेल्या व्यक्तीशी - पन्हाळ्यातील (सिनिक ब्युटीच्या) जिच्या घराच्या समोर कोरडा तलाव असलेल्या, मॉडर्न नावाच्या स्थळाशी लग्न ठरले. धनंजय तात्काळ विवाहाला तयार असूनदेखील तिचा व तिच्या मोठ्या बहिणीचा विवाह एकत्र करता यावा म्हणून विवाहाची जी तारीख नक्की झाली ती नेमकी धनंजयच्या वयाच्या पुढील वर्षाच्या वाढदिवसानंतर काही दिवसांची. मी सहपरिवार मुद्दाम विवाह सोहळ्याला हजर. पुढे मी रजा संपवून कामाला हजर. त्याचा हनिमून वगैरेचा प्रोग्राम संपवून तो पत्नीला आणायला व तिच्या आई-वडीलांना भेटून पंजाबात ड्युटीवर परतण्यासाठी सांगलीहून कारने निघाला. जयसिंगपूरच्या पुढे रेल्वेच्या ओव्हर ब्रिजवर ट्रकने जबरदस्त धडक दिल्यामुळे जबर जखमी होवून खलास झाला. पंधरा दिवसाच्या आत. मी त्याच्या फ्यूनरलला वायुसेनेतर्फे हजर !

काय ओक ! हे असे कसे झाले? काय म्हणणे आहे आपले? आपले महर्षी असे कसे चुकले? अनेकांचे प्रश्न. काही बोलून, काही न बोलता. नाडी, नाडी उगाच करतात. चांगली आपटी बसली. काहींचा सात्विक राग. कुठले महर्षी आणि कुठले काय ? सगळ्या थापा. अनेकांची मते-मतांतरे. काय गफलत असावी? मी विचार करत राहिलो. नाडी वाचकांचा भाषांतरकाराचा काही संबंध नव्हता की त्यांच्यावर ढकलून मोकळे होता येईल.

प्राचार्य अद्वयानंद गळतगे यांची वाक्ये कानात घुमत होती. भविष्य पाहणाऱ्याच्या दृष्टीने जो भूतकाळ असतो तो ऋषिमुनींना (जेंव्हा त्यांनी नाडी ग्रंथ लिहिले त्यावेळी) भविष्यकालच होता. पृच्छकाचा तो भूतकाळ त्या ऋषीमुनींनी

यामुळे बरोबर आला, हे तो नाकारू शकत नाही. तेंव्हा बरोबर नाही. नाडी ग्रंथ पाहिलेल्या तारखेनंतर पृच्छकाचे भविष्य चुकते हे म्हणणे भविष्य चुकत असेल तर ते का चुकावे याला निश्चित कारण असले पाहिजे. म्हणजे 'भविष्य चुकत नाही मुद्दाम चुकवले जाते'.

'नाडीचा उद्देश कर्मविपाक सुलभ रितीने व यथान्याय घडवून आणणे हा आहे. भविष्य बरोबर सांगणे हा नाही' हे प्राचार्य अद्वयानंद गळतगे यांचे म्हणणे खरेच का ते आपण पाहू.

आता वाचकांना मी एक विनंती करतो की आपणच नाडी महर्षी व्हा. म्हणजे असे की धनंजयच्या संदर्भातील भावी घटना आपणास माहीत आहेत व त्यावरुन आपण जणू धनंजयची पट्टी लिहिणारे महर्षी आहोत असे माना. आता आपल्या लक्षात येईल की जर आपल्याला धनंजयच्या पत्नीला विधवा होण्याचे 'भाग्य' (भविष्य) सिद्ध करायचे असेल तर तिचा विवाह घडवायला हवा. तो धनंजयसारख्या व्यक्तीशी की ज्याचे आयुष्य विवाहानंतर अत्यंत कमी आहे. आता त्याने नाडी भविष्य पाहिले तेंव्हा महर्षींना, म्हणजेच आत्ता तुम्हाला, एक तर त्याचे भविष्य न सांगून (पट्टी सापडत नाही हा त्यातील एक उपाय) किंवा पट्टीत असे सणसणीत लिहून की त्याने तातडीने विवाह करायलाच हवा. तोही त्याच मुलीशी. यासाठी त्याची पट्टी लगेच मिळेल अशी तयार ठेवली जायला हवी. त्यात त्याच्या भावी पत्नीचे हुबेहूब वर्णन आपणास असे केले पाहिजे की त्या मुलीशीच तो विवाह करायला सिद्ध होईल. आता विवाह धनंजय तेंव्हाच करेल जेंव्हा आपण त्याला त्याचा भावी काळ उज्वल असेल अशी खात्री वाटेल असे लिहाल. आयुष्यात पत्नी, मुले-बाळे असतील. आयुष्याची दोरी बळकट असेल. का असे लिहाल की 'बाबा रे तू चार दिन का मेहमान. तरीही एका मुलीचे आयुष्य तू तिला विधवा करून बरबाद करणार आहेस. म्हणून तू तिच्याशी तातडीने विवाह कर.' सत्य कथनच करीन असे नाडी भविष्यकार म्हणून जरी आपण लिहिलेत तरी कोणीही सूज्ञ, त्यातून धनंजय सारखा विचारी व्यक्ती ते लग्न करण्याचे कधीच मानणार नाही. तो विवाहच करणार नाही. **आपण नाडी महर्षी आहात, त्यामुळे आपणास कर्मविपाकाशी तडजोड करता येणार नाही.** मग आता आपणाला धनंजयला दीर्घ आयुष्याचे रंगीत स्वप्न दारववणे भाग आहे.

त्याने अन्य कोठल्या मुलीशी विवाह करून उपयोग नाही. म्हणून त्याला सात नंबरचे कांड तयार करून ठेवले पाहिजे. त्यात अशा तऱ्हेने वर्णन केले पाहिजे की जी मुलगी अजून पाहिली नाही 'तीच माझी पत्नी आहे, अशी त्याचीच नव्हे तर त्याच्या घरच्यांची देखील खात्री व्हावी. 'कार मधून जाताना धनंजयच्या घरचे त्या मुलीला पाहण्याच्या आधीच म्हणत होते की दादा हीच आमची वहिनी !'

आपण म्हणजे नाडी महर्षी, धनंजयची पट्टी न लिहून त्याच्या मृत्यूची घटना घडून गेल्यावर, नाडी भविष्यावर येऊ घातलेला खोटेपणाचा आळ चुकवू शकला असता. मग आपण असे का केले नाहीत? का नाडीभविष्याला बदनाम व्हायला कारणीभूत झालात? **कारण (महर्षिंना) भविष्य कथन करणे हा एकच उद्देश ठेवून नाडी पट्ट्या लिहायच्या नाहीत. कर्मविपाक सुलभ व ठरल्याप्रमाणेच घडावा यासाठी ही (आणि यासाठीच) आपणास कार्य करायला हवे आहे. हे ही लक्षात असू द्या की हे लिखाण आपणास कूट लिपीतून श्लोकबद्ध करून, काव्याची सर्व बंधने पाळून लिहायला हवे आहे.**

आपणास धनंजयची पट्टी लिहायलाच हवी असण्याचा आणखी एक उद्देश असा की या पट्टी वाचनास ओकांना त्या भविष्य कथनाचे साक्षी करून हे ही दाखवून द्यायचे आहे की पुढे काही काळानंतर नाडी भविष्याकडे लोक जेंव्हा प्रश्नार्थक नजरेने पाहतील, आमची निंदा करून अवमान करतील तेंव्हा तुला (ओकांना) आमची बाजू मांडता यायला नको का? कदाचित पूर्वी जसे त्याच्या पत्नीसाठी आम्ही तीन पट्ट्या लिहून ठेवल्या होत्या. त्यातील शेवटची पट्टी त्यांना आगामी काळात व्यक्तीचे नाव नाडीपट्टीत कसे कोरून लिहिलेले असते हे दाखवून देण्यासाठी एक पुरावा म्हणून उपयोगाला येईल अशी व्यवस्था केली गेली. त्याचप्रमाणे यापुढे ओकच्या लेखनाने सामान्य लोकांचा आमच्याकडे पहायचा दृष्टीकोन त्यामुळे दूषित राहू नये, यासाठी ही धनंजयची पट्टी कामाला यावी.

बरेच जण कोणाला मुलगा होईल सांगितले व मुलगी झाली तर आमच्यावर रुसतात. खट्टू होतात. असे समजा की मराठीत 'मुल'च्या पुढे 'गा' आणि 'गी' मध्ये काना-मात्रेचा कितीसा तो फरक? तमिळमधेही तसेच आहे. त्यात हात न उचलता लिहायच्या प्रथेमुळे लेखनिकांकडून होतो असा विपर्यास. मुलामुलींचे विवाह

सांगितल्याबरहुकूम घडत नाहीत तेंव्हा त्या व्यक्तींच्या विवाहाला दीर्घ काळ लागणार असला तरी त्याला उदासीनता न यावी असा उद्देश आम्हाला (महर्षींना) ठेवावा लागतो. म्हणून पुन्हा पुन्हा शांती दीक्षेची मात्रा द्यावी लागते. तेंव्हा नाडी 'भविष्य चूक, खोटे असे सरसकट म्हणणे कितपत योग्य आहे याचा विचार आपण करावा.

00

परिशिष्ट ८

वेबसाईटवरील प्रतिक्रिया

(स्तंभलेखकाला श्री. शशिकांत ओक, पुणे यांनी ह्या प्रतिक्रिया ई-मेलवर

पाठविल्या आहेत.)

सांगलीच्या श्री. विश्वास भिडे यांनी '**विज्ञान आणि अंधश्रद्धा निर्मूलन**' हे पुस्तक 'स्क्राईबडी' वर जानेवारी २००९ मध्ये सादर केले. तेव्हापासून हे पुस्तक ३२६१ लोकांनी हाताळले असे तेथील संख्या दर्शवितात.

या पुस्तकावर आधारित ब्लॉग जाने. २०१२ मध्ये प्रकाशित केला गेला.

दि. १२ एप्रिल २०१२ पर्यंत तो २४७८ लोकांपर्यंत पोहचला." त्याचे विवरण असे :- (हे विवरण म्हणजे 'तक्ता' असून तो येथे दिलेला नाही. ग्रंथकर्ता)

त्यानंतर मिसळपाव, मायबोली, मी मराठी आदि मराठी वाचकांच्या साईटवर त्याबद्दलची माहिती शशिकांत ओकांनी सादर केली. त्याचा गोषवारा व काही मासलेवाईक प्रतिक्रिया व उत्तरे यांचे हे संकलन :- (या संकलनातील मोजक्या व प्रत्यक्ष प्रकरणाशी संबंधित प्रतिक्रिया फक्त संक्षेपाने देत आहे. खालील परिच्छेदावरून त्याचे कारण स्पष्ट होईल. - ग्रंथकर्ता)

या साईटस्वरील सदस्य सामान्यतः'अंनिस'वाल्या मानसिकतेचे असतात. जे नसतात त्यांचा आवाज क्षीण करायची विशेष काळजी घेतली जाते. काही सदस्यांची टोपणनावे त्यांच्या विचारांची बैठक दर्शवितात. उदा. 'आगाऊ', 'डार्क मॅटर', 'रिकामटेकडा', 'बेफिकीर', 'वल्ली', 'अतृप्त आत्मा', 'पक पक पक'.

१ ल्या प्रकरणातील कडेगावच्या भानामतीवरील प्रतिक्रिया -

'खेडुत' नामक व्यक्तीने विदेशातून मायबोली साईटवर एक धागा उपस्थित केला. त्यातून दाभोळकरांशी संपर्क साधून या विषयावर पुन्हा चालना मिळाल्याचे निदर्शनास आणून दिले गेले, 'खेडूत' हे कडेगावचे रहिवासी व त्यावेळच्या घटनेची

---

* ग्रंथलेखकाचा ब्लॉग श्री. ओक यांनी तयार केला असून दूरध्वनीवरून त्यांनी ग्रंथलेखकाला कळविले आहे की या ब्लॉगमध्ये ग्रंथातील काही प्रकरणे 'हायलाइट' केली आहेत. संपूर्ण प्रकरण (व पुस्तक) वाचण्यासाठी श्री. भिडे यांचे 'स्क्राईबडी' क्लिक करण्यास सांगितले आहे. वस्तुस्थिती अशी असल्यामुळे काही प्रतिक्रिया संपूर्ण न वाचता केवळ 'हायलाइट'वरून दिल्या गेल्या असण्याची शक्यता आहे. विशेषत: उथळ व थिल्लर. ग्रंथकर्त्याची तळटीप.

माहिती असलेले होते. म्हणून त्यांच्या कथनाला उचलून धरणारे लिखाण झाले. त्यांनी सहा प्रश्न उपस्थित केले. त्यावर प्राचार्य अद्वयानंद गळतगे यांनी भोजगावावरून दूरध्वनीने प्रतिक्रिया कळवली, ती अशी. प्रश्न असंबद्ध असल्यामुळे ते सर्व येथे न देता त्यांचे असंबद्ध स्वरूप कळण्यासाठी त्यातील दोन प्रश्न घेऊन त्यांचे उत्तर येथे देत आहे. . - ('खेडुता'चे सर्व ६ प्रश्न ग्रंथकर्ता)

प्रश्न १ - डॉ. दाभोळकर हे स्वतःडॉक्टर आहेत. त्यांना रुग्णाशी कसे वागावे हे समजत नाही असे वाटते काय?

ग्रंथकर्त्याचे उत्तर :-

डॉ. दाभोळकर हे मुलींची 'तपासणी' कडेगावच्या खुद्द यजमान डॉक्टरांच्या दवाखान्यातील एका खोलीत करत होते. डॉ. बर्वे हे कडेगावचे यजमान डॉक्टर काय म्हणतात पहा :- "डॉ. दाभोळकरांनी मुलींना 'आपण डोळ्यात खडे घालतो व नंतर काढून दाखवतो, हे कबूल करा, नाहीतर तुम्हाला पोलिसांच्या ताब्यात. देऊ, साताऱ्याला नेऊ, डोळे काढू' असा धाकदपडशा दाखवून त्यांच्याकडून आपल्याला हवे तसे जबरदस्तीने लिहवून घेतले." कडेगावच्या घटनेचे सत्य शोधण्यासाठी कडेगावच्या ज्या डॉक्टरांनी साताऱ्याहून डॉ. दाभोळकर या समव्यवसायी डॉक्टरांना

कडेगावला मुद्दाम बोलावून घेतले होते, ते कडेगावचे यजमान डॉक्टर सातार्‍याच्या आपल्या पाहुण्या डॉक्टरविरुद्ध मुद्दाम खोटी साक्ष देतील काय? (स्वतःमुली, त्यांचे पालक, व वर्गशिक्षक या सर्वांच्या दाभोळकर विरोधी साक्षी बाजूलाच राहू द्यात.) **डॉक्टर रुग्णाशी कसा वागतो हा सामान्य प्रश्न येथे नसून डॉ. दाभोळकर हे कडेगावच्या मुलींशी कसे वागले, हा विशिष्ट प्रश्न येथे आहे, हे या 'खेडूता'ला कळू नये?**

प्रश्न २ :- या विषयावर स्वतःदाभोळकर यांनी त्यांच्या पुस्तकात एक पूर्ण प्रकरण लिहिले आहे, ते आपण वाचले आहे काय?

ग्रंथकर्त्याचे उत्तर :-

ज्या गृहस्थांनी ५ ते ८ वर्षे वयाच्या लहान व निरागस मुलीकडून धाकदपडशा दाखवून जबरदस्तीने **खोटे लिहवून घेतले** ते गृहस्थ आपल्या पुस्तकातील या विषयावरील प्रकरणात **खरे लिहितील काय** हे एखादे शेंबडे पोरही सांगू शकेल ! खोली बंद करून ते मुलीशी कसे वागले, काय बोलले, हे त्या मुलीशिवाय (व कडेगावचे डॉ. बर्वे हे अधूनमधून आपली औषधे आणण्यासाठी त्या खोलीत जात असल्यामुळे त्यांच्याशिवाय) इतर कोणालाही माहित होणे शक्य नव्हते. मुलींनी तेथे जे घडले ते सर्व नंतर सांगितले आहे. डॉ. बर्वे यांची साक्ष वर दिलेलीच आहे. डॉ. बर्वे खोटे बोलतात, सर्व मुली खोटे बोलतात, फक्त एकटे दाभोळकरच काय ते खरे बोलतात असे 'अंनिस' वाल्यांखेरीज इतर कोण म्हणतील? तनुजाला तिच्या आजोबांनी आईकडे (सांगावला) पाठविल्यानंतर तेथेही खडे येण्याचा प्रकार चालू असताना **तेथे खडे येणे पूर्ण बंद झाले असे दाभोळकर धादांत खोटे लिहितात. (पृ. ५४) एका जाहीर सत्य घटनेविषयी बिनदिक्कतपणे खोटे लिहिणारे दाभोळकर बंद खोलीतील घटनेविषयी (ज्या घटनेवर त्यांची व त्यांच्या समितीची अबू अवलंबून आहे, त्या घटनेविषयी) खरे लिहितील काय?** म्हणून "तनुजा ही मुलगी दहा मिनिटे खोटे बोलत होती. पण नंतर तिचा बांध फुटला. तिने हुंदके देत सर्व सांगितले." **असे एक नाटकी वाक्य ८ वर्षाच्या मुलीविषयी ते लिहितात** ! अर्थात् परिणामकारिकतेकरिता त्यांना असे नाटकी वाक्य लिहावे लागले आहे. **(लहान मुलीविषयी - विशेषत: बंद खोलीतील - काहीही लिहिले तरी खपते, हे त्यांना माहित**

नाही असे कोण म्हणेल?) मुख्य प्रश्न दडपून टाकण्यासाठी असली भाषा वापरावी लागते ! **मुख्य प्रश्न असे आहेत. :-**

१) आम्ही मुलींना चांगलाच धाक घातला आहे. त्यामुळे भानामती पुन्हा आता घडणार नाही, असे छातीठोकपणे दाभोळकर म्हणाले होते. पण पुन्हा भानामती घडल्याचे 'पुढारी'ला लिहिलेल्या पत्रात कडेगावच्या प्रमुख गावकऱ्यांनी म्हटले आहे. त्या पत्राची दखल दाभोळकरांनी आपल्या पुस्तकातील प्रकरणात का घेतली नाही ?

२) या लोकांनी मुलीकडून बळजबरीने लिहून घेतले, असे मुलीनीच सांगितल्याचे वरील पत्रात गावकऱ्यांनी म्हटले आहे. त्याला दाभोळकरांनी का उत्तर दिले नाही ?

३) मुली स्वत:हून आपल्या डोळ्यात खडे घालून घेतात असे म्हणणाऱ्या लोकांनी स्वत:च्या डोळ्यात खडे घालून घेऊन तो प्रयोग गावकऱ्यांपुढे का करून दाखवला नाही? असाही प्रश्न गावकऱ्यांनी विचारला आहे. त्याला दाभोळकरांचे का उत्तर नाही ?

हे सर्व अडचणीचे प्रश्न असल्यामुळे ते विचारणाऱ्या गावकऱ्यांच्या 'पुढारी'तील पत्राचा उल्लेख आपल्या पुस्तकातील या प्रकरणात दाभोळकरांनी !ळला आहे. 'अशारितीने मुख्य प्रश्नांना बगल देणारे व खोटेपणाने भरलेले दाभोळकरांच्या पुस्तकातील हे प्रकरण सत्यशोधनाच्या दृष्टीने कवडी किमतीचे आहे.'

खेडूता'चे इतर चार प्रश्न असेच मुख्य प्रश्नाला बगल देणारे, असंबद्ध व खोटे आहेत.

४ थ्या प्रकरणातील हेरवाडच्या भानामतीवरील प्रतिक्रिया - - प्रकरणाच्या शेवटी दिलेल्या टीपेत संबंधित कुटुंबाला त्या व्यक्तीने प्रश्न :- सांगितलेला उपाय सर्वांना कळावा म्हणून का प्रसिद्ध केला नाही?

उत्तर : (प्रा. गळतगे यांनी दूरध्वनीवरून दिलेले) ग्रंथाचा उद्देश भानामतीचे सत्य शोधणे, भानामती घडल्याचे पुरावे शोधून त्यांची नोंद करणे एवढाच मर्यादित आहे.

भानामतीची कारणे व उपाय सांगणे हा नाही. भानामतीची कारणमिमांसा व इतर गोष्टींची चर्चा **विज्ञान आणि चमत्कार** या ग्रंथात विस्ताराने केली आहे, ती पाहावी.

(भानामतीविषयी अनेक प्रश्नार्थक प्रतिक्रिया असून पैकी एका एम. डी. स्त्री डॉक्टरांना विज्ञान आणि चमत्कार या ग्रंथातील शास्त्रीय माहिती ओकांनी ब्लॉगवर दिली आहे. - ग्रंथकर्ता)

८ व्या प्रकरणातील कर्नाटक भानामतीवरील प्रतिक्रिया १७३५ सालच्या ब्रिटीश पार्लमेंट अधिकाऱ्यांची बुद्धिमत्ता दयनीय होती असे दिसते. २०१२ साली त्या विचाराची भुरळ पडणे हे चिंताजनक आहे.... -

ओक म्हणतात :- भानामती खोटी असेल, म्हणजेच अस्तित्वात नसेल तर ती करणार कोण? तुला जर असे म्हणायचे असेल की भानामतीच्या नावाने काही गैरप्रकार करणारे पकडले गेले तर त्यांना शिक्षा द्यायला कायदा हवा. पण मग तसा वेगळा कायदा असायची गरज नाही. पीनल कोडमधील तरतुदी पुरेशा आहेत. पण त्याकाळी रॉयल सोसायटीला चेटूक प्रकार खरा असल्याचे शास्त्रीय संशोधनाअंती आढळून आल्यामुळे चेटूक करून लोकांना त्रास देणाऱ्यांना शिक्षा व्हावी म्हणून तो विशेष कायदा करावा लागला (असे गळतगे म्हणतात.)

(१७३५ सालच्या इंग्लंडच्या पार्लमेंटची व लंडनच्या रॉयल सोसायटीच्या शास्त्रज्ञांची बुद्धिमत्ता दयनीय नाही, रॉयल सोसायटीच्या सदस्य शास्त्रज्ञांच्या बुद्धिमत्तेचा दर्जा काय असतो हे माहित नसलेलया या माणसांची बुद्धिमत्ता दयनीय आहे. - ग्रंथ कर्ता)

९ व्या 'चित्रपट निमति गजानन जहागीरदार यांच्यावर बुध्दिवाद्यांनी केलेला अन्याय' या प्रकरणावरील प्रतिक्रिया :- या धाग्यावर कोणालाच समर्पक प्रतिवाद करता आलेला नाही. समाधी लागली वाचताना.

मिपा वरील प्रेषक राजघराणं Wed. 01/02/2012, 16:40

प्रासादिक लेखन, एकेक शब्द वाचला. प्रत्येक वाक्य वाचले, अहा हा! ओ हो हो !!

मूर्ख बुद्धिवादी लोक असल्या प्रसादिक अनुभवांना भास, विभ्रम असे विचित्र शब्द वापरतात.

बुद्धिवाद्यांना अक्कल असते काय ? लेखात म्हटल्याप्रमाणे ते अन्यायी, अज्ञानी, मिथ्याकथी (खोटारडे), हवेत वावड्या उडवणारे असतात.

समाप्त